अकोला । गुरुवार
दि. २४ एप्रिल २०२५
वर्ष : १९ अंक : ५४
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

## जा, मोदीला सांग..!
### मृत पतीच्या पत्नीला दहशतवाद्यांची धमकी



**जम्मू-काश्मीर :** कर्नाटकातील शिवमोगा येथील मंजुनाथ हे आपल्या पत्नी पल्लवी आणि लहान मुलासोबत सुट्टीसाठी पहलगाममध्ये आले होते. हल्ल्याच्या वेळी मंजुनाथ यांना गोळी लागून जागीच मृत्यू झाला. पत्नी पल्लवी यांनी सांगितले की, माझ्या डोळ्यांसमोर माझ्या पतीला मारण्यात आलं. एक दहशतवादी म्हणाला,जाओ मोदी को बता दो. पल्लवी यांनी त्यांच्या पतीचा मृतदेह तातडीने हवाई मार्गाने घरी पोहोचवण्याची मागणी केली आहे.

**हिंदू असल्याने ठार मारले :** पल्लवी यांनी सांगितले की, दहशतवाद्यांनी नाव विचारल्यानंतर हिंदू आहोत असं सांगितल्यावर त्यांनी गोळी मारली. हल्ल्याच्या वेळी आमच्यासोबत आमचा मुलगाही होता. हल्ल्यावेळी काही स्थानिक नागरिकांनी धाव घेत पल्लवी यांची मदत केली. त्यांनी माझ्या पतीला ठार मारलं, मलाही मारा, असेही मी दहशतवाद्यांना म्हटले असता ते म्हणाले,जाओ मोदी को बता दो. मोदींना हे सांगण्यासाठी तुला जिवंत ठेवले आहे, असेही एका दहशतवादी म्हणाला.

पहलगाममध्ये घडलेल्या दहशतवादी हल्ल्यात एका महिलेच्या पतीला गोळी मारण्यात आली. घटनेनंतरचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. दाम्पत्य शांततेने भेलपुरी खात असताना अचानक दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. या हल्ल्यात महिलेच्या पतीचा मृत्यू झाला असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. अधिक तपास सुरू असून सुरक्षा यंत्रणा अलर्टवर आहेत.

# मोदी सरकार 'ॲक्शन मोड'वर!
## दहशतवादी हल्ल्याच्या ठिकाणी एनआयए पथक दाखल

**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

काश्मीरधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या घटनास्थळी राष्ट्रीय तपास संस्थेचे एक पथक आज (दि.२३) दाखल झाले आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिले आहे.

मंगळवारी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची माहिती मिळताच केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा काश्मीरमध्ये पोहचले. त्यांनी दहशतवाद्याच्या हल्ल्यामध्ये मृत झालेल्या भारतीयांच्या कुटुंबांची भेट घेत त्यांचे सात्वन केले. त्यानंतर या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप लोकांना श्रद्धांजली वाहिली.




त्यानंतर गृहमंत्री शाहा यांनी पहलगाम बैसरन कुरणात दहशतवादी हल्ल्याच्या घटनास्थळी पोहोचत त्याठिकाणची पाहणी केली.

जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममधील बैसरन येथे मंगळवारी (दि.२१) दुपारी २.३० वाजता दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या भ्याड हल्ल्यात निष्पाप २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला आहे. सुरक्षा यंत्रणांनी काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यामागील संशयित दहशतवाद्यांचे छायाचित्र तसेच रेखाचित्रे जारी केली आहेत. आसिफ फुजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी या हल्ल्यात तीन दहशतवाद्यांची ओळख पटली आहे.

गुप्तचर विभागाने म्हटलं आहे की, चार ते पाच दहशतवादी मागील एक महिन्यापासून पहलगाम परिसरात सक्रीय होती. दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा (एलईटी) ची शाखा असलेल्या द रेझिस्टन्स फ्रंटच्या दहशतवाद्यांनी बैसरनमध्ये पर्यटकांवर गोळीबार केला. कुर्ता-पायजामा परिधान केलेले किमान ५-६ दहशतवादी दरीच्या सभोवतालच्या घनदाट जंगलातून बैसरनमध्ये अले. यानंतर एके-४७ ने पर्यटकांवर अंदाधूंद गोळीबार केला. गुप्तचर विभागाच्या सूत्रांनी म्हटलं आहे की, हल्ल्याच्या काही दिवस आधी खोऱ्यात घुसखोरी करणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्यांमध्ये हल्लेखोरांचा समावेश होता.

जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममधील बैसरन येथे मंगळवारी (दि.२१) दुपारी २.३० वाजता दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २६ पर्यटकांपैकी युएई आणि (पान २ वर)

### दहशतवाद्यांना सोडणार नाही - शहा

जम्मू आणि काश्मीरमध्ये असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, ''पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना जड अंतःकरणाने श्रद्धांजली वाहिली. भारत दहशतीसमोर झुकणार नाही. या भ्याड दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांना सोडले जाणार नाही.

## दहशतवादी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दौऱ्यावर हल्ल्याच्या तयारीत होते?

**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमध्ये मंगळवारी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. मागील सहा वर्षांतला काश्मीरमध्ये पर्यटकांवर झालेला हा सर्वात मोठा हल्ला आहे. पर्यटकांना नाव आणि धर्म आणि विचारुन ठार करण्यात आलं. या हल्ल्याबाबत आता नवी माहिती समोर येते आहे. दहशतवादी काश्मीरमध्ये आधीच आले होते आणि त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १९ एप्रिलच्या कटरा दौऱ्यावर हल्ला करायचा होता असंही समजतं आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या हल्ल्यात सहभागी असलेले चार दहशतवादी हे पाकिस्तानातील लष्कर ए तैयब्बाचे आहेत. मात्र या हल्ल्याची जबाबदारी टीआरएसने घेतली आहे. मात्र सूत्रांच्या म्हणण्यानुसार टीआरएस हा लष्कर ए तैय्यबाचा मुखवटा आहे. याचा वापर करुन पाकिस्तानकडून हल्ले केले जातात. तसंच सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार दहशतवादी आधीच आले होते. त्यांची मूळ योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १९ एप्रिलच्या कटरा येथील दौऱ्यावर हल्ला करण्याची होती. मात्र हा कट नंतर रद्द करण्यात आला. द प्रिंटने यासंबंधीचं वृत्त दिलं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार चारही दहशतवादी काश्मीरच्या बैसरन या ठिकाणी आले होते. (पान २ वर)



हेच ते दहशतवादी

### दोन दहशतवाद्यांचा खात्मा

काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथील हल्ल्यानंतर बारामुल्ला येथे दहशतवाद्यांनी घुसखोरीचा प्रयत्न केला. पण सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत दहशतवाद्यांचा घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला. येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांत चकमक सुरु असून त्यात दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात आले आहे. या कारवाईदरम्यान सुरक्षा दलांनी सुरक्षा दलाने दहशतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा आणि इतर युद्धसामग्री जप्त केली आहे. येथे कारवाई सुरु असल्याची माहिती भारतीय आर्मीच्या चिनार कॉर्प्सने दिली आहे.

काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथील बैसरन येथे मंगळवारी (दि.२२) लष्करी गणवेशात आलेल्या दोन दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. यात ३० पर्यटकांचा मृत्यू झाला. तर १५ हून अधिक जखमी झाले. मृतांमध्ये दोन परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे दहशतवाद्यांनी पर्यटकांना धर्म विचारून अंदाधुंद गोळीबार करत स्वर्गभूमीवर रक्ताचा सडा सांडला. दरम्यान, सौदी अरेबिया दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी दौरा अर्धवट (पान २ वर)

## पहलगाममधील हल्ल्यामागे लष्कर-ए-तय्यबाच्या टीआरएफ गटाचा हात

कश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी (दि.२२) दुपारच्या सुमारास दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात ३० पर्यटकांचा मृत्यू झाला तर अनेकजण जखमी झाले. यामागे लष्कर-ए-तैयबाच्या गटाचा हात असल्याची माहिती समोर आली आहे.

पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या लष्कर-ए-तैयबा (एलईटी) या दहशतवादी संघटनेचा एक गट द रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. ऑगस्ट २०१९ मध्ये कलम ३७० रद्द केल्यानंतर आणि जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द केल्यानंतर पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबाचा एक भाग असलेल्या टीआरएफने ऑनलाइन संस्था म्हणून सुरुवात केली होती.

जानेवारी २०२३ मध्ये, गृह मंत्रालयाने (एमएचए) दहशतवादी कारवायांचा प्रचार, दहशतवाद्यांची भरती, दहशतवाद्यांची घुसखोरी आणि पाकिस्तानमधून जम्मू आणि काश्मीरमध्ये शस्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी केल्याबद्दल बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्यांतर्गत टीआरएफला ''दहशतवादी संघटना'' म्हणून घोषित केले. टीआरएफने काश्मीरमधील पत्रकारांना धमक्या दिल्यानंतर काही महिन्यांनी हे पाऊल उचलले गेले.



**टीआरएफ दहशतवादी संघटना काय आहे ? :** गृह मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, २०१९ मध्ये लष्कर-ए-तोयबाच्या प्रॉक्सी संघटनेच्या रूपात टीआरएफ अस्तित्वात आले. ''टीआरएफ दहशतवादी कारवायांना चालना देण्यासाठी ऑनलाइन माध्यमातून तरुणांची भरती करत आहे. दहशतवादी कारवाया, दहशतवाद्यांची भरती, दहशतवाद्यांची घुसखोरी आणि पाकिस्तानमधून जम्मू-काश्मीरमध्ये शस्त्रे आणि अंमली पदार्थांची तस्करी यावर प्रचार करण्यातही ते सहभागी आहे. जम्मू-काश्मीरमधील लोकांना भारताविरुद्ध दहशतवादी संघटनांमध्ये सामील होण्यास प्रवृत्त करण्यासाठी टीआरएफ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मानसिक कारवायांमध्ये सहभागी आहे,'' असे अधिसूचनेत म्हटले आहे. यापूर्वी या घटनांमुळे टीआरएफ सदस्यांवर गुन्हे दाखल (पान २ वर)

### तापमान °C
विदर्भात आज

| जिल्हा | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | 45.0 | 26.7 |
| चंद्रपूर | 45.5 | 00.0 |
| ब्रम्हपूरी | 45.6 | 27.0 |
| अमरावती | 44.6 | 24.7 |
| वर्धा | 44.7 | 27.9 |
| नागपूर | 44.4 | 23.8 |
| यवतमाळ | 43.8 | 27.0 |
| गडचिरोली | 44.6 | 24.2 |
| वाशिम | 43.0 | 00.0 |
| भंडारा | 43.0 | 27.8 |
| गोंदिया | 42.5 | 26.6 |
| बुलढाणा | 40.7 | 27.8 |

## आमचा पूर्ण पाठिंबा! राहुल गांधींचा अमित शहा, ओमर अब्दुल्लांशी संवाद

**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात काल मंगळवारी २६ निष्पाप लोकांचा जीव घेतला. गृहमंत्री अमित शहा यांनी आयबी, गृहसचिव आणि गृहमंत्रालयाचे अधिकारी आणि जम्मू-काश्मीरचे डीजीपी यांच्यासोबत आपत्कालीन बैठक घेतली. गृहमंत्री अमित शहा हे श्रीनगरला पोहोचले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतले आहेत. तसेच विरोधी पक्षातील नेत्यांनीही या घटनेचा निषेध नोदंवत सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केली.



विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट करत सांगितले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला, जम्मू काश्मीर प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष तारिक कर्रा यांच्यासह वरीष्ठ अधिकाऱ्यांशी पहलगाम हल्ल्याबाबत चर्चा केली. त्यांच्याकडून परिस्थितीची माहिती घेतली. पीडितांच्या कुटुंबियांना न्याय मिळाला पाहिजे. तसेच त्यांनी सध्याच्या परिस्थितीत आमचा सरकारला पूर्ण पाठिंबा असल्याचे पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनीही गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवर चर्चा केली.

सीमेपलीकडून झालेल्या या भ्याड हल्ल्याला ताकदीने उत्तर दिले पाहिजे. अशा परिस्थितीत सर्वांनी एकजुट राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. सरकारने सुरक्षीत वातावरण निश्चित करण्यासाठी (पान २ वर)

## महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका कायदेशीर तरतुदीनुसारच; भारत निवडणूक आयोग

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकानंतर मतदार यादी व मतदानप्रक्रियेवर करण्यात येत असलेल्या आरोपांना भारत निवडणूक आयोगाने उत्तर दिले आहे. आयोगाच्या स्पष्टीकरणानुसार, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची त्रुटी नसून, सर्व कायदेशीर तरतुदींनुसारच निवडणुका पार पडल्या आहेत.

आयोगाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रात ६ कोटी ४० लाख ८७ हजार ५८८ मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत दर तासाला सरासरी ५८ लाख मतदारांनी मतदान केले. तथापि, शेवटच्या दोन तासांत अपेक्षित ११६ लाखांच्या तुलनेत केवळ ६५ लाख मतदारांनी मतदान केले, हे लक्षवेधी असले तरी त्यावरून कोणत्याही गैरप्रकाराचा निष्कर्ष काढता येत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले.




प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान प्रक्रिया पार पडली. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांकडून मतदानानंतर कोणतीही तक्रार अधिकृतपणे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निरीक्षकांकडे नोंदवण्यात आलेली नाही. मतदार यादी संदर्भात आयोगाने सांगितले की, १९५० च्या लोकप्रतिनिधी अधिनियम व १९६० च्या मतदार नोंदणी नियमांनुसार तयार केली जाते. (पान २ वर)

### थोडक्यात

#### पहलगाम हल्ल्याबाबत मोठा खुलासा!

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी झालेल्या हल्ल्याबाबत एक मोठा खुलासा समोर आला आहे. पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी रेकी केल्यानंतर ही घटना घडवून आणली असल्याची मेथीची उघड झाली आहे.

या हल्ल्यात सहा दहशतवादी सहभागी असल्याचे सांगण्यात येत आहे. या महिन्याच्या १ ते ७ एप्रिल दरम्यान हल्लेखोरांनी या भागाची रेकी केल्याची माहिती मिळाली आहे. घटनास्थळापासून काही अंतरावर सुरक्षा दलांना नंबर प्लेट नसलेली मोटारसायकल सापडली आहे. दहशतवाद्यांनी याचा वापर केला असावा असा अंदाज वर्तवला जात आहे. पहलगाम हल्ल्याबाबत गुप्तचर सूत्रांनी मोठा खुलासा केला आहे. ही घटना सहा दहशतवाद्यांनी घडवल्याचे सांगण्यात येत आहे. दहशतवाद्यांपैकी ५ ते ७ जण पाकिस्तानचे असल्याची माहिती समोर आली आहे.

## आशिया पॅसिफिक क्षेत्रात सायबर हल्ल्यांचा स्फोट!
### ९७ टक्के डेटा ब्रिचेस फक्त 3 मार्गांनी

**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

**आघाडीची आंतरराष्ट्रीय टेलिकॉम आणि सायबर सुरक्षा सेवा देणारी कंपनी ने २०२५ डेटा ब्रिच तपासणी अहवाल जाहीर केला आहे. या अहवालात विशेषतः आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील सायबर सुरक्षेची स्थिती धोकादायक पातळीवर पोहचल्याचे स्पष्ट झाले आहे.**

एकूण ब्रिचेसपैकी तब्बल ९७ टक्के ब्रिचेस फक्त तीन प्रकारांमुळे घडले सिस्टम घुसखोरी, सोशल इंजिनीअरिंग आणि वेब ॲप्लिकेशन हल्ले! सिस्टम घुसखोरीचा जबरदस्त वाढ: २०२४ मध्ये जे प्रमाण फक्त ३८% होते, ते २०२५ मध्ये ८०% वर गेले. या पद्धतीने हॅकर्सने मधील अनेक महत्त्वाच्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवला.




**मालवेअरचा प्रभाव वाढला :** २०२४ मध्ये मालवेअरचा सहभाग ५८% होता, तर २०२५ मध्ये तो ८३% झाला आहे. यामध्ये ईमेलद्वारे मालवेअर पाठवण्याचा सर्वाधिक उपयोग झाला.

**रॅन्समवेअरचा कहर :** मध्ये एकूण डेटा ब्रिचेसपैकी ५१% मध्ये रॅन्समवेअरचा थेट सहभाग आहे. विशेष म्हणजे हल्लेखोर बहुतेक वेळा हे हल्ले सार्वजनिक करतात, ज्यामुळे कंपन्यांच्या प्रतिमेला मोठा धक्का बसतो. सोशल इंजिनीअरिंग घटले पण धोका कायम: २०२१ पासून या प्रकारातील घटनांमध्ये घसरण झाली असली, तरी या वर्षीही २०% ब्रिचेस सोशल इंजिनीअरिंगमुळे घडले.

**जागतिक स्तरावरील धोके :** शून्य-दिन हल्ल्यांत वाढ: आणि सुरक्षा भिंतींवर आधारित हल्ले ३४ टक्क्यांनी वाढले आहेत. हल्ला म्हणजे असा सायबर हल्ला जो सॉफ्टवेअरमधील एखाद्या अजून शोधला न गेलेला किंवा अजून फिक्स न झालेली त्रुटी वापरून केला जातो. याला म्हणतात कारण त्या त्रुटीबाबत सुधारणा करण्यासाठी सॉफ्टवेअर बनवणाऱ्या कंपनीला ''शून्य दिवस'' मिळतात.

**थर्ड पार्टी त्रुटी :** थर्ड पार्टी संबंधित ब्रिचेस दुप्पटीने वाढले आहेत, विशेषतः सप्लाय चेन आणि भागीदार कंपन्यांमुळे हे घडत असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

**मानवी चुका :** ब्रिचेसमध्ये मानवी सहभाग अजूनही मोठा आहे यामध्ये चुकीच्या क्रेडेन्शियल्सचा वापर, फसवणूक ईमेलला प्रतिसाद, वगैरेंचा समावेश आहे.

**तज्ज्ञ काय म्हणतात? :** IDC Security Services चे उपाध्यक्ष क्रेग रॉबिन्सन म्हणतात, ''या वर्षीचा अनेक संस्था जागरूक करण्यासाठी एक इशारा आहे. पुरेशी साक्षरता नसलेल्या आणि सायबर सुरक्षेची पायाभूत संरचना नसलेल्या कंपन्या सर्वाधिक त्रस्त आहेत. एशिया पॅसिफिक विभागाचे उपाध्यक्ष रॉबर्ट ले बस्क यांनी सांगितले की, ''संघटनांनी आपल्या धोरणांचा पुनर्विचार करणे अत्यावश्यक झाले आहे. बाह्य घटक महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आणि तृतीय पक्ष प्रणालींचा गैरफायदा घेत आहेत.

## पहलगाम हल्ल्याचा काश्मिरातील इतर पर्यटकांनाही फटका
### श्रीनगर - जम्मू प्रवासासाठी २० तास!

**नवी दिल्ली, दि. २३** वृत्तसंस्था

पहलगाममधील छोटे स्विझर्लंड अशी ओळख असलेल्या बैसरन येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला आणि काश्मीरमधील वातावरण तंग झाले. ठिकठिकाणी दहशतवादी हल्ल्याचे पडसाद उमटू लागले. कुठे दुकाने बंद झाली तर कुठे वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले. चौकाचौकात नाकाबंदी, टप्प्याटप्प्यावर प्रत्येकाची तपासणी सुरू झाली आणि नंदनवनाची सफर करण्यासाठी गेलेले पर्यटक कमालीचे अस्वस्थ झाले.

श्रीनगरवरून जम्मूमधील कटऱ्याची वाट धरणाऱ्या बहुसंख्य पर्यटकांना द्राविडीप्राणायाम करीत तब्बल २० तास खडतर प्रवास करावा लागला. तर वैष्णव देवीचे दर्शन घेऊन श्रीनगर सफरीला सुरुवात करणाऱ्या पर्यटकांनी पुढे जाण्याचा बेतच रद्द करावा लागला. पहलगामजवळील बैसरन येथे पर्यटनासाठी मोठ्या संख्येने पर्यटक जातात. बर्फाची दुलई पांघरलेला हा परिसर केवळ पुण्या-मुंबईतीलच नव्हे तर देशभरातील पर्यटकांना भुरळ पाडतो. त्यामुळे जम्मू-काश्मीरला जाणारे पर्यटक आवर्जून बैसरनला भेट देतात. सध्या उन्हाळ्याची सुट्टी पडली असून मोठ्या संख्येने पर्यटक काश्मीरला जात आहेत. त्यामुळे स्थानिक खासगी वाहतूक सेवा, शिकाराचालक, हाऊसबोट चालक-मालक, हॉटेलचा व्यवसाय तेजीत आहे. मात्र बैसरनमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे या सर्वांच्या उत्पन्नावर गदा येण्याची वेळ ओढवली आहे.

# पान 1 वरुन...

## मोदी सरकार ॲक्शन ...

नेपाळमधील नागरिकांचाही समावेश आहे. प्राथमिक फॉरेन्सिक अहवाल आणि हल्ल्याचे साक्षीदारांनी दिलेल्या माहितीनुसार दहशतवाद्यांनी लष्करीच्या गणवेषात आले होते. तसेच दहशतवाद्यांनी संपूर्ण घटनाक्रम रेकॉर्ड करण्यासाठी बॉडी कॅम आणि हेल्मेट-माउंटेड कॅमेरे घातले होते. हल्लेखोर पूर्ण तयारीने आले होते आणि त्यांनी सुकामेवा आणि औषधे साठवली होती. सूत्रांनी सांगितले की दहशतवाद्यांनी स्थानिकांच्या मदतीने पहलगामची रेकी देखील केली. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, हल्लेखोरांपैकी दोन दहशतवादी पश्तो भाषेत बोलत होते (पश्तो ही पाकिस्तानमधील मूळ भाषा आहे. तर दोन दहशतवादी स्थानिक (आदिल आणि आसिफ) होते. स्थानिक दहशतवादी बिजभेरा आणि त्राल येथील आहेत.

द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. गुप्तचर संस्थांच्या माहितीनुसार, लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर सैफुल्लाह कसुरी उर्फ खालिद हा कट रचणाऱ्यांपैकी एक असल्याचा संशय आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सुमारे ८-१० दहशतवादी सहभागी असण्याची शक्यता आहे. त्यापैकी ५-७ दहशतवादी पाकिस्तानचे असल्याचा संशय आहे. दरम्यान, या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियाचा त्यांचा हाय-प्रोफाइल दौरा अर्धवट सोडून घरी परतल्यानंतर पाकिस्तानच्या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत आसिफ यांनी भारताविरोधात विधाने केली आहेत.

## दहशतवादी पंतप्रधान नरेंद्र ...

काश्मीरच्या बैसरन या ठिकाणी मॅगी पॉईंट आहे, त्या ठिकाणी हे चौघे दाखल झाले होते. या दहशतवाद्यांकडे एके ४७ रायफल्स आणि बॉडी कॅमेरे होते असंही कळतं आहे.

**दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं**

द प्रिंटने दिलेल्या बातमीनुसार २२ एप्रिल रोजी जेव्हा दहशतवाद्यांनी हल्ला केला तेव्हा त्यांनी पर्यटकांमधल्या पुरुषांना लक्ष्य केलं. पुरुषांवर गोळीबार करुन त्यांना ठार केलं. १० ते २० मिनिटं दहशतवादी अंदाधुंद गोळीबार करत होते. या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी विशेष तपास मोहीम राबवण्यात येते आहे. विशेष दलांनाही यासाठी पाचारण करण्यात आलं आहे. २६ लोक या हल्ल्यात मारले गेले आहेत. ज्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आज पहलगाम दौऱ्यावर पोहचले आहेत. तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांचा सौदी अरेबियाचा दौरा रद्द केला आणि ते भारतात परतले आहेत.

## दोन दहशतवाद्यांचा खात्मा...

सोडून मायदेशी परतले. तत्पूर्वी त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांना संपर्क करून परिस्थितीची माहिती घेतली. गृहमंत्री शहा हेही तातडीने काश्मीरला रवाना झाले असून आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली आहे. या हल्ल्यावर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. भारतीय लष्कराने मोठी कारवाई करत बुधवारी जम्मू आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर (एलओसी) घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला. उरीजवळ ही कारवाई करण्यात आली. यात दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात आले.

**दोन दहशतवादी ठार**

चिनार कॉर्प्सच्या माहितीनुसार, २३ एप्रिल रोजी उरी नाला येथील सरजीवन भागात २ ते ३ अज्ञात दहशतवाद्यांनी घुसखोरीचा प्रयत्न केला. पण सुरक्षा दलाने सतर्कता दाखवत मोठी कारवाई केली. यावेळी जोरदार गोळीबार झाला. या कारवाईत दोन दहशतवाद्यांना ठार मारल्याची पुष्टी झाली आहे.

## पहलगाममधील हल्ल्यामागे ...

गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार, टीआरएफ कमांडर शेख सज्जाद गुल यांना यूएपीएच्या चौथ्या अनुसूचीनुसार दहशतवादी म्हणून घोषित करण्यात आले आहे. '' टीआरएफच्या कारवाया भारताच्या सुरक्षेसाठी आणि सार्वभौमत्वासाठी हानिकारक आहेत. जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा कर्मचारी आणि नागरिकांच्या हत्येचे नियोजन, प्रतिबंधित दहशतवादी संघटनांना पाठिंबा देण्यासाठी शस्त्रे वाहतूक करणे आणि समन्वय साधणे यासंबंधी टीआरएफचे सदस्य/सहकाऱ्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत...'' असे गृह मंत्रालयाने म्हटले आहे.

## आमचा पूर्ण पाठिंबा! राहुल ...

सर्व राजकीय पक्षांशी चर्चा करायला हवी. जम्मू काश्मीरमध्ये पर्यटकांची सुरक्षेच्या उपाययोजनांसाठी पाउल उचलावे लागेल असे ते म्हणाले.याआधी काँग्रेस खासदार इमरान मसूद यांनी म्हंटले की, सरकारने दहशतवादी बाबत कडक धोरण अवलंबावे. सरकारने दहशतवाद्यांचे कुटील मनसुबे उधळून लाउन त्यांना सडेतोड उत्तर द्यावे. यासाठी संपूर्ण ताकदीचा वापर करावा. दशहतवादाशी कोणत्याही प्रकारचा समझोता होणार नाही. ते म्हणाले तीन दिवसांपूर्वीच मी काश्मीरमध्ये होतो असे ते म्हणाले. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक आले होते. ते सर्वत्र फिरत होते. निसर्गाचा आनंद लुटत होते. ते पाहून समाधान वाटत होते. आम्हीही रात्रीपर्यंत बाहेरच होतो. मात्र दुसऱ्या दिवशी असे काही घडेल याची आम्ही कल्पनाही केली नव्हती. काश्मीरमधले वातावरण सर्वसामान्य असल्याचे दिसून येत होते. मात्र अशी दुर्दैवी घटना आता समोर आली आहे.

## महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा ...

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो आणि अंतिम यादी सर्व पक्षांना उपलब्ध यादी करून दिली जाते.

याशिवाय, अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ ९० अपीले करण्यात आली, जी एकूण मतदार संख्येच्या तुलनेत अत्यल्प आहेत. विशेष म्हणजे काँग्रेसकडूनही कोणतीही मोठी तक्रार नोंदवलेली नाही. मतदान प्रक्रियेत १ लाखांहून अधिक मतदान केंद्रांवर ९७,३२५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सर्व पक्षांकडून १,०३,७२७ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमले गेले होते. यामध्ये काँग्रेसच्या २७,०९९ बीएलएचा समावेश होता. त्यामुळे मतदार यादी संदर्भातील आरोप पूर्णपणे निराधार असून कायद्याचा अवमान करणारे असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. २४ डिसेंबर,२०२४ रोजी निवडणूक आयोगाने काँग्रेसला लेखी उत्तर दिले असून, ही माहिती आयोगाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. तरीही पुन्हा पुन्हा असे आरोप करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे अयोग्य असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

## एकनाथ शिंदे जम्मू काश्मीरला जाणार; अजित पवारांचाही ओमर अब्दुल्ला यांना फोन

**मुंबई:** पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात महाराष्ट्राच्या ६ जणांचा समावेश आहे. या हल्ल्यानंतर जम्मू काश्मीरात पर्यटनासाठी गेलेले शेकडो मराठी नागरीक अडकून पडले आहेत.

सरकारने हे सर्वजण सुरक्षित असल्याचा दावा केला आहे. पण आता या प्रकरणी समन्वय साधण्यासाठी स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जम्मू काश्मीरला जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकामी समन्वय साधण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांना जातीने श्रीनगरला पाठवले आहे. ते तिथे अडकलेल्या मराठी पर्यटकांशी सुसंवाद साधून त्यांना परत आणण्यासंबंधी योग्य ती उपाययोजना करणार आहेत. या हल्ल्यात ठार झालेल्या महाराष्ट्रातील ६ पर्यटकांचे मृतदेह आजच परत आणले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर आता एकनाथ शिंदे यांनी स्वतः जम्मू काश्मीरला जाऊन स्थितीचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. शिंदे यांनी या प्रकरणी श्रीनगर येथे अडकून पडलेल्या कुलकर्णी कुटुंबाशी संवाद साधला.

# ...तर असे दहशतवादी हल्ले होतच राहतील - रॉबर्ट वधेरा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**नवी दिल्ली: दि. २३ :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली असून, सर्वच राजकीय पक्षांनी याचा तीव्र निषेध केला आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस खासदार प्रियांका गांधी यांचे पती व्यावसायिक रॉबर्ट वधेरा यांचे वक्तव्य चर्चेचे ठरले आहे.देशातील मुस्लिम विरोधी वातावरण हाच अशा हल्ल्यांचे प्रमुख कारण असल्याचे म्हटले आहे. या वक्तव्यामुळे राजकीय क्षेत्रातून उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

वृत्तसंस्थेशी बोलताना वधेरा म्हणाले, ''या हल्ल्यात ज्या २८ लोकांचा मृत्यू झाला, त्यांच्याप्रती मी श्रद्धांजली अर्पण करतो. देशात सध्या मुस्लिमांविरोधात जी भावना पसरवली जात आहे, तीच या हल्ल्याचे कारण आहे.

माझ्या मते, मुसलमानांना मशिदींमध्ये नमाज अदा करण्यापासून रोखले जाते किंवा एखादी मुर्ती सापडते का हे पाहण्यासाठी मशिदींचे सर्वेक्षण केले जाते, जसं संभळमध्ये घडतंय. ते म्हणाले, बाबर आणि औरंगजेब यांच्या मुद्यांवरून अल्पसंख्यांक समुदायाला दुखावले जाते. त्यावर राजकारण होतं आणि मर्यादा लादल्या जातात. धर्म आणि राजकारण वेगळं असायला हवं. हे जर थांबवलं नाही, तर अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले घडतच राहतील. कारण दहशतवाद्यांनी ओळख विचारून गोळ्या झाडल्या. कोणाला मारायचं, कोणाला सोडायचं हे त्यांनी ठरवलं. कारण त्यांच्या मते मुसलमान दडपले जात आहेत.

वधेरा म्हणाले, ''या दहशतवादी घटनेचे विश्लेषण केल्यास, जर दहशतवादी लोकांची ओळख पाहत असतील, तर ते तसे का करतायत? कारण आपल्या देशात हिंदू आणि मुसलमानांमध्ये दुभंग निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा संघटनांना वाटतं की हिंदू, सर्व मुसलमानांसाठी अडथळा निर्माण करत आहेत. ओळख पाहून हत्या करणे हे पंतप्रधानांसाठी एक संदेश आहे कारण मुसलमान स्वतःला दुर्बळ समजत आहेत, अल्पसंख्यांक घाबरत आहेत.

हे वरच्या पातळीवरून सांगितलं गेलं पाहिजे की आपण आपल्या देशात सुरक्षित आणि धर्मनिरपेक्ष आहोत आणि आपण अशा घटनांना थारा देणार नाही.''वधेरा यांनी असंही म्हटलं, ''मला खूप वाईट वाटतं आणि या दहशतवादी कृत्यात मृत्युमुखी पडलेल्यांप्रती माझ्या गहिऱ्या संवेदना आहेत. आपल्या देशातील सध्याचे सरकार हिंदुत्वाचा प्रचार करते आणि अल्पसंख्यांकांना अस्वस्थ आणि असुरक्षित वाटते. एका समुदायाला रस्त्यावर सण साजरे करण्याची, प्रार्थना करण्याची, प्रचार करण्याची मोकळीक आहे, तर दुसऱ्या समुदायाला मर्यादा लादल्या जातात.

# चंद्रपूरचे सात नागरिक पहलगाममध्ये अडकले

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**चंद्रपूर: दि. २३ :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे अनेक पर्यटक तिथे अडकले आहेत. अशा संकटात चंद्रपूर शहरातील तीन कुटुंबांतील सात सदस्य देखील पहलगाम येथे अडकले असून, त्यांना चंद्रपूरला परत आणण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. ते काश्मीर प्रशासनाच्या संपर्कात आहेत.

दरवर्षी लाखो पर्यटक काश्मीरात पर्यटनासाठी जात असतात. यंदाही काश्मीर खोऱ्यात पर्यटकांची गर्दी असताना पहलगाम येथे दहशतवादी हल्ला करण्यात आला. त्यामध्ये ३० पर्यटक मारले गेले. अनेक पर्यटक तिथे अडकले आहेत. यामध्ये चंद्रपूर शहरातील तीन कुटुंबांतील सात सदस्य अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनी तात्काळ व्हिडिओ कॉलद्वारे संबंधित कुटुंबांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची चौकशी केली. यावेळी आम्ही हल्ल्याच्या ठिकाणाजवळच थांबलेलो होतो. आम्हाला चंद्रपूरला परत यायचे आहे, मात्र सध्याचे वातावरण पाहता ते शक्य नाही. आम्ही घाबरलो आहोत, असे त्या कुटुंबातील सदस्यांनी आमदार जोरगेवार यांना सांगितले. अंकीत नगराळे, शिल्पा नळे, स्पर्श नळे, प्रितेश नळे, अजय गाडीवान, तेजस्विनी गाडीवान, वर्षा गाडीवान असे या कुटुंबियांची नावे असून ते नागीनाबग येथील रहिवासी आहेत.

ही बाब गांभीर्याने घेत आमदार जोरगेवार यांनी तात्काळ हालचाली सुरू केल्या. त्यांनी मदत व पुनर्वसन विभागाचे संचालक सतीशकुमार खडके आणि तसेच जम्मू-काश्मीर येथील प्रशासनाशी थेट दूरध्वनीद्वारे संपर्क साधून या कुटुंबाच्या सुटकेसाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याची विनंती केली. सदर कुटुंब थांबलेले स्थान आणि त्यांची सर्व माहिती आमदार जोरगेवार यांनी जम्मू-काश्मीर प्रशासनाला दिली. त्यानंतर स्थानिक प्रशासनाने संबंधित कुटुंबीयांशी संपर्क साधल्याची माहितीही समोर आली आहे.

आमदार जोरगेवार यांच्या तत्परतेमुळे या कुटुंबांच्या सुरक्षित चंद्रपूरकडे परतीच्या हालचालींना गती मिळाली आहे. ही कुटुंब सुरक्षितपणे घरी परतेपर्यंत मी सातत्याने प्रशासनाशी संपर्कात राहणार असून, त्यांना आवश्यक ती प्रत्येक मदत दिली जाईल. असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

# पहिल्यांदा आम्ही हिंदुस्थानी मग काश्मिरी

## पहलगाम हल्ल्यानंतर स्थानिकांकडून कँडल मार्च

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**पहलगाम: दि. २३ :** पहलगाममध्ये दहशहतवाद्यानी पर्यटकांवर भ्याड हल्ला करत निष्पाप २७ जणांचा बळी घेतला. या हल्ल्यात अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानस्थित बंदी घातलेल्या लष्कर-ए-तैयबा (एलईटी) च्या संलग्न द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) ने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. दरम्यान, या हल्ल्यात दहशतवादी प्रत्येक पर्यटकाला धर्म विचारून गोळ्या घालत होते. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये २६ पेक्षा जास्त पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. ऐन सुट्ट्यांच्या हंगामामध्ये अशाप्रकारे पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला आहे. त्यातच स्थानिकांनीही सरकारला हल्लेखोरांना कठोर शासन करण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठीच इथले अनेक स्थानिक, दुकानदार रस्त्यावर उतरले.

त्यांनी या या हल्ल्याच्या निषेधार्थ कॅन्डल मार्च काढला. दरम्यान, स्थानिकांनी कँडल मार्च काढून या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. ''ज्या अतिरेक्यांनी हा भ्याड हल्ला केला, त्यांचा आम्ही निषेध करतो.

आम्ही आधी हिंदुस्तानी आहोत, त्यानंतर आम्ही काश्मीरी'', अशी भावना कँडल मार्चमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी व्यक्त केली. दुसरीकडे, आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या गणवेशात असलेल्या दोन ते तीन दहशतवाद्यांनी पाकिस्तानी दहशतवाद्यांना या भागात पोहोचण्यास मदत केली. तसेच, कोणालाही संशय येऊ नये म्हणून, तेच लोक स्थानिक भाषेत बोलत पुढे जात होते आणि पाकिस्तानी दहशतवादी त्यांच्यासोबत घटना घडवलेल्या ठिकाणी पोहोचले.

# पहलगाम हल्ल्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा पाकला इशारा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**नवी दिल्ली: दि. २३ :** जम्मू काश्मीरमध्ये २२ एप्रिल रोजी दुपारी मोठा दहशतवादी हल्ला झाला. यामध्ये पोलिसांच्या वेशात आलेल्या दहशतवाद्यांनी पहलगाम येथे पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळीबार केला. या गोळीबारात २६ जणांचा मृत्यू झाला आहे तर अनेक जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण देशात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सगळ्या घटनेवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दहशतवादी हल्ल्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल, भारत अशा हल्ल्याला घाबरणार नाही.

दहशतवाद्यांना असं उत्तर मिळेल की संपूर्ण जग बघेल, दहशतवादाला रोखण्यासाठी भारताची झिरो टॅलरन्स पॉलिसी आहे, असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे, याचबरोबर पडद्यामागे कारस्थान रचनाऱ्यांनाही शिक्षा मिळणार, असा थेट इशारा राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला दिला आहे.

जम्मू काश्मीरच्या पहलगामध्ये दहशतवादी हल्ला झाला, पोलिसांच्या वेशात आलेल्या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला.

या भ्याड हल्ल्यामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. संजय लेले, कौस्तुभ गनबोटे, अतुल मोने, हेमंत जोशी, दिलीप दिसले, संतोष जगदाळे असे मृत पावलेल्या व्यक्तींची नावे आहेत. दरम्यान जम्मू-कश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. देशभरातील प्रमुख शहरांमध्ये हाय अलर्ट घोषित करण्यात आला आहे.

मुंबई, दिल्ली, पुण्यासह कोकण किनारपट्टीवर विशेष सतर्कता जारी करण्यात आली आहे.

# पहलगाम हल्ल्यानंतर कोकण किनारपट्टीवर अलर्ट जारी!

**मुंबई** :पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आता देशभरातील सुरक्षा यंत्रणा अलर्ट झाली आहे. कोकण किनारपट्टीवर अलर्ट जारी करण्यात आला असून पोलिसांकडून गस्त वाढवण्यात आली आहे.तर संशयित हालचालीवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी कोकण किनारपट्टीवर खबरदारी म्हणून चेकपोस्ट तयार करण्यात आल्या आहेत.

कोकणात येणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून चौकशी करण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड तिन्ही जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा अलर्ट मोडवर असून २४ तास गस्त सुरू करण्यात आली आहे.

# पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधानांच्या निवासस्थानी सुरक्षेवरील मंत्रिमंडळ बैठक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**नवी दिल्ली: दि. २३ :**पहलगाम हल्ल्यातील संशयित दहशतवाद्यांचे रेखाचित्र सुरक्षा आणि गुप्तचर संस्थांनी जारी केले आहेत. त्यांची नावे आसिफ फौजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा असल्याचे सांगण्यात आले आहे.

गुप्तचर सूत्रांनी सांगितले की, हल्ल्याचा मास्टरमाइंड लष्कर-ए-तैयबाचा उपप्रमुख सैफुल्ला खालिद आहे, जो पाकिस्तानात उपस्थित आहे. येथे, राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) देखील तपासासाठी पहलगाममध्ये पोहोचली आहे. प्राथमिक तपासात या हल्ल्यात ५ दहशतवादी सहभागी असल्याचे समोर आले आहे. यापैकी दोन स्थानिक आणि तीन पाकिस्तानी दहशतवादी होते. पोलिसांनी चौकशीसाठी शेकडो लोकांना ताब्यात घेतले आहे. लष्कर-ए-तैयबाची प्रॉक्सी शाखा असलेल्या रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) ने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. दरम्यान, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ म्हणाले की, या हल्ल्यात आमचा कोणताही हात नाही. त्यातच, पंतप्रधानांच्या निवासस्थानी सुरक्षेच्या बाबींवरील मंत्रिमंडळाची बैठक बुधवारी झाली.

# पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांचे स्केच सुरक्षा दलाकडून प्रसिद्ध

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**नवी दिल्ली: दि. २३ :** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश दुःखी आहे. दरम्यान, सरकार आणि तपास संस्था कृतीत आहेत. तपास यंत्रणेने दहशतवाद्यांचे ३ रेखाचित्रे जारी केली आहेत. पोलिसांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील तीन संशयितांचे रेखाचित्र जारी केले असून या संशयितांची ओळख पाटील आहे.

सुरक्षा दलाने जारी केलेल्या रेखाचित्रातील संशयितांची नावं आसिफ फुजी, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी असल्याची माहिती समोर आली आहे. जखमी आणि प्रत्यक्षदर्शींशी झालेल्या संभाषणाच्या आधारे हे रेखाचित्र तयार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. संशयितांना ओळखण्यास लोकांना मदत व्हावी म्हणून या रेखाचित्रांचा परिसरात मोठ्या प्रमाणात प्रचार केला जात आहे. तपास यंत्रणा आता या संशयितांच्या लपण्याच्या जागा आणि संपर्कांची चौकशी करण्यात व्यस्त आहेत. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला हे उल्लेखनीय आहे. संपूर्ण जगाने या घटनेचा निषेध केला आहे.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय, मानोरा ता. मानोरा जि. वाशिम**
दुरध्वनी क्रमाक - ०७२५३-२६३२४६
Email Address: tahsildarmanora@gmail.com
क्रं. जन्म-मृत्यु नोंदणी /म.स./कावि- १५४/२०२५
दिनांक २१/०४/२०२५

**जाहिरनामा**

अर्जदार :- सुभाष मोतीराम तायडे रा. उमरी बु. ता. जि. वाशिम ता. मानोरा जि. वाशिम
विरूध्द...
गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय, उमरी बु. ता. मानोरा जि. वाशिम
बनाम :- सर्व नागरिक

याव्दारे सार्वत्रिक लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार सुभाष मोतीराम तायडे रा. उमरी बु.ता. मानोरा जि. वाशिम येथील कायमचा रहिवासी असून यांनी स्वतःचे नातीचे नावाने जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात अर्ज प्राप्त आहे. प्रकरणात अर्जदाराचे स्वतःचे नातीचे नामे तृप्ती रवि तायडे हिचा जन्म दिनांक २५/११/२०२० रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजा उमरी बु. ता. मानोरा येथे जन्म झालेला आहे. परंतु परंतु आजपर्यंत अर्जदार यांचे स्वतःच्या नातीचे नावाने जन्म नोंद अर्जदाराचे मुलाकडून अनावधानाने करण्यात आलेली नाही. तसेच स्वतःचे नातीचा जन्म नोंद कोणत्याही कार्यालयात उपलब्ध नाही. प्रकरणात जन्म नोंदीचा आदेश मिळण्याकरिता प्रतिज्ञापत्र, विनंती अर्ज, बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार कार्ड, शिधापत्रिका कागदपत्रे अर्जासोबत संलग्न केलेले आहे. बोनाफाईड प्रमाणपत्र या वरिल नमुद तारीख हीच खरी तारिख होणेकरिता ग्राम पंचायत, कार्यालय, उमरी बु ता. मानोरा जि.वाशिम येथे जन्म-मृत्यु नोंद कायदा सन १९६९ व राजपत्र जन्म/मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ अन्वये जन्म नोंद होण्याकरिता विनंती अर्ज केलेला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्वतःचे नातीचा जन्म मौजा उमरी बु. ता.मानोरा येथे झालेले आहे. परंतु सदरचा दस्त अभिलेख उपलब्ध नसल्याने जन्म नोंद ग्राम पंचायत कार्यालय, उमरी बु. ता. मानोरा यांचे अभिलेखावर घेवून जन्माचे - प्रमाणपत्र मिळणेकामी कोणाचेही हितसंबंध असल्यास, कोणाचेही उजर असल्यास अथवा कोणास आक्षेप घ्यावयाचे असेल तर हा जाहिरनामा वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत किंवा नेमलेल्या नेमलेल्या तारखेच्या दिवशी न्यायालयात हजर होवून आपल्ली हरकती लेखी स्वरूपात कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीचे आत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय उपरोक्त अर्जदारास त्यांच्या स्वतःचे नातीचा जन्म नोंदणी करण्याबाबत लागलीच पुरावा घेवून अर्ज निकाली काढण्यात येईल मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक २१/०४/२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

(डॉ. संतोष येवलीकर)
तहसिलदार तथा तालुका
कार्यकारी दंडाधिकारी, मानोरा

# रायपूरवरून नागपूरला येणारी ट्रॅव्हल्स जळून खाक; ३० प्रवासी बचावले !

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**नागपूर: दि. २३ :** गोंदिया जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर सोमवारी रात्री ही भीषण घटना घडली. रायपूरहून नागपूरच्या दिशेने निघालेली कांकेर ट्रॅव्हल्सची बस (क्रमांक ०४ ७७७६) रात्री १० च्या सुमारास सौंदड रेल्वे फाटकाजवळ अचानक पेटली. मात्र, प्रसंगावधान राखत बसचालकाने बस थांबवत सर्व प्रवाशांना वेळेत बाहेर काढल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. या बसमध्ये एकूण २५ ते ३० प्रवासी प्रवास करत होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या त्वरित घटनास्थळी दाखल झाल्या मात्र, तोपर्यंत बस पूर्णतः जळून खाक झाली होती. सुदैवाने, सर्व प्रवासी सुखरूप बचावले.

गेल्या काही दिवसात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या नामांकित खासगी ट्रॅव्हल्समधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. गंभीर अपघातांवर पांघरूण घातले जात असल्याने रोज आपले कुटुंबीय, नातेवाईक त्यांची मुले रोजगारासाठी पुन्हा जीव धोक्यात घालून प्रवास करीत आहेत.

२४ मार्च रोजी यवतमाळ जिल्ह्यात कोल्हापूर- नागपूर (एम एच ४०/ सीएम ५०३५) सैनी ट्रॅव्हल्सच्या भीषण अपघातात चालकासह ३५ प्रवासी गंभीर जखमी झाले. उद्या २४ मार्च रोजी या अपघाताला एक महिना होत आहे. आधी यवतमाळ शासकीय रुग्णालय व नंतर आपल्या खर्चाने ठिकठिकाणी खासगी रुग्णालयात जखमी उपचार घेत आहेत. मात्र अद्यापही ना शासन, प्रशासन ना सैनी व्यवस्थापन कुणीही या जखमींच्या उपचाराची दखल घेतलेली नाही. यवतमाळ ग्रामीण पोलिसांनीही औपचारिकता म्हणून गुन्हा दाखल केला परंतु कुठलेही वाहन समोर नसताना हा अपघात कसा झाला, याची चौकशी केलेली नाही. गाडीत दोन ड्रायव्हर असताना चालकाच्या झोपेच्या डुलकीमुळे प्रवाशांच्या जीवाशी अकारण खेळ झाला.

कुणी परीक्षा देण्यासाठी तर कुणी इतर आवश्यक कामासाठी प्रवास करीत होते. केवळ कुणाचा मृत्यू झाला नाही म्हणून मदत नाही अशा भावनेतून असंवेदनशील प्रशासन वागते का?

कॅबिनेट मंत्री अशोक उईके, संजय राठोड असे दोन मंत्री या जिल्ह्यातील असताना इतक्या गंभीर अपघाताची ना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक ना राज्य सरकारने दखल घेतली, असा संताप या अपघातातील गंभीर जखमी व त्यांचे नातेवाईक व्यक्त करीत आहेत. यानंतर लागलीच यवतमाळजवळ असलेल्या उमर्डा घाटात पुणे - चंद्रपूर ही डीएनआर ट्रॅव्हल्सची बस (एम ३४ बीजी ००७७) २९ प्रवासी घेऊन उलटली. सुदैवाने ती भक्कम झाडांच्या कडेला अडली म्हणून अनर्थ टळला. १२ प्रवासी जखमी झाले. त्यापूर्वी जबलपूर रोडवर तसेच बुलडाणा जिल्ह्यात ट्रॅव्हल्सच्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. गेल्या काही दिवसात अशा एक ना अनेक घटनांनी ट्रॅव्हल्सच्या सुरक्षित प्रवासावर, पोलिस,परिवहन विभागाच्या कार्यक्षमतेवर आणि प्रशासन राज्य शासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# पहलगाम हल्ल्याने देश हादरला ; भारताला जगाने दिली साथ

## थोडक्यात

### पहलगाम हल्ल्यामागे टीआरएफचे 'फाल्कन स्क्वॉड' असल्याचा दावा



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील शांततामय आणि रमणीय पहलगाम परिसर पुन्हा एकदा रक्तरंजित झाला आहे. नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून, अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या भयावह हल्ल्याची जबाबदारी 'टीआरएफ' या दहशतवादी संघटनेने स्वीकारली आहे. विशेष म्हणजे, 'फाल्कन स्क्वॉड' या संघटनेच्या विशेष पथकाने हा हल्ला केल्याचे समोर आले आहे.टीआरएफ म्हणजे 'द रेझिस्टन्स फ्रंट', ही दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेशी निगडीत आहे. काश्मीरमध्ये अस्थिरता पसरवणे हे यांचे प्रमुख उद्दिष्ट असून, अनेक वेळा सामान्य नागरिकांवर व सुरक्षादलांवर हल्ले करण्यात आले आहेत. या हल्ल्याची भीषणता आणखी वाढवणारा भाग म्हणजे टीआरएफचे 'फाल्कन स्क्वॉड' हे विशेष पथक. या पथकाचे नावच त्यांच्या कार्यपद्धतीचे प्रतीक आहे. 'फाल्कन' म्हणजे गरुड झपाट्याने झडप घालणारा आणि तेवढ्याच चपळाईने निघून जाणारा पक्षी. हे पथकही त्याच धर्तीवर काम करते पाच ते दहा मिनिटांत हल्ला करून तत्काळ परिसर सोडून देणे, ही त्यांची खासियत आहे.

### वैष्णोदेवी दर्शनाला गेलेल्या मुंबईकर भाविकांचे हाल!

**कटरा :** पहलगाममधील बैसरन येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरमधील वातावरण ढवळून निघाले असून दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जम्मू-काश्मीरमध्ये 'हाय अलर्ट' देण्यात आला आहे. त्याच वेळी दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ कटरा येथे संप पुकारण्यात आला आहे. कटऱ्यामधील दुकाने, वैष्णोदेवीच्या दर्शनाला घेऊन जाणारे घोडे मालक, डोलीवालेही संपात सहभागी झाल्यामुळे भाविकांचे अतोनात हाल होऊ लागले आहेत.दरवर्षी वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने पर्यटक कटरा येथे येतात. वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन पर्यटक पुढे श्रीनगरला जातात किंवा श्रीनगर सफर पूर्ण करून वैष्णोदेवीच्या दर्शनाला येतात. यंदाही मोठ्या संख्येने भाविक वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी आले आहेत. बैसरन येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या अनेकांनी किमान वैष्णोदेवीचे दर्शन घेऊन घरी परतण्याचे बेत आखले आणि त्यांनी कटऱ्याची वाट धरली. यामुळे कटऱ्यामध्ये प्रचंड गर्दी झाली आहे.कटऱ्यामध्ये भाविकांचा ओघ वाढलेला असतानाच दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ स्थानिक रहिवाशांनी बंद पुकारला आहे. त्यामुळे कटऱ्यामधील दुकाने, वाहतूक ठप्प झाली आहे. त्यात तेथे गेलेल्या महाराष्ट्र व मुंबईतील पर्यटकांचे हाल होऊ लागले आहेत.एकीकडे सर्व कारभार ठप्प झालेला असताना कटरा येथे पर्यटकांचा ओघ मात्र वाढत आहे. कटरा येथील बहुतेक हॉटेलमध्ये जागाच उपलब्ध नाहीत. त्यातच घोडेवाले आणि डोलीवाले संपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी भाविकांना चालत जाण्याशिवाय पर्याय नाही. दर्शनाला जाताना वाटेतील दुकाने उघडी असतील की नाही याचीही शाश्वती नाही.

### सौदीहून परतताना पंतप्रधान मोदींच्या विमानाने टाळला पाकिस्तानच्या हवाई हद्दीचा वापर

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील पहलगामजवळ काल पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यादरम्यान सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा दौरा रद्द करत तातडीने मायदेशी परतले होते. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी जेद्दाहहून नवी दिल्लीला परतत असताना त्यांच्या विमानाने पाकिस्तानच्या हवाई हद्दीचा वापर टाळल्याची माहिती समोर आली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विमानाने मंगळवारी रात्री उशिरा सौदी अरेबियाहून उड्डाण केले तेव्हा त्यांच्या विमानाने पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून उड्डाण टाळले. फ्लाइट ट्रॅकिंग वेबसाइटवरील माहितीनुसार पंतप्रधान मोदींचे भारतीय हवाई दलाचे बोईंग ७७७-३०० विमान मंगळवारी सकाळी रियाधला उड्डाण करताना पाकिस्तानच्या हवाई हद्दीतून गेले होते, परंतु परत येताना या विमानाने मोठा वळसा घेत पाकिस्तानची हवाई हद्द टाळली.सौदी अरेबियाहून परतताना पंतप्रधानांच्या विमानाने अरबी समुद्रावरून थेट उड्डाण केले आणि नंतर भारतीय द्वीपकल्प ओलांडत गुजरातमार्गे भारतात प्रवेश केला आणि नंतर दिल्लीला परतले. याबाबत एनडीटीव्हीने वृत्त दिले आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परतीच्या प्रवासाचा मार्ग बदलण्यामागे पाकिस्तानकडून येणाऱ्या धोक्याची शक्यता होती.

## पुतिन,ट्रम्प, नेतान्याहू म्हणाले, 'दहशतवादाचा एकत्रपणे सामना करू'

नवी दिल्ली, दि.२३ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम याठिकाणी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. यावर जगभरातून प्रतिक्रिया येत आहेत. हल्ल्याच्या २४ तासांच्या आत, रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतिन आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी संपर्क साधला. तसेच दहशतवादाविरुद्ध सहकार्याची वचनबद्धता व्यक्त केली.
रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांनी हा हल्ला ''क्रूर आणि अमानवीय'' असल्याचे वर्णन केले, तसेच या हल्ल्याला काही अर्थ नाही, असे म्हटले. आम्हाला आशा आहे की यामागील लोक आणि गुन्हेगारांना योग्य शिक्षा मिळेल'' असे त्यांनी म्हटले. पंतप्रधान मोदींना उद्देशून त्यांनी पुढे लिहिले की, ''प्रिय मित्र नरेंद्र मोदी, सर्व प्रकारच्या आणि प्रकटीकरणातील दहशतवादाशी लढण्यासाठी भारतीय भागीदारांसोबत सहकार्य वाढविण्याच्या माझ्या वचनबद्धतेचा मी पुनरुच्चार करू इच्छितो. मृतांच्या कुटुंबियांना माझ्या मनापासून संवेदना.''असे म्हणत त्यांनी भारताला साथ दिली.



इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही त्यांच्या अधिकृत संदेशात या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि म्हटले की, ''माझे प्रिय मित्र नरेंद्र मोदी, पहलगाममधील बर्बर दहशतवादी हल्ल्यामुळे मला खूप दुःख झाले आहे.'' आमच्या संवेदना आणि प्रार्थना पीडित आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत इस्रायल भारतासोबत उभा आहे. हे विधान पुन्हा एकदा सिद्ध करते की भारत आणि इस्रायलमधील राजनैतिक आणि सुरक्षा सहकार्य किती खोल आहे, विशेषतः दहशतवादासारख्या सामान्य धोक्यांविरुद्ध.
जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यावर भारताचा शेजारील देश श्रीलंकेनेही प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, पहलगाममधील भयंकर दहशतवादी हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. आम्ही पीडितांच्या कुटुंबियांबद्दल मनापासून संवेदना व्यक्त करतो आणि जखमींना लवकर बरे होण्याची इच्छा करतो. सर्व प्रकारच्या आणि प्रकटीकरणातील दहशतवादाविरुद्धच्या लढाईत श्रीलंका भारत सरकार आणि जनतेसोबत दृढ एकजुटीने उभा आहे. आम्ही प्रादेशिक शांतता आणि सुरक्षिततेसाठी आमच्या अटल वचनबद्धतेचा पुनरुच्चार करतो.
काश्मीर हल्ल्याबद्दल अमेरिकेने म्हटले आहे की'' ते या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करते. पर्यटक आणि नागरिकांच्या हत्येच्या अशा घृणास्पद कृत्याचे कोणीही समर्थन करू शकत नाही. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे त्यांच्यासोबत आमच्या संवेदना आहेत. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत आणि गुन्हेगारांना जबाबदार धरण्याची मागणी करतो.''

**भारताला जागतिक पाठिंबा**
या हल्ल्याचा अमेरिका, फ्रान्स, रशिया, इस्रायल, श्रीलंका आणि इराणसारख्या देशांनी निषेध केला आहे. दहशतवादाविरुद्ध भारतासोबत उभे राहण्याची त्यांची वचनबद्धता त्यांनी पुन्हा एकदा व्यक्त केली आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाचा हा एकत्रित पाठिंबा भारताच्या राजनैतिक ताकदीचे प्रतिबिंब आहे आणि जग आता दहशतवादाकडे मर्यादित दृष्टिकोनातून पाहत नसल्याचे दर्शविते.

## पाकिस्तानला 'बालाकोट २.०' ची भीती

इस्लामाबाद , दि.२३ वृत्तसंस्था

भारतात नुकत्याच झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट उसळली आहे आणि त्याचे पडसाद शेजारील पाकिस्तानमध्ये स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. २०१९ च्या बालाकोट हवाई कारवाईनंतर जेव्हा भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर अचूक हल्ला केला होता, तेव्हापासून पाकिस्तानची सुरक्षा यंत्रणा सतत तणावाखाली आहे. यंदाच्या पहलगाम हल्ल्यात २८ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्यामुळे देशभरात संतापाचे वातावरण आहे. यामुळे भारत पुन्हा एकदा कठोर पाऊल उचलेल, अशी भीती पाकिस्तानला वाटत असून, भारतीय सीमेवर लष्करी हालचालींमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पाकिस्तानी हवाई दलाने विमाने, ज्यांना 'स्काय आय' असेही म्हटले जाते सीमेवर तैनात केली आहेत, ही गोष्ट फारच बोलकी ठरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपला सौदी अरेबिया दौरा अर्धवट सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला, तर गृहमंत्री अमित शहा यांनी तत्काळ काश्मीरमध्ये हजेरी लावली. हे सर्व घडत असताना पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांमध्ये प्रचंड हालचाल दिसून येते. भारतीय हवाई दलाच्या हालचाली, सैनिकी संप्रेषणं आणि सीमावर्ती तैनातीवर पाकिस्तानकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

## हल्ल्यानंतर 'या' मुस्लिम देशाने केला संताप व्यक्त

अबू धाबी, दि.२३ वृत्तसंस्था

पहलगाम येथे मंगळवारी (२२ एप्रिल) दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. सध्या त्यांच्यावर स्थानिक रुग्णलयात उपचार सुरू आहेत. तसेच दहशतवाद्यांच्या या भ्याड कृत्याचा केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर तीव्र निषेध केला जात आहे. अमेरिका, इस्रायल, इराण, रशिया, श्रीलंका, सौदी अरेबिया या देशांकडून तीव्र निषेध केला जात आहे. दरम्यान, मुस्लिम देश संयुक्त अरब अमिरातीनेदेखील या हल्ल्याचा निषेध केला आहे.

## चोराच्या उलट्या बोंबा; जम्मू काश्मीरमधील हल्ल्यावर पाकिस्तानच्या परराष्ट्रीय मंत्रालयाने व्यक्त केल्या संवेदना

इस्लामाबाद:, दि.२३ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमध्ये पुन्हा एकदा दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जम्मू-काश्मीरच्या प्रमुख पर्यंटन स्थळ पहलगाम येथे ५ ते ६ दहशतवाद्यांनी अचानक हल्ला केला. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर डझनभर लोक जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे संपूर्ण देशात भीतीचे वातावरण पसरलेले आहे. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानच्या दहशतवादी गट लष्कर-ए-तोयबा म्हणजेच 'द रेझिस्टंट्स फ्रंट' ने घेतली आहे. दरम्यान या हल्ल्यावर पाकिस्तानची प्रतिक्रिया समोर आली आहे.



पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी केले आहे. या निवेदनात परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, अनंतनाग जिल्ह्यातील हल्ल्यात पर्यटकांच्या जीवीतहानीबद्दल आम्हाला चिंता आहे. आम्ही मृतांच्या कुटुंबियांबद्दल संवेदना व्यक्त करत आणि जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो.पाकिस्तानचे हे विधान अशा वेळी करण्यात आले आहे जेव्हा या हल्ल्याची जबाबदारी लष्कर-ए-तैयबा म्हणजेच द रेझिस्टन्स फ्रंट' () या संघटनेने घेतली आहे. ही संघटना हाफिज सईच्या नेतृत्वाखाली कार्य करते. ही पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना आहे. हाफिज सईद हा मुंबई २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमांइड आहे.दरम्यान काही आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तान विधान हे दुतोंडी असल्यासारखे वाटते. यामागचे कारण पाकिस्तानमधून दहशतवाद्यांना पाठिंबा आणि प्रशिक्षण दिले जात असल्याचा आरोप गेल्या अनेक दशकांपासून होत आहे. तज्ञांच्या मते, पाकिस्तानने जारी केलेल्या निवेदनात हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांची नावे घेतली नाही.

## मुजफ्फराबाद आणि कराचीतील सेफ हाऊसच्या संपर्कात होते दहशतवादी

### डिजिटल फूटप्रिंटमुळे पाकिस्तानचा बुरखा फाटला

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचे डिजिटल पुरावे पाकिस्तानशी जोडलेले असल्याचे दिसून येत आहे. भारतीय गुप्तचर संस्थांनी म्हटले आहे की, हल्ल्यातील संशयित दहशतवाद्यांचे डिजिटल फुटप्रिंट मुझफ्फराबाद आणि कराचीमधील सेफ हाऊसपर्यंत पोहोचत आहे. यावरून या हल्ल्याच्या सीमेपलिकडील संबंधाचे पुरावे मिळतात. या हल्ल्यात आतापर्यंत २८ पर्यटकांचा मृत्यू झाला आहे, तर १२ पेक्षा अधिक लोक जखमी झाले आहेत.
घटनास्थळावरून जप्त केलेल्या साहित्याच्या फॉरेन्सिक विश्लेषणाच्या आधारे आणि बचावलेल्या लोकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी हल्ला करण्यासाठी लष्करी शस्त्रांचा वापर केला असल्याचे गुप्तचर सूत्रांनी सांगितले आहे. याचा अर्थ असा की हल्लेखोर पूर्णपणे प्रशिक्षित होते आणि त्यांच्याकडे आवश्यक असलेली सर्व शस्त्रे होती. भारतीय एजन्सींना घटनास्थळाभोवती प्रगत श्रेणीतील संचार उपकरणे सापडली आहेत. यावरून असे दिसून येते की दहशतवाद्यांना बाहेरून रसद आणि सहकार्य मिळत होते.



गुप्तचर यंत्रणांचा दावा आहे की हल्ला करणारे दहशतवादी पाकिस्तानात बसलेल्या ऑपरेटिव्हच्या थेट संपर्कात होते. पाकिस्तानातील मुझफ्फराबाद आणि कराची येथील सेफ हाऊस पहलगाम हल्ल्यातील संशयितांचे डिजिटल कनेक्शन सापडले, ज्यामुळे सीमेपलिकडील दहशतवाद्यांच्या संबंधांचे पुरावे बळकट झाले. सुरक्षा अधिकाऱ्यांनी पुष्टी केली आहे की, शस्त्रांचे स्वरूप आणि हल्ल्याची अचूकता दर्शवते की दहशतवाद्यांना प्रशिक्षित हँडलर्सकडून लॉजिस्टिक सहाय्य मिळाले होते. दहशतवादी हल्ले करणाऱ्या द रेझिस्टन्स फ्रंटने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.गुप्तचर यंत्रणांच्या म्हणण्यानुसार, दहशतवादी पूर्णपणे तयारीने हल्ल्यासाठी आले होते. दहशतवाद्यांच्या पाठीवर पिशव्या लटकवल्या होत्या, ज्यामध्ये सुकामेवा, औषधे आणि दळणवळणाची उपकरणे होती. ५ ते ६ दहशतवादी जंगलात लपून बसले होते आणि स्थानिक लोकांच्या मदतीने पहलगामची रेकी करत होते. तयारी पूर्ण झाल्यानंतर, दहशतवाद्यांनी संधी साधली आणि हल्ला केला. गुप्तचर यंत्रणांचा दावा आहे की ३ ते ४ दहशतवादी एके-४७ ने सतत गोळीबार करत होते. यावेळी दोन पाकिस्तानी दहशतवादी पश्तो भाषा बोलत होते. त्याच्यासोबत दोन स्थानिक दहशतवादी (आदिल आणि आसिफ) देखील होते. हे दोन स्थानिक दहशतवादी बिजभेरा आणि त्राल येथील आहेत.

## दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्या–ओवैसी

नवी दिल्ली, दि.२३ वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे मंगळवारी दुपारच्या सुमारास दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात परदेशी नागरिकांसह २६ जणांचा मृत्यू झाला आहे तर अनेकजण जखमी आहेत. देशभरातली विविध राज्यातून पर्यटक पहलगामला गेले होते. परंतु, त्यांच्यावर काळाने घाला घातला. दरम्यान, या भ्याड हल्ल्याला अनेकांनी अमानवी कृत्य संबोधलं आहे. हल्लेखोरांनी पर्यटकांना त्यांचं नाव विचारून त्यांच्यावर त्यांच्या नातेवाईकांसमोर गोळ्या झाडल्या.
या कृत्यामुळे देशभरातून संताप व्यक्त केला जातोय. यावर आता एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.



''पहलगाममध्ये धर्म विचारून दहशतवाद्यांनी निष्पाप लोकांना अंदाधुंदपणे मारले. आम्ही याचा तीव्र निषेध करतो. आम्हाला अपेक्षा आहे की सरकार कठोर कारवाई करेल. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे देखील गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे'', असे ओवैसी यांनी हैदराबादमध्ये पत्रकारांना सांगितले.

## पहलगामच्या हल्ल्यात गुप्तचर विभागाचा अधिकारी ठार; पत्नी आणि मुलांसमोरच गोळ्या घातल्या

नवी दिल्ली , दि.२३ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे मंगळवारी (२२ एप्रिल) झालेल्या हल्ल्यात हैदराबादमध्ये गुप्तचर विभागात काम करणाऱ्या मनीष रंजन यांची दहशतवाद्यांकडून हत्या करण्यात आली. मनीष रंजन हे मुळचे बिहारचे होते. पत्नी आणि दोन मुलांसह ते जम्मू आणि काश्मीरला फिरायला गेले होते. ज्यावेळी हल्ला झाला तेव्हा ते पहलगामच्या मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळख असलेल्या गवताळ कुरणाजवळ होते. तिथेच त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला.



दहशतवाद्यांनी हल्ला केल्यानंतर मनीष रंजन यांनी पत्नी आणि मुलांना विरुद्ध दिशेने पळण्यास सांगितले. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांचा मृत्यू झाला. गेल्या काही वर्षांतील हा सर्वात मोठा भीषण असा हल्ला आहे. अनेकजण आपल्या कुटुंबासह याठिकाणी सहलीसाठी आले होते. तर काही नवविवाहित जोडपेही याठिकाणी फिरायला आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी लोकांना वेगळे करून त्यांचे धर्म विचारून गोळ्या घातल्या.

## नेपाळ भारतासोबत खंबीरपणे उभा आहे- पंतप्रधान ओली शर्मा

काठमांडू, दि.२३ वृत्तसंस्था

मंगळवारी (२२ एप्रिल) जम्मू-काश्मीरचे प्रमुख पर्यटन स्थळ पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जणजखमी झाले आहेत. या हल्ल्याने केवळ भारत नव्हे तर संपूर्ण जग हादरले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर या हल्ल्याचा निषेध केला जात आहे. आपला शेजारी देश नेपाळने देखील या भ्याड हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. नेपाळचे पंतप्रधान ओली शर्मा यांनी हल्ल्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.
त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर म्हटले आहे की, ''पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्यांबद्दल तीव्र संवेदना आहेत. नेपला भारताच्या बाजूने ठामपणे उभा आहे. नेपाळ कोणत्याही दहशतवादी कृत्याचा तीव्र निषेध करता. तसेच पीडितांमध्ये एका नेपाळी नागरिकाचा समावेश आहे. आम्ही आवश्यक ती मतद करण्या तयार आहोत.''



पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये दोन परदेशी नागरिकांचा देखील समावेश आहे. यामध्ये एक नागरिक संयुक्त अरब अमिराती आणि एक नागरिक शेजारी देश नेपाळचा आहे. मंगळवारी (२२ एप्रिल) दुपारी हा हल्ला झाला. ५ ते ६ हल्लेखोरांनी अचानक पर्यटकांवर गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. त्यांनी लोकांना त्यांचा धर्म विचारला आणि त्यांच्यावर गोळी झाडली.
या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा म्हणजेच 'द रेझिस्टंट्स फ्रंट' ने घेतली आहे.
या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर गुप्तचर यंत्रणांनी भारत-नेपाळ सोनौली सीमेवर सुरक्षा यंत्राणेत वाढ केली आहे. कडक सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या भागात दहशतवाद्यांची घुसखोरी रोखण्यासाठी सुरक्षा रक्षकांना सीमा ओलांडण्यापूर्वी ओळख तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत.महाराजंगचे पोलिस अधिक्षकांनी माध्यमांना सांगितले आहे की, भारत-नेपाळ सीमेवर सुरक्षा मजबूत करण्यात आली आहे. दहशतवाद्यांची घसखोरी रोखण्यासाठी ने नेपाळला जाणाऱ्या मार्गावर कॅमेरे आणि ड्रोन तैनात केला आहेत. सध्या या हल्ल्यामुळे भारतात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## सात दिवसांपूर्वी झाले होते लग्न, दहशतवादी हल्ल्यात २६ वर्षीय नौदल अधिकाऱ्याचा मृत्यू

नवी दिल्ली, दि.२३ वृत्तसंस्था

नौदलात लेफ्टनंट म्हणून कार्यरत असलेल्या विनय नरवाल या २६ वर्षीय अधिकाऱ्याचा पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला आहे. विनय नरवाल हे मुळचे हरियाणाचे होते. जम्मू काश्मीरच्या पहलगाम मध्ये ते मारले गेले. सात दिवसांपूर्वीच त्यांचं लग्न झालं होतं. छोट्याश्या सुट्टीसाठी विनय नरवाल काश्मीरला पोहचले होते.
सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी २६ वर्षीय विनय नरवाल यांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. कोची या ठिकाणी त्यांचं पोस्टिंग होतं. १६ एप्रिलला त्यांचं लग्न झालं. त्यानंतर १९ एप्रिलला रिसेप्शन पार पडलं. यानंतर विनय नरवाल सुट्टीवर आले होते. काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. दोन वर्षांपूर्वी विनय नरवाल यांनी नौदलात नोकरी स्वीकारली. त्यांचं पोस्टिंग कोची मध्ये होतं. विनय यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबाला धक्का बसला आहे. त्यांचे कुटुंबीय अत्यंत दु:खात आहेत. त्यांच्या इतर नातेवाईकांनी, मित्रांनी तसंच शेजाऱ्यांनी घडलेल्या घटनेबाबत दु:ख व्यक्त केलं आहे.
विनय नरवाल यांचे शेजारी नरेश बन्सल यांनी ला सांगितलं की विनय यांचं लग्न १६ एप्रिलला झालं होतं. त्यांच्या घरात अतिशय आनंदाचं वातावरण होतं. आता आम्हाला माहिती मिळाली आहे की विनय नरवाल यांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला. विनय



नौदलात अधिकारी होता. त्याच्या मृत्यूने त्याचं कुटुंब शोकसागरात बुडालं आहे. आम्हालाही या घटनेवर विश्वासच बसत नाही. दहशतवाद्यांनी मंगळवारी पर्यटकांवर हल्ला केला. या घटनेत २६ जणांचा मृत्यू झाला. या घटनेबाबत देशभरात तीव्र संताप व्यक्त होतो आहे. मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातले ६ जण मारले गेले आहेत. पुणे, डोंबिवली, पनवेल या ठिकाणी वास्तव्य करणारे हे पर्यटक होते. दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. त्यांना जशास तसं उत्तर दिलं जाईल अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली आहे. दरम्यान २६ वर्षीय विनय नरवाल यांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

### तू मुस्लिम आहेस का, अशी केली विचारणा ?

विनय नरवाल हे त्यांची पत्नी हिमांशी यांच्यासह मधुचंद्रासाठी काश्मीरला गेले होते. त्यावेळी दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाला. हिमांशी यांनी सांगितलं की मी माझ्या पतीसह भेळ खात होते. त्यावेळी एक माणूस आला आणि त्याला विचारलं की तू मुस्लिम आहेस का? त्यावर विनय नाही म्हणाला. ज्यानंतर त्या दहशतवाद्याने विनयवर गोळ्या झाडल्या. विनय नरवाल यांनी लग्नासाठी ४० दिवसांची सुट्टी घेतली होती. १६ एप्रिलला विनय आणि हिमांशी यांचं लग्न झालं. त्यानंतर २० एप्रिलला विमानाने हिमांशी आणि विनय काश्मीरला आले होते. २२ एप्रिल रोजी विनय नरवाल यांना दहशतवाद्यांनी ठार केलं.

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## हिंदूंवरील हल्ले थांबवा

बांगला देशात झालेल्या हिंसक उठावानंतर पंतप्रधान शेख हसीना यांना त्या देशातून पलायन करावे लागले. ५ ऑगस्ट २०२४ रोजी त्या तात्पुरत्या आश्रयासाठी भारतात आल्या. त्या अद्यापही भारतातच असून, त्यांना आमच्या स्वाधीन करावे, अशी मागणी बांगला देशने भारताकडे केली आहे. त्या देशातील अराजक आजही कायम असून, हसीना यांची तेथे घरवापसी केल्यास, त्यांना जिवंत राहू दिले जाईल, याचीही खात्री नाही. बांगला देशात ठिकठिकाणी जाळपोळ आणि हिंसाचारासारख्या घटना अधूनमधून होतच असून, भावेशचंद्र रॉय या हिंदू नेत्याची नुकतीच हत्या करण्यात आली आहे. वासुदेवपूर येथील रहिवासी असलेले रॉय हे 'बांगलादेश पूजा उद्यापन परिषदे'च्या बिरल शाखेचे उपाध्यक्ष होते. स्थानिक हिंदू समुदायातील प्रतिष्ठित व्यक्ती, अशी त्यांची ओळख होती. दुचाकीवरून त्यांच्या घरी येऊन चार व्यक्तींनी त्यांचे अपहरण केले. बेशुद्ध होईपर्यंत मारहाण करण्यात आली. नंतर रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. या हत्येचा तीव्र निषेध भारत सरकारने केला असून, अल्पसंख्याकांच्या सुरक्षेची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. बांगला देश पूजा उद्यापन परिषद ही त्या देशात धार्मिक उत्सवांचे आयोजन करत असते.

कोणत्याही देशात अल्पसंख्याकांना आपल्या धार्मिक प्रथा-परंपरांचे जतन करण्याचा अधिकार असतो. भारतात मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, पारसी, ज्यू अशा विभिन्न अल्पसंख्यधर्मीयांना मुक्तपणे सण-उत्सव साजरे करता येतात. अल्पसंख्याकांचे संरक्षण ही भारत सरकार प्राथमिक जबाबदारी मानते. बांगला देशात आज कोणतीही राजकीय व्यवस्था नसून, तेथे अनागोंदी माजली आहे. हिंदूंचा पद्धतशीरपणे छळ केला जात असून, हिंदू मंदिरांवरही हल्ले केले जात आहेत. परराष्ट्र खात्याने याच महिन्यात राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, बांगला देशात अल्पसंख्याकांवरील हल्ल्याच्या २,४०० घटना गेल्या ८ महिन्यांत घडल्या. वास्तविक अनेक घटनांच्या संदर्भात कोणतेही गुन्हे नोंदवले जात नसून, जिहादी गटांना मोकळे रान दिले जात असावे, असा संशय येतो. गेल्या ४ एप्रिल रोजी बांगला देशच्या हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार प्रा. मोहम्मद युनूस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत बँकॉक येथे बिमस्टेक शिखर परिषदेच्या निमित्ताने चर्चा झाली. त्यावेळी मोदी यांनी बांगला देशमधील हिंदूंवरील अत्याचार व हल्ले याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. हा देश सर्वांसाठी सारखाच आहे, कोणावरही अन्याय होऊ देणार नाही, असे आश्वासन युनूस यांनी तेथील ढाकेश्वरी मंदिराला भेट दिल्यानंतर दिले होते.

बांगला देशात लोकसंख्येच्या ८ टक्के, म्हणजे एकूण १ कोटी ३१ लाख हिंदू आहेत. हसीना यांनी सत्ता सोडल्यानंतर हिंदू व अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्यात येऊ लागले. मुळात आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगला देशात विद्यार्थ्यांनी बंड केले आणि याचा फायदा माजी पंतप्रधान बेगम झिया यांची बांगला देश नॅशनॅलिस्ट पार्टी तसेच जमाते इस्लामी या विरोधी पक्षांनी घेतला. त्या देशात पाकिस्तानी प्रवृत्तींनी प्रथमपासूनच मूळ धरले असून, त्यांचा हसीना यांच्या अवामी लीगला विरोध आहे. शेख मुजिबूर रहमान हे बांगला देशचे शिल्पकार होते आणि त्यांनी पूर्व पाकिस्तानमधील बंगाली अस्मितेला टोकदार स्वरूप दिले. त्यावेळी बांगला देशमुक्ती वाहिनीला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाठबळ दिले आणि त्यामधून बांगला देशची निर्मिती झाली; मात्र बांगला देशातील पाकिस्तानकडे कल असलेल्या जहाल प्रवृत्तींनी मुजिबूर यांची हत्या केली. हसीना पंतप्रधान झाल्या तेव्हापासून भारत व बांगला देश यांचे संबंध अधिक सुधारले; पण दीर्घ सत्तेनंतर हसीना यांच्या विरोधात आंदोलने झाली आणि शेवटी त्यांना देशातून परागंदा व्हावे लागले; मात्र अवामी लीग आणि भारत सरकार यांचे जवळचे संबंध असून, भारत हा बांगला देशच्या हितसंबंधांना नख लावत आहे, असा अपप्रचार हसीनाविरोधी पक्षांनी सुरू केला. मुजिबूर यांच्या पुतळ्यासह त्यांचे घरही उद्ध्वस्त करण्यात आले. मुजिबूर यांचे बांगला देशनिर्मितीचे श्रेयही नाकारण्यात येत आहे. एकूणच इतिहास बदलण्याचे काम तेथे सुरू आहे. ढाका येथील भारतीय संस्कृती केंद्र आणि अनेक मंदिरांची जाळपोळ करण्यात आली. चट्टोगाव येथील कुंडलीधाम आश्रमाचे दोन सदस्य तसेच इस्कॉनचे माजी पुजारी चिन्मय कृष्ण दास यांना अटक करण्यात आली. दास हे भगवान कृष्ण आणि भगवान जगन्नाथ यांच्या पूजेसाठी प्रसिद्ध असलेल्या धार्मिक केंद्राचे माजी प्रमुख तसेच बांगला देश सनातन जागरण मंचचे प्रवक्ते आहेत. हिंदू मंदिरे आणि सुफी दर्ग्यांवरील हल्ले वाढू लागले, तेव्हा त्या विरोधात दास यांनी मोर्चे काढले आणि प्रशासनाविरोधात भाषणे दिली. एका सभेत बांगला देशच्या राष्ट्रध्वजाच्या वर भगवा ध्वज फडकावण्यात आला, तेव्हा हा राष्ट्रध्वजाचा अवमान असल्याचा आरोप करत दास यांच्यावर कारवाई करण्यात आली. गेल्या काही महिन्यांत बांगला देशात १७० हिंदू कुटुंबांवरही हल्ले करण्यात आले. हिंदूंची अनेक दुकाने लुटली गेली.

## भ्याड हल्ला



लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017



पर्यटकांवर गोळीबार
त्यांचे धर्म विचारले
हिंदुस्थान मध्ये हिंदुवर
गोळी घालून मारले

भारताचे नंदनवन
पुन्हा आहे हादरले
आमचे पहलगाम
रक्त रंजीत झाले

असे कसे भ्याड हल्ले
आतंकवादी ते करतात
होते कुठे सैन्य आपले
कोण आदेश पाळतात?

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



ऐकायचे तुला; चांगले ऐकावे ।
नको ते ऐकावे; काहीबाही ॥

वाचायचे तुला; चांगले वाचावे ।
नको ते वाचावे; काहीबाही ॥

बोलायचे तुला; चांगले बोलावे ।
नको ते बोलावे; काहीबाही ॥

प्रवीण वाचतो; ऐकतो, बोलतो ।
चांगले ते घेतो; आचरणी ॥

---



### विचारायण

साधना काळबांडे
9767993827

# मानसिक आरोग्य आणि आजची परिस्थिती

चांगले आरोग्य ही आपली खरी संपत्ती आहे असे आपण नेहमीच म्हणतो चांगल्या आरोग्य असेल तर आपले व्यक्तिमत्व फुलते आणि आपली प्रगती होत राहते म्हणून याला आरोग्य ही खरी संपत्ती आहे असे म्हटले जाते म्हणजे चांगल्या आरोग्य असेल तर आपोआप आपल्या संपत्तीची बचत होते म्हणून आपण नेहमीच आपल्या आरोग्याला महत्त्व देत असतो.ते आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सतत झटत असतो. खानपान,आहार,व्यायाम,चालणे,धावणे अशा प्रकारच्या कृती करून आपण आपले शारीरिक आरोग्य चांगले ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. चांगल्या शारीरिक आरोग्यासाठी आपण पैसाही खर्च करतो कारण आपल्याला माहित आहे आपल्या आरोग्य जर चांगले नसेल तर आपण कोणतेही कार्य उत्तमरीत्या करू शकत नाही परंतु हे करत असताना आपण मानसिक आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करतो शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्य चांगले राहणे ही प्रत्येक मनुष्याची खरी गरज आहे कारण मानसिक आरोग्य चांगले नसेल तर मात्र तुमची प्रगती खुंटते कधीकधी आपण पाहतो श्रीमंत मनुष्य ज्याला कशाचीही कमी नाही आणि वरून तो आपल्याला आनंदी असे दाखवतो पण कालांतराने त्याचे मानसिक आरोग्य खचलेले असते आणि तो आपले जीवन संपवतो. तेव्हा मात्र सामान्य लोकांना अनेक प्रश्न पडतात की असे का ज्याला आपण आपला आदर्श मानलेला असते अशाने जर आपले जीवन संपवले तर सामान्य माणसाने कुणाकडे पाहावे? ज्याप्रमाणे आपण शारीरिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी रात्रंदिवस कष्ट घेतो,चांगले दिसण्यासाठी कष्ट घेतो त्याप्रमाणे मानसिक आरोग्यालाही तेवढेच महत्त्व देणे गरजेचे असते. मानसिक आरोग्यामध्ये अनेक गोष्टीचा संगम असणे गरजेचे आहे व्यक्तीच्या भावना,विचार,त्याचे वर्तन अडचणींना सामोरे जाण्याची त्याची कुवत, खूप चांगले निर्णय घेण्याची त्याची क्षमता आणि इतरांशी चांगले संबंध ठेवण्याची क्षमता ही प्रत्येकाच्या अंगी असणे गरजेचे असते त्या व्यक्तीच्या अंगी क्षमता दिसून येते त्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य हे चांगले आहे असे म्हणता येईल. मानसिक आरोग्यामध्ये काय असते तर व्यक्तीचे मानसिक आरोग्य, भावनिक आणि सामाजिक आरोग्य या तीन घटकांचा समावेश दिसून येतो. कधी कधी एखाद्या व्यक्तीने प्रतिष्ठा संपत्ती मिळवलेली असते त्यामुळे एखाद्या वेळेस जर त्याचा निर्णय चुकला तर लोक आपल्याला काय म्हणतील या विचाराने तो आपल्या मानसिक आरोग्य बिघडवितो. आपला समाजही एखाद्या व्यक्तीने प्रगती केली असेल तर त्याची एखादी चूकही मान्य करत नाही त्याची जर एखादी चूक झाली तर हा समाज त्याला नावे ठेवून त्याचे मानसिक आरोग्य बिघडवण्यास मदत करतो त्यामुळे तो व्यक्ती खचून जातो आणि आपले जीवन संपवण्याचा विचार करतो.हे मात्र हा समाज कधीच विचार करत नाही की एखादा व्यक्ती जर आपल्या कार्यामध्ये किंवा आपल्या जीवनामध्ये यशस्वी झाला असेल तर मनुष्याला चूक ही लागूच असते त्या यशस्वी झाल्या व्यक्तीकडून जर एखादी चूक झाली असेल तर समाज त्याला माफ करत नाही पण समाज आपले कर्तव्य मात्र विसरून जातो आणि त्या व्यक्तीला त्याच्या चुकीची जाणीव करून देवून त्याच्या मानसिक आरोग्यावर आघात करतो. सामाजिक भावनिक,मानसिक आरोग्य हे व्यक्तीच्या




शरीराला निरोगी ठेवत असते त्यासाठी त्याच्या अवतीभवती असलेले वातावरण, अवतीभवती असलेल्या व्यक्ती यांची मदत असणे गरजेचे असते. शारीरिक आरोग्य बिघडले तर डॉक्टरकडे जाऊन ते दुरुस्त करता येते त्याप्रमाणे मानसिक आरोग्यासाठी आपल्या अवतीभवती असलेल्या व्यक्तींनी मदत करणे गरजेचे असते त्याला आधार देणे गरजेचे असते. कुटुंब मित्र अवतीभवतीचे लोक आणि समाज यांचे कर्तव्य आहे की मानसिक दृष्ट्या खचलेल्या व्यक्तीला आधार देणे. नाहीतर तो वाईट विचार करतो जीवन संपवतो किंवा स्वतःला इजा करतो. शारीरिक आरोग्याबद्दल अनेकजण बोलताना दिसून येतात परंतु मानसिक आरोग्याबद्दल मात्र कधी कुणी बोलत नाही. मानसिक आरोग्य हे बदलते असते कधी व्यक्तीला आनंद होतो तर कधी व्यक्तीला दुःख होते. मानसिक आरोग्यामध्ये व्यक्तीने आशावादी दृष्टिकोन ठेवणे आणि भावनांचे आपल्या जीवनामध्ये व्यवस्थापन ठेवणे गरजेचे असते ही साखळी मात्र तुटली तर व्यक्तीचे मानसिक आरोग्य धोक्यात येते. जीवनातील एखाद्या व्यक्तीला त्याच्या मनातील गोंधळ, अडचणी,समस्या यांना तोंड देताना कुणी आधार जर देत नसेल तर अशा व्यक्तीचे मानसिक आरोग्य मात्र चांगले राहत नाही. मग तो वाईट प्रवृत्तीकडे आकर्षित होतो. व्यसनाधीन होताना अनेक लोक दिसून येतात. शारीरिक आरोग्य बरोबर मानसिक आरोग्य हे व्यक्तीच्या दैनंदिन जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. जागतिक आरोग्य संघटनेने एक व्याख्या केली आहे जी मानसिक आरोग्याबद्दल आहे की "कल्याणाची अवस्था आहे यामध्ये व्यक्तीला त्या क्षमतांची जाणीव होते जीवनात सामान्य ताणतणावांना तोंड देता येते आणि काहीतरी फलदायी करता येते आणि जो समाज आहे त्या समाजासाठी योग्य योगदान करता येते." आज कुटुंब विखुरलेले आहेत.नाती कमी होत आहेत तेव्हा अशा या काळामध्ये मनुष्याला दुःख होणे किंवा किंवा स्वतः बद्दल आत्मविश्वास न वाटणे वाटणे. तसेच मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते हे मानसिक आरोग्याला घातक दिसून येते. कारण व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याच्या दृष्टीने शारीरिक,मानसिक,भावनिक,आणि सामाजिक आरोग्य चांगले असणे गरजेचे असते यामधील साखळी जर तुटली तर मनुष्य आपले जीवन जगताना दुःखी होऊन जातो. आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवायचे असले तर समाधान हे आपल्याला सुखी करेल जेवढे मिळाले त्या समाधान मानणे. जे कधी मिळणारच नाही अशा गोष्टींसाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावणे कितपत योग्य आहे. कारण आपण त्यासाठी कष्ट करतो आणि यशस्वी जर होत नसेल तर मात्र संपूर्ण आयुष्य दुःखात निघून जाते मानसिक आरोग्य बिघडीने आपण ग्रासले जातो आणि पर्यायाने त्याचा परिणाम आपल्या शारीरिक आरोग्यावरही होतो. आज मनुष्याला जगताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. दैनंदिन जीवनामध्ये, कुटुंबामध्ये समाजामध्ये आपले अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी मनुष्य प्रयत्न करीत असतो. आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी प्रत्येक जण सजग असतो.असे असताना मात्र कधी कधी समाजाने आपल्याला स्वीकारले नाही तर त्याची खंत आपल्या मनाला लागते आणि मानसिक आरोग्य बिघडण्यास सुरुवात होते. म्हणून मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नकारात्मक भावना जीवनातून दूर करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी आपल्या कुटुंबात असणाऱ्या व्यक्ती, सभोवतालचे मित्र,आपला समाज, शेजार यांची मदत घेणे गरजेचे आहे कारण आनंद हा फक्त आपण एकटा साजरा करू शकत नाही त्याचबरोबर आपल्या दुःखही आपण एकटेच दूर करू शकत नाही आपल्या अवतीभवतीच्या व्यक्तींनी जर मदत केली तर आपल्या आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल म्हणून कधी कधी मनामध्ये प्रश्न येतो की आज आपल्या हाव, इच्छाना कुठेतरी आळा घालणे जरुरी आहे. जीवनभर मिळवण्यासाठी कष्ट करायचे आणि जेव्हा आपण त्याचा आनंद उपभोगण्यासाठी जातो तेव्हा मात्र खूप उशीर झालेला असतो. प्रत्येकाच्या जीवनामध्ये सुखा मागून दुःख हे येत असते ते ठरलेलेच आहे आपल्याला एखादा व्यक्ती असा मिळणार नाही की त्याच्या जीवनामध्ये फक्त सुखसुख आहे आणि एखादा व्यक्ती असाही मिळणार नाही की त्याच्या जीवनामध्ये फक्त आणि फक्त दुःखच आहे सुखदुःखाचा संगम म्हणजे आपले जीवन आहे. त्याचा मेळ आपण कसा घालतो हे प्रत्येकाचे कला कौशल्य असते.आपण कसे जगतो आणि इतरांना कसे जगू देतो हेही तेवढे महत्त्वाचे आहे इतरांच्या उणीवा काढता काढता आपण स्वतःकडे कधीकधी दुर्लक्ष करतो असे न करता आपल्या मधील उणी वा दूर करण्यासाठी प्रयत्न केला तर आपण सुखी आणि समाधानी राहू.नाही का? एकदा मिळालेल्या या जीवनाचा खरा उपभोग आणि आनंद घ्या. इतरांच्या सुखावर जळून दुःखी होण्यापेक्षा स्वतः कडे, कुटुंबाकडे सकारात्मक दृष्टीने पाहून जगण्याचा प्रयत्न करा. तेव्हाच तुमचे आणि तुमच्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकाचे मानसिक आरोग्य चांगले राहील.मानसिक आरोग्याचा झालेला बिघाड न लपवता डॉक्टरांचा सल्ला घ्या. प्रश्नाचे उत्तर शोधा. मनात अनेक प्रश्न ठेवून जगू नका.

---



### कृषिजगात

धनंजय काकडे
९८९०३६८०५८

# लोकप्रतिनिधीच शेतकरी, शेतमजुरांचे मारेकरी!




शेतकऱ्यांचे प्रश्न आंदोलनातून सुटणे, अशक्य बाब झाली, फक्त त्यातून वातावरण निर्मिती होऊ शकते. शासन हे आंदोलकांवर दबाव आणून आंदोलने चिरडून टाकतात, कारण शेतकऱ्याचे आंदोलने उद्ध्वस्त करणे हेच सरकारच्या हातात आहे. तिथेच उठाव करणारा शेतकरी - शेतमजूर हतबल होऊ शकतो. शेतकऱ्यांचे शोषण पिढ्यान-पिढ्या चालूच आहे, अन् तेच गाऱ्हाणे पुढेही चालत राहणार आहे. आज मतदार सुशिक्षित असून सुद्धा मतदानातून तुम्ही शेतकरी प्रश्न सोडवायला तयार नाहीत, हीच मोठी देशाची शोकांतिका आहे?. शेतीमालाचे भाव कमी झाले की शेतकरी ओरडतो, व आत्महत्तेकडे प्रवृत्त होतो. आणि शेतीमालाचे भाव वाढले की, शहरातील मतदार महागाईचे कारणे सांगून सरकारचे डोक्यावर बसतो, त्याचा परिणाम निवडनुकीवर होतो म्हणून सरकार लक्ष घालीत नाही. शेतकऱ्यांचा प्रश्न सरकारचे सुद्धा द्विधा मनःस्थितीत फसलेला आहे. आणि त्याचा निर्णयच आता मतदारांना घ्यावयाचा आहे. शेतकऱ्याच्या आर्थिक धोरणातच सरकारचे, व सत्ताधीशांचे राजकारण फसले. जे सत्तेच्या बाहेर असतात, तेव्हा ते गोड बोलतात आणि सत्तेत गेल्यावर तुमच्यासाठी कळवटपणे वागतात. यात काहीनेते शेतकऱ्याचे नावाने आक्रोश करणारे नौटंकी ,सौदेबाज शेतकरी नेते सुध्दा आहेत. ते या संधीचा पुरेपूर फायदा घेतात, कारण तो त्यांचा व्यवसायच आहे. नुसतेच मंत्रिपदाचा राजीनामा घेऊन खिशात फिरतात आणि पुन्हा तेच मंत्रिपद मिळविण्यासाठी शासन दरबारी उठाठेव करतात. म्हणजेच शेतकऱ्याचे नावावर स्वार्थी व लोभी नेते तयार झालेत. नुकतेच अमरावती विमानतळाचे उद्घाटनासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येऊन गेलेत . शेतमालाला भाव नसल्यामुळे मागणी करण्यासाठी रस्त्यांवर आले, अन त्या ताफ्याला शेतकरी संघटनानी काळे झेंडे दाखवून मागणी केली व निषेध व्यक्त केला. तर पोलिस फौजेने आंदोलकांना अटक केली.याचाच अर्थ शेतीमालाला भाव मागणारे गुन्हेगार ठरतात काय ! कारण तसे कायदेच करून ठेवलेले आहेत. कायदे नसते तर आंदोलकांना अटक झाली नसती. म्हणजेच शेतमालाला भाव मागण्याचा अधिकार सुध्दा अजून जनता मिळवू शकली नाही. म्हणजेच ते कायदे पुन्हा दुरुस्त करणे , हे मतदाराचे हाती आहे. आपण आजही जाती-धर्माचे, नात्या - गोत्याचे कवच घेऊनच निवडणुकीत मतदान करतो. शेतकरी प्रतिनिधी ,आर्थिक धोरणाचे विचारवंत राज्यात, केंद्रात निवडून पाठविले नाही, तर धोरणे बदलतील कसे ! शेतकरी आत्महत्येचा कलंक सुटेल कसा! , राज्यकर्त्यांना, सत्ताधीशांना तुमच्या डोक्यावर जातीचे खापर फोडून, तर तुम्हाला लुटायचे आहे. शेतकऱ्यांनो तुम्हाला तुमचे भविष्य बदलायचे असेल, पुढील तुमच्या मुलाबाळांच्या व्यवस्थेसाठी जर जगायचे असेल तर आताच जातीच्या भस्मासुरांची पावले ओळखा आणि आजच मतदान बदलावा. शेतकरी हक्कासाठी, न्यायासाठी तुम्हाला " कृषी न्यायालय " व समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालय अलग करून वेगळे स्थापन तयार करावे लागेल !. शासनातील आतापर्यंतच्या गेल्या ७५ वर्षातील सर्व सत्ताधीश व राज्यकर्ते हे शेतकरी धोरणाचे चोर आहेत व या चोरीमुळेच शेतकऱ्यांची त्यांना आता भीती वाटत आहे. कारण सत्तेत नुसते घोटाळ्यांचा बाजार जमा झाला आहे. शेतकरी चळवळीचे नेते निवडून येणे शक्य नसेल, म्हणजे याचा अर्थ महाराष्ट्रातील कोणत्याच मतदारसंघात शेतकरी आंदोलनाचा नेता निवडून येणार नाही असंही होत नसते. हार -जीत चालूच असते, याचा अर्थ असा नाही की, आपण आपली शेतकरी चळवळ आणि उद्देश थांबलेले आहेत. त्या व्यवस्थेला मतदारांनी सहकार्य केले नाही.ज्याप्रमाणे आंदोलनात, चळवळीत राहून सहकार्य केले,मात्र निवडणुकीत मतदार आल्या घरी वापस गेले,त्याचाच परिणाम भोगावा लागत आहे. नुकत्याच अमरावती येथील संत गाडगे बाबा दीक्षांत समारंभासाठी आलेले न्यायमूर्ती भूषण गवई साहेबांनी ग्रामीण जीवनात जगणाऱ्या लोकांकडे लक्ष द्यावे लागेल, असे सांगितले. पुढे १४ मे २०२५ ला ते देशाचे सरन्यायाधीश या उच्चपदी विराजमान होतील, म्हणजेच ग्रामीण जनतेतील शेतकरी - शेतमजुरावर अवकळा येऊ नये, हेच त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होते. उत्पादन वाढीबरोबर तर शेतमालाच्या भावाची हमी, जर सरकार देत असेल तर नक्कीच हा देश प्रगतीपथावर गेल्याशिवाय राहणार नाही आणि ही व्यवस्था जर दुरुस्त केली नाही, तर शेतकऱ्यांचे शोषण होऊन, तो पुन्हा आत्महत्या कडे गेल्याशिवाय सुद्धा राहणार नाही. उत्पादन वाढ व उत्पादनवाढी बरोबरच शेतमालाच्या भावाचा समतोल राखणे हे गरजेचे आहे ,तरच खऱ्या अर्थाने या देशाला समृद्धी नांदेल व महासत्तेकडे वाटचाल होईल. आणि त्या दिशेने जर या देशाची वाटचाल होत असेल तर नक्कीच अभिनंदनीय व स्तूत्य बाब आहे. राजकीय वर्चस्वाच्या लढाईत नाहकच ग्रामीण जनतेचा बळी जात आहे, व याला फक्त आणि फक्तच शासन व्यवस्थाच ही जबाबदार आणि पूर्णपणे कारणीभूत आहे!

---



### प्रासंगिक

डॉ. एम.आर.इंगळे
मो. 9423429060

# जागतिक कीर्तीचे ग्रंथप्रेमी : डॉ.बाबासाहेब आंबेडकर...!

२३ एप्रिल हा जागतिक पुस्तक दिन संपूर्ण जगात साजरा होतो. भारतातही काही मोजके पुस्तक प्रेमी आणि मोठ्या प्रमाणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी हा दिवस शुभेच्छा देऊन आणि काही ठिकाणी ग्रंथ वाचन करून साजरा करतात.

भारतीयांसह जगाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथ प्रेमाची ओळख आहे. कारण त्यांना ग्रंथानीच घडविले आणि अफाट बुद्धिमत्ता मिळवून देऊन मानवतेसाठी, माणसांच्या माणुसकीसाठी, मानवी हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा आणि स्फूर्ती तर दिलीच पण सोबतच लढण्यासाठी शक्तीही दिली. कारण पुस्तकातून ज्ञान मिळते, ज्ञानातून प्रज्ञा प्राप्त होते आणि प्रज्ञाशील माणूस शक्तिशाली होतो. म्हणूनच विचारवंत बेकन याने म्हटले आहे की, *"नॉलेज इज पॉवर."*

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात पुस्तकांना अनन्य साधारण महत्त्व दिले होते. त्यांचे पुस्तक वाचनाचे वेड हे असामान्य होते. कोलंबिया विद्यापीठात आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये शिकत असतांना ग्रंथालयात सर्वात आधी येऊन बसणारा आणि सर्वात शेवटी बाहेर जाणारा विद्यार्थी म्हणून त्यांची नोंद आहे. ग्रंथालयात जास्तीत जास्त पुस्तके वाचता यावी यासाठी आणि वेळ वाया जाऊ नये म्हणून ग्रंथ वाचता वाचता पावाचा तुकडा खाऊन जास्तीत जास्त ग्रंथांचे वाचन करणारे जगातील एकमेव ज्ञानी पुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सुरुवातीपासूनच वाचनाची प्रचंड आवड असल्याकारणाने त्यांच्याकडे पुस्तकांचा प्रगल्भ साठा होता. 'इनसाईड एशिया' या पुस्तकाचे लेखक 'जॉन गुंथेर' लिहितात, जेव्हा १९३८ मध्ये माझी बाबासाहेबांशी भेट झाली होती तेव्हा त्यांच्याकडे आठ हजार पुस्तके होती, त्यांच्या मृत्युपर्यंत ही संख्या पस्तीस हजारापर्यंत पोहोचली होती. त्यांचे निकटचे सहयोगी 'शंकरानंद शास्त्री' त्यांच्या पुस्तकात लिहितात, मी रविवार २० डिसेंबर १९४४ रोजी दुपारी बाबासाहेबांना भेटायला गेलो. त्यांनी मला त्यांच्या सोबत जामा मस्जिद परीसरामध्ये चालायला सांगितले. तिथे जुन्या पुस्तकांचं प्रचंड मोठं मार्केट होतं. दुपारच्या जेवणाची वेळ होतेय म्हणून त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्यावर याचा काही फरक पडला नाही. डॉ.बाबासाहेब जामा मस्जिद परीसरामध्ये आहेत हे कळल्यावर तिथे लोकांची प्रचंड गर्दी झाली. एवढ्या गर्दीला तोंड देत त्यांनी वेगवेगळ्या विषयांवरील जवळपास दोन डझन पुस्तके खरेदी केली. ते त्यांची पुस्तके कुणालाच वाचायला देत नसत. पुस्तके वाचायची कुणाची इच्छा असेल तर त्यांनी माझ्या ग्रंथालयात येऊन



वाचावेत, असा त्यांचा आग्रह असायचा. त्यांचे अनुयायी राहिलेले 'नामदेव निमगडे' त्यांच्या पुस्तकात लिहितात की, "रात्रीच्या वेळी बाबासाहेब वाचनात एवढे गढून जात असत की, बाहेरील जगाचे त्यांना बिलकुल भान राहत नसे." एकदा बाबासाहेब त्यांच्या खोलीत वाचत बसलेले असताना मी तिथे गेलो आणि त्यांच्या पायांना स्पर्श केला. वाचनात मग्न असलेले बाबासाहेब बोलले, "टॉमी, नको करू हे." मला थोडं आश्चर्य वाटलं. बाबासाहेबांनी जेव्हा वर बघितलं, तेव्हा त्यांना लक्षात आलं. वाचनात ते एवढे मग्न होऊन गेले होते की टॉमी येऊन पाय कुरवाळतोय असं त्यांना वाटलं.

डॉ. बाबसाहेबाचं चरित्र लिहिणारे 'धनंजय कीर' लिहितात, रात्रभर वाचल्यानंतर बाबासाहेब फक्त दोन तास झोप घेत असत. उठून थोडा व्यायाम करत. त्यानंतर अंघोळ करून नाश्ता करत असत आणि वर्तमानपत्र वाचल्यानंतर आपल्या कारमधून ते कोर्टाकडे रवाना होत. रस्त्यातून जाताना ते टपालाने नवीन आलेल्या पुस्तकांवर नजर फिरवत असायचे. कोर्टानंतर ते पुस्तकांच्या दुकानात जात आणि घरी येतांना नवीन पुस्तकांचा एक गुच्छ घेऊन येत. त्यांच्या दैनंदिनीमध्ये पुस्तकांनी बराच वेळ व्यापलेला असायचा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे महामानव आहेत ज्यांनी ग्रंथालयासाठी बंगला बांधला आणि त्यात जवळपास बावीस हजारांपेक्षाही जास्त पुस्तकांचा संग्रह केला होता. डॉ. बाबासाहेब लहान असताना त्यांचे वडील रामजी बाबा हे त्यांच्याकडे विशेष लक्ष देत असत. त्यांना हवी ती पुस्तके आणून देत. पुरेसे पैसे नसतील तेव्हा ते आपल्या मुलींकडे जाऊन पैसे आणून पुस्तके आणत असत, पण बाबासाहेबांच्या अभ्यासात ते कधीच खंड पडू देत नव्हते. डॉ.बाबासाहेब एकदा म्हणाले होते, "तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचं पुस्तक. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसे जगायचं ते शिकवेल." ते म्हणत, अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणेच पुस्तके ही देखील मानवाची मूलभूत गरज आहे.

डॉ. बाबासाहेब हे त्यांचा शेवटचा ग्रंथ भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म लिहीत होते तेव्हा त्यांच्यासोबत त्यांचे स्वीय सहाय्यक नानकचंद रत्तू होते. एके रात्री उशीर झाल्याने बाबासाहेबांनी त्यांना घरी जायला सांगितले. ते गेल्यानंतरही बाबासाहेब लिहित बसले. सकाळी रत्तू परत घरी आले. त्यावेळी त्यांना बाबासाहेब लिहीतच बसलेले दिसले. आपल्या अभ्यासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व्यत्यय अजिबात आवडत नसे. जगातील अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ दिवस खोलीला बाहेरून कुलूप लावून स्वतःला कोंडून घेतले होते. त्यावेळी त्यांना एका लहान खिडकीतून चहा व जेवनाची व्यवस्था केली होती. या प्रसंगातून त्यांच्या लेखन व वाचनाची एकाग्रता किती पराकोटीची होती हे समजते.

एकदा परदेशातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एका बोटीतून अनेक पुस्तके पाठवली होती. पण ती बोट बुडाली. जेव्हा ही गोष्ट त्यांना समजली तेव्हा ते पुस्तकांच्या विरहात दोन दिवस रडत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आपल्या पुस्तकांवर पराकोटीच प्रेम होतं. ते म्हणत, "लोकांनी माझी अवहेलना केली पण या पुस्तकांनी मला ज्ञान दिलं. म्हणून मी पुस्तकांच्या बाबतीत इतका जागरूक आहे. पुढे ते म्हणतात, "जर माझ्या घरावर जप्ती आली आणि जर माझ्या सर्व चीज वस्तू नेल्या तर मी शांत बसेन पण माझ्या पुस्तकांना कोणी हात लावला तर मी ते कदापि सहन करणार नाही." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातल्या महत्वपूर्ण ग्रंथाचा अभ्यास केला. या अभ्यासातून ते प्रज्ञासूर्य होऊन जागतिक कीर्तीचे महापुरुष झाले. त्यांची पुस्तकांबद्दलची ही आस्था क्वचितच कोणाकडे दिसून येईल. हा त्यांचा गुण ज्ञानार्जनाकडे वळण्यासाठी सर्वांसाठी प्रेरणा देणारा आहे. पुनश्च सर्वांना पुस्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

लोकजागर

# दिव्यांगांचा आधार ‘सक्षम’



‘दिव्यांग’ हे देशाचे नागरिक असून त्यांनाही समान अधिकार असतात. ते देशाची संपत्ती आहेत. त्यांनाही सर्वसामान्य लोकांप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार आहे. या विचाराने नागपूरमधील अनेकजण प्रेरित होऊन एकत्र आले. त्यांनी सुरुवातीला केवळ अंध व्यक्तींसाठी संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि २० जून २००८ ला स्थापन झाली, एक ‘अपेक्स’ संस्था म्हणजे ‘सक्षम’. सक्षमचे पूर्ण नाव आहे ‘समदृष्टी, क्षमता, विकास एवं अनुसंधान मंडळ’. नावावरूनच आपल्याला लक्षात येईल की अंध, अपंग, विकलांग, शारीरिक मानसिकदृष्ट्या अपंग, आदी सर्व प्रकारच्या दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबविणारी एक शिखर संस्था म्हणून ‘सक्षम’ काम करते.

‘सक्षम’तर्फे दिव्यांगांसाठी प्रादेशिक, राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशन, साहित्य निर्मिती, रोजगार, तसेच क्रीडा, कला उपलब्ध करून देणे आणि दिव्यांगांचे आरोग्य, स्वावलंबन, सामाजिक विकास, विकलांगता निवारण अशा विषयांवर प्रत्यक्ष कार्य करणे येथे चालते. त्याशिवाय दिव्यांगांच्या अधिकारांचे संरक्षण, आरक्षण यासाठीही काम केले जाते. याचे सुरुवातीचे उदाहरण म्हणजे ‘माधव नेत्र बँक’. येथे नागरिकांना नेत्र दानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रचार केला जातो आणि दृष्टी प्रदान करण्यासाठी ग्राफ्टिंग सुद्धा केले जाते. ‘सक्षम’द्वारे आत्तापर्यंत महाराष्ट्र, हरियाणा, उत्तर प्रदेश, ओदिशा, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ व देशातल्या विविध भागांत बारा लायसन्स प्राप्त नेत्रबँक स्थापन केल्या आहेत. आत्तापर्यंत १४ नेत्र बँक, १२ नेत्र संग्रह केंद्र, २४ जागरूकता केंद्र आहेत. नेत्र दानाचे महत्त्व लोकांना पटवून सांगण्यासाठी दरवर्षी नेत्रदान पंधरवडा आयोजित केला जातो. ‘सक्षम’तर्फे ब्रेल ग्रंथ निर्माण केंद्र सुरू आहे. जीवनमूल्य शिकविणारे साहित्य निर्माण करण्यासाठी सक्षमच्या शाखा कार्य करीत आहेत. या ठिकाणी संगणकाच्या माध्यमातून ब्रेल लिपीमध्ये पुस्तक तयार केले जाते. यात स्वयंसेवक विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि ज्येष्ठ महिला मोठ्या संख्येने हातभार लावतात. त्यांना संगणकाचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित केले जाते. त्यांच्या योगदानातून आत्तापर्यंत १८० हून अधिक पुस्तके ब्रेललीपीमध्ये तयार झाली आहेत. विशेषतः मराठी व हिंदीतील संस्कारक्षम व दर्जेदार ब्रेललिपीतील ग्रंथांचे रेकॉर्डिंग केले जाते.

लोकसेवार्थ

दिव्यांगांना नुसतेच शिक्षण किंवा प्रशिक्षण देऊन उपयोग नाही, तर त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी देखील काही उपक्रम राबविले जातात. त्याचेच एक उदाहरण म्हणजे कृष्णज्योती अगरबत्ती निर्माण केंद्र. केरळमधल्या पलक्कड येथे ‘सक्षम’चे हे केंद्र चालते. या ठिकाणी अंध व्यक्ती उदबत्ती, साबण बनविण्याचे प्रशिक्षण घेऊन आपली उपजीविका करतात. पुण्याचे सुप्रसिद्ध डॉक्टर कै. रमेश साठे यांनी या विषयावर संशोधन करून अनेक अल्पदृष्टी उपकरणे विकसित केली आहेत. त्याद्वारे अशा बाधितांवर उपचार होऊ शकतात हे कळल्यावर विजया मेमोरियल ट्रस्ट, पुणे यांच्या सहकार्याने नागपूरमध्ये एक अल्पदृष्टी मूल्यांकन व समुपदेशन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामुळे नागपूरमधल्या अनेक लोकांना या उपचार पद्धतीचा लाभ मिळाला आहे.सध्या सक्षमतर्फे नागपूर, कल्याण, कोल्हापूर आणि हरियाणा इथल्या अंबाला इथे अशाप्रकारे केंद्र चालवली जात आहेत. दृष्टिबाधित संचालित फिजियोथेरेपी, मसाज, एक्यूप्रेशर केंद्र सुरू करायचं आहे. अंध व्यक्तींना प्रशिक्षित करून ते सुद्धा इथे सेवा देऊ शकतील आणि रोजगार त्यांना उपलब्ध होऊ शकेल यासाठी अशा प्रकारचे केंद्र सुरू करण्याची ‘सक्षम’ची योजना आहे.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 21

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बा | ळ | गं | गा | धा | र | टि | ळ | क | | | | | |
| बा | | | | | | | | | | | | | |
| सा | | | | | | | | | | | | | |
| हे | | | | | | | | | | | | | |
| ब | | | | | | | | | | | | | अ |
| आं | | | | | | | | | | | | | रा |
| बे | | | | | | | | | | | | | ज |
| ड | | | | | | | | | | | | | क |
| क | | | | | | | | | | | | | ता |
| र | | | | | | | | | | | | | |
| | ब | लि | प्र | ति | प | दा | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

## हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो
संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या बौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
कवि
कस
खग
टक
डर
दान
दान
धर्म
धेनु
नफा
मम
रत
रम
रया
रवा
वाम
वाल
वास
सदा
हेवा

**तीन अक्षरी**
असुर
आंगण
आराम
कदर
करार
कामना
गमन
चरक
पंचम
पितर
बखर
मनन
मस्तक
माहेर
राजस
लिपिक
वसंत
विधाता
विमल
विरस
वेसण
सांप्रत
सोपान

**चार अक्षरी**
अनुरुप
अवधान
आमरण
आरमार
जरतर
जीवलग
डमडम
तिरकस
दानवता
मकबरा
मतदार
मणगट
मरातब
रणरण
रसपान
साठवण

**पाच अक्षरी**
अनावधान
अराजकता
रुपगर्विता
वलयाकार

**सहा अक्षरी**
गंगावतरण
टिपू सुलतान
पदावनती
बलिप्रतिपदा

**अन्य अक्षरी**
बाळ गंगाधर
टिळक
बाबासाहेब
आंबेडकर

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | व | नी | | चिं | त | न | | गा | व | जे | व | ण | |
| व | त्स | ल | | ता | र | व | ट | णे | | | ज | | अ |
| ज्ञा | | कं | | म | | स | | | ग्र | ह | | | नि |
| | कं | ठ | म | णी | | | कु | तु | ह | ल | | क | ल |
| मा | ठ | | द | | का | म | सु | | ण | | आ | र्त | |
| | ग | वा | | ज्ञा | न | | मा | स | | अ | प | व्य | य |
| न | त | | कु | | स | त्या | ग्र | ह | | र्थ | | शु | |
| श्व | | हु | रू | प | | ग | ज | ग | ती | | मा | न्य | ता |
| र | थ | | प | ति | त | | | म | स | ल | त | | बा |
| | र | क्षा | | त | रू | ण | | न | | गा | णे | | |
| प | थ | | क | पा | त | | | | आ | म | | प | ति |
| ख | रा | | स | व | ल | त | | दं | ग | | अ | क्ष | |
| वा | ट | | र | न | | ड | म | ड | म | | य | | ऋ |
| ज | | प्र | त | | वा | क | ळ | | न | य | न | बा | ण |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 401

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | | 4 | 5 | | | 6 | 7 | | 8 | 9 | | 10 |
| | | 11 | | | 12 | | | 13 | | | | 14 | 15 | | |
| 16 | | | | 17 | | | | | | | 18 | | 19 | | |
| | | 20 | 21 | | | | | 22 | | 23 | | | | | |
| | | 24 | | | 25 | | 26 | | | 27 | | | 28 | | |
| | 29 | | 30 | 31 | | | 32 | | | | 33 | 34 | | | |
| 35 | | 36 | | | | 37 | | | | 38 | | | | 39 | |
| | 40 | | 41 | | 42 | | | | 43 | | | | 44 | | |
| 45 | | | 46 | 47 | | 48 | | | 49 | | | 50 | | | |
| | | 51 | | | | | | 52 | | 53 | | 54 | | | 55 |
| | | 56 | | | 57 | | 58 | | 59 | | | 60 | | | |
| 61 | 62 | | | 63 | | 64 | | 65 | | | 66 | | | | |
| | | | 67 | | | | | | | 68 | | | 69 | | |
| 70 | | | | | | | 71 | | 72 | | | | | | |
| 73 | | | 74 | | | 75 | | | | | 76 | | | | |
| | | 77 | | | 78 | | | | | | | | 79 | | |

**—: आडवी विधाने :—**

1) इच्छिलेले अतिशय उच्च पद प्राप्त होणे या अर्थाचा एक वाक्प्रचार
6) पुत्र
8) अनुकूल काळ
11) असलेली उणीव भरून काढणारी वस्तू
12) हरण करणारा
13) निवासस्थान
14) दुसऱ्याचे शरीर
16) नेहमी
17) युक्ती, क्लृप्ती
19) शीर, नाडी
20) मनसोक्त, भरपूर
22) विवाह, परिणय
24) सरकारी देणे
25) उत्पादित वस्तू ग्राहकांपर्यंत वितरीत करणे
27) राष्ट्रभाषेत आम्ही
28) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
30) झाडाची फांदी
32) गाल
33) ओझे वाहणारा मजूर
35) निशाण, स्मृतिचिन्ह
37) दिवा लावण्यासाठी असलेला धातूचा स्तंभ
38) मोजता न येणारे
40) पोह्यांचा एक खमंग व रुचकर पदार्थ
42) उद्यानंतर येणारा दिवस
43) एक अप्सरा
44) मुलगी, अभिनेत्री काजोलची आई
45) लक्षण, खूण
46) अंगिकारलेले व्रत
48) ध्वनी, आवाज
49) जागा, थारा
51) फार खोल, गंभीर
53) सुगावा, संबंध
56) वायू, हवा
58) हल्ली असलेले
60) शारीरिक त्रास
61) शर, बाण
63) लोकांना फसविणारा, ढोंगी
65) चाल, वहिवाट
66) लहान दरी, खोरे
67) एकसारखा मारा, हल्ला
68) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
69) खिडकी, झरोका
70) दुर्दशा
71) नृत्य करणारा
73) राखड
74) भ्रमर
75) त्वरित, शीघ्र
76) वस्त्र
77) वर्तुळाच्या मध्यबिंदूपासून परिघापर्यंतचे अंतर दाखविणारी सरळ रेषा
78) एक तेल बी
79) पति, यजमान

**—: उभी विधाने :—**

1) गानसम्राज्ञी लता दीदींना मिळालेली एक पदवी
2) लाभ करुन देणारे
3) फुलांची माळ
4) विहिरीतून पाणी काढण्याचे एक पात्र
5) झणझणीत
6) चांगल्या लक्षणाची
7) राष्ट्रभाषेत निश्चित
8) मागण्या पूर्ण होईपर्यंत कामकाज बंद ठेवणे
9) धैर्य, हिंमत
10) अंदाज
15) कान व डोळ्यामधील जागा
17) कासव (सं.)
18) चढाओढ
21) लाक्षणिक अर्थाने म्हातारा मनुष्य
22) पांथस्थांना पाणी पाजण्यासाठी केलेली सोय
23) सूर्यमालिकेतील मुख्य गोल
25) भाजी वगैरे चिरण्याचे साधन
26) एकेक बाब घेऊन
28) घाण, विष्ठा
29) आपली आठवण रहावी म्हणून दिलेली एखादी वस्तू
31) हात
34) पराभव
36) मिठी
37) विद्येची देवता
38) दुर्लक्ष, बेफिकीरी
39) धाकटा भाऊ
41) डाव्या हाताने सहज कार्य करणारा
43) फळफळावळ
45) भोजनारंभी काही घास ताटाबाहेर काढून ठेवणे
47) झाडाची त्वचा
50) रावणाची पत्नी
51) एक आणि पाव मिळून होणारी संख्या
52) एखाद्या गोष्टीचा प्रथम आरंभ करणारा
54) क्रोध
55) शरीर संरक्षणार्थ असलेला मनुष्य
57) स्वतःबद्दल असलेला अभिमान
59) मस्तक, कपाळ 62) शुष्कता
63) काठी, लाक्षणिक अर्थाने परवानगी न घेता सुटी घेणे
64) हात, हस्त
66) धाक दाखविण्यासाठी मोठ्याने बोलणे
67) चुरमुरे, फुटाणे इ. भाजके पदार्थ विकणारा
69) श्रीगणेश
70) फुलांतील रजःकण
71) इच्छापूर्ती साठी देवाजवळ काही संकल्प करणे
72) एक रंग
75) एक श्रीराम पुत्र ●
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सू | र्य | वं | शी | | क | र्म | ध | र्म | सं | यो | ग | | दु | र्मी | ळ | सं | धी |
| र्या | | द | ल | द | ल | | न | | ग्र | | र | स | म | | | धी | |
| स्त | व | न | | ग | म | न | | | हा | व | भा | व | | वा | र | सा | |
| | क्तृ | | स | डा | | स | म | तो | ल | | | ल | क | डा | | धू | प |
| स | त्व | र | | व | ज | | | | य | म | या | त | ना | | न | | र |
| | श | त | | र | त | न | बा | व | | रु | | | त | रा | फा | | स |
| यु | क्ती | | प्रा | ची | न | | व | | सां | ज | वा | त | | ज | | धं | दा |
| ग | | ए | | रे | | स | न | ई | | ल | | रु | जु | वा | त | | र |
| प्र | ती | क | | घ | डा | | क | | आ | भू | ष | ण | | डा | | नौ | |
| व | र | व | र | | क | ळ | शी | | र | मी | | पि | त्त | | भि | का | री |
| र्त | | च | व | | बं | | | प | क्ष | | क | ढी | | | र | | |
| क | फ | नी | | सं | ग | म | | द | ण | क | ट | | | अ | का | र | ण |
| | रा | | वि | | ला | ल | स | र | | ल | क | ब | | न | व | स | |
| वि | स | र | भो | ळा | | य | | मो | र | | ट | र | का | व | णे | | बी |
| | खा | ती | र | | | गि | धा | ड | | ष | | सा | ग | र | | च | |
| ज | ना | ब | | सा | म | री | क | | ध | ड | ग | त | | त | क | ला | दू |
| न | | | | ख | स | | | वि | र | ज | ण | | आ | | व | ख | र |
| ता | का | स | तू | र | ला | गू | न | दे | णे | | क | जा | ग | | डी | | स्थ |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** अडकलेले पैसे मिळणार नाहीत. प्रयत्न यशस्वी होतील. प्रवास करताना काळजी घ्या. तुम्हाला घरातून आणि बाहेरून पाठिंबा मिळेल. नफा वाढेल.

**वृषभः** नवीन आर्थिक धोरण राबविण्याचे धाडस तुम्ही करू शकाल. कामाच्या ठिकाणी बदल होतील. विरोध होईल. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. आदर वाढेल.

**मिथून :** सरकारी हस्तक्षेप असेल. तुमची भेट एखाद्या प्रभावशाली व्यक्तीशी होईल. घर आणि कुटुंबाबद्दल चिंता राहील. दुसऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करणे टाळा.

**कर्क :** दुखापत आणि अपघातामुळे नुकसान होऊ शकते. विशेषतः महिलांनी काळजी घ्यावी. आरोग्य कमकुवत राहील. तुमच्या जवळच्या व्यक्तीचे वर्तन चांगले राहणार नाही. मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवा.

**सिंह :** तुम्हाला सरकारी मदत मिळेल. शारीरिक त्रास संभवतो. घाई नाही. तुमच्या उत्साहावर नियंत्रण ठेवा. विवेक वापरा. कुटुंबाचा पाठिंबा वेळेवर मिळेल.

**कन्या :** दुखापत आणि अपघात इत्यादींमुळे मोठे नुकसान होऊ शकते. वाईट लोक नुकसान करू शकतात. जुनाट आजारामुळे अडथळा येऊ शकतो.

**तुळ :** कायदेशीर मदत वेळेवर मिळेल. अडथळे दूर होतील आणि फायदेशीर परिस्थिती निर्माण होईल. तुम्हाला मित्र आणि नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल.

**वृश्चिक :** तुम्हाला दुःखद बातमी मिळू शकते. धीर धरा. आरोग्य कमकुवत राहील. बेफिकीर राहू नका. जास्त धावपळ होईल. काम पूर्ण करण्यात अडथळे येण्याची शक्यता आहे.

**धनु :** तुमच्या मेहनतीचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल. सामाजिक चौकशी वाढेल. प्रलंबित कामे पूर्ण होतील. आनंद वाढेल. कुटुंबाकडून सहकार्य मिळेल.

**मकर :** तुम्हाला जुने विसरलेले मित्र आणि नातेवाईक भेटतील. तुम्हाला हवी असलेली माहिती मिळेल. वाद घालू नका. एखाद्या व्यक्तीचे वर्तन तुमच्या इच्छेनुसार होणार नाही.

**कुंभ :** नोकरी मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. तुम्हाला भेटवस्तू आणि भेटवस्तू मिळतील. जोखीम घेण्याचे धाडस करू शकाल. एखाद्या मोठ्या समस्येवर तोडगा निघू शकतो. आनंद असेल.

**मीन :** अनपेक्षित खर्च येतील. तुम्हाला कर्ज घ्यावे लागू शकते. जुना आजार तुम्हाला त्रास देऊ शकतो. बोलण्यात संयम आवश्यक आहे. जे काम केले जात आहे ते खराब होऊ शकते.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### २६/११ मुंबई हल्ल्यातील शहीद अंबादास पवारांच्या पत्नीची थेट पोलीस उपअधीक्षकपदी नियुक्ती




**मुंबई :** मुंबईवर २६ नोहेंबर २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्यात वीर मरण आलेल्या पोलीस शिपाई अंबादास पवार यांच्या पत्नी कल्पना पवार यांना परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षकपदी नियुक्ती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्रीमती पवार यांना परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक पदावरील थेट नियुक्तीचे आदेश प्रदान केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी सतत सर्वसामान्य जनतेला न्याय दिला आहे. राज्यातीला सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेणारे व राज्यातील महिलांचे लाडके भाऊ असलेले मुख्यमंत्री फडणवीस यांनी शहीद पोलीस यांच्या पत्नीस थेट पोलीस उपअधीक्षक पदावरील थेट नियुक्तीचे आदेश दिल्याने त्यांची शहीदांप्रति असलेली संवेदनशीलता दिसून आली आहे, अशी भावना कल्पना पवार यांनी मुख्यमंत्री व राज्य शासनाचे आभार मानताना व्यक्त केली. कल्पना पवार म्हणाल्या, 'माझ्या पती प्रमाणेच मलाही देशसेवा करण्याची संधी दिली आहे. हे सरकार शेतकरी, कष्टकरी, लाडक्या बहिणी आणि देशाच्या रक्षणार्थ प्राणाचे बलीदान दिलेल्या शहीद वीरांचे आहे. हे माझ्या नियुक्तीतून पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.'

### पक्षाला दिशा देण्यासाठी बोलाविलेल्या बैठकीत वाद, मारामारी; सांगलीत काँग्रेस



#### बैठकीतील प्रकार

**सांगली :** थंडावलेल्या पक्षकार्याचा आढावा घेत नवी दिशा देण्यासाठी बोलावलेल्या काँग्रेस बैठकीत जोरदार वादावादी होत पुढे एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रकारही घडला. पक्षधोरण ठरवण्यासाठीच्या बैठकीत निमंत्रण देण्यावरूनच हमरीतुमरीचा प्रकार झाला. हा वाद वाढत जात विधानसभा निवडणुकीवेळी बंडखोर उमेदवाराचा प्रचार केल्यावरून शहराध्यक्ष संजय मेंढे यांना घेरण्याचा प्रयत्न झाला, तर बैठकीचे निमंत्रण का दिले नाही यावरून मेंढे यांनी पक्ष निरीक्षकांनाच धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. राज्यातील काँग्रेस पक्षाला आलेली मरगळ दूर करण्यासाठी तसेच नवी दिशा देण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने सध्या प्रत्येक जिल्ह्यात अशा बैठकांचे आयोजन केले आहे. या अंतर्गतच मिरजेतील गुलाबराव पाटील शैक्षणिक संकुलामध्ये पक्ष कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी पक्षकार्याचा आढावा, पक्षाला आलेली मरगळ झटकत नवी दिशा देण्याचा कार्यक्रम ठरवला होता. यासाठी

### भरत गोगावलेंच्या समक्ष शिवसेना पदाधिकाऱ्यांमध्ये गोंधळ

**सोलापूर :** शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे नेते, रोजगार हमी योजना खात्याचे मंत्री भरत गोगावले यांच्या सोलापूर दौऱ्यात त्यांच्या समक्ष पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये वादाचा प्रकार झाला. हे प्रकरण थेट पोलीस ठाण्यात गेले. यात एका पदाधिकाऱ्यांसह पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. मंत्री गोगावले हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. यानिमित्ताने त्यांनी पक्षाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्या सात रस्त्यावरील कार्यालयात सदिच्छा भेट दिली. त्यावेळी गोगावले हे प्रसार माध्यमांशी बातचित करीत असताना पक्षाचे दुसरे पदाधिकारी, शहर प्रमुख मनोज शेजवाल हे शासकीय विश्रामगृहात मंत्री गोगावले यांना येण्यास उशीर होत असल्याने काळजे कार्यालयात आपल्या समर्थकांसह आले. मंत्री गोगावले यांना शासकीय विश्रामगृहात येण्यास उशीर होत असल्याबद्दल शेजवाल यांनी मनीष काळजे यांना जाब विचारला. त्यावेळी दोघांत शाब्दिक बाचाबाची झडत असताना मंत्री गोगावले तेथेच होते. त्यांच्यासमोर काळजे आणि शेजवाल यांच्यात शिवीगाळ आणि दमदाटी होऊन थेट हाणामारीपर्यंत मजल गेली. गोगावले यांनी हस्तक्षेप करून दोघांना आवरले. तथापि, नंतर मनीष काळजे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात धाव घेऊन मनोज शेजवाल यांच्यासह त्यांचे सहकारी शिवसैनिक समर्थ बिराजदार, सागर सोलापुरे, उमाकांत कारंडे, राजू शिंदे आदींविरुद्ध फिर्याद दाखल केली. शेजवान व इतरांनी आपणास शिवीगाळ करून मारहाण केली आणि जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तथापि, शेजवाल यांनी आपल्यावरील आरोप फेटाळले आहेत. काळजे यांना आपण अजिबात शिवीगाळ आणि मारहाण केली नाही.

## 'केंद्र सरकारने या हल्लेखोरांचा आता असा बंदोबस्त करावा की'

# हल्लेखोरांच्या पुढच्या १० पिढ्यांचासुद्धा थरकाप उडायला हवा

### राज ठाकरेंनी संताप व्यक्त केला

**मुंबई : दि. २३** वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये उन्हाळी सुट्ट्यांमध्ये काश्मीरमध्ये पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या निरपराध पर्यटकांवर दहशतवाद्यांनी गोळ्या झाडल्या, यात २८ जणांचा मृत्यू झाला असून महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे.

सोशल मीडियावरून राज ठाकरे यांनी पोस्ट लिहिली आहे आहे. 'केंद्र सरकारने या हल्लेखोरांचा आता असा बंदोबस्त करावा की या हल्लेखोरांच्या पुढच्या १० पिढ्यांच्या ते आठवून सुद्धा थरकाप उडायला हवा'अशा शब्दांत राज ठाकरेंनी संताप व्यक्त केला आहे.जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना तीव्र निषेध व्यक्त करत आहे. या घटनेत जे लोक मृत्यूमुखी पडले, त्यांना



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भावपूर्ण श्रद्धांजली... ही घटना अतिशय गंभीर आहे आणि या प्रसंगात सरकारच्या पाठीशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पूर्णपणे उभी राहील.केंद्र सरकारने या हल्लेखोरांचा आता असा बंदोबस्त करावा की या हल्लेखोरांच्या पुढच्या १० पिढ्यांच्या ते आठवून सुद्धा थरकाप उडायला हवा... १९७२ साली म्युनिक ऑलिम्पिकच्या वेळेस इस्रायली खेळाडूंवर पॅलेस्टिनी अतिरेक्यांनी हल्ला केला... यानंतर इस्रायलने या अतिरेक्यांना, या हल्ल्याच्या सूत्रधारांना अशा पद्धतीने मारलं होतं की पुढे दीर्घकाळ पॅलेस्टिनी लोकांच्या मनात दहशत बसली होती. भारताचे आणि इस्रायलचे संबंध उत्तम आहेत... केंद्र सरकार इस्रायल सरकारच्या पाऊलावर पाऊल टाकून या दहशतवाद्यांना आणि त्यांच्या मागच्या एकूण एक पाठीराख्याना कायमच संपवेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.या हल्ल्याबद्दल वाचताना एक धक्कादायक गोष्ट समोर आली... एका प्रत्यक्षदर्शी महिलेने सांगितलं की हल्लेखोरांनी गोळ्या झाडताना समोरच्याच्या धर्म विचारला... ही तुमची मुजोरी ? मी अनेकदा माझ्या भाषणात म्हणतो तसं की या देशात आमच्या हिंदूंवर जर कोणी अंगावर याल तर आम्ही

हे सगळं करताना केंद्र सरकार कठोर होईल याबद्दल माझ्या मनात कुठलीच शंका नाहीये... आणि त्यांच्या मागे या देशातील सगळे राजकीय पक्ष उभे राहतील. सरकारने एकदाच काय तो दणका द्यावा, बाकीच्यांचं माहित नाही पण महाराष्ट्र नवनिर्माण सेना नक्की सरकारच्या सोबत असेल.

सगळे हिंदू म्हणून एकत्र येऊन तुमच्या अंगावर जाऊ... या हल्लेखोरांच्या मागचे सूत्रधार कुठेही लपले असू देत त्यांना आपली शक्ती काय आहे हे कळलंच पाहिजे...केंद्र सरकारने काश्मीरमधून ३७० कलम हटवलं. त्यानंतर सगळं जरा सुरळीत होत आहे आणि पर्यटकांचा ओघ वाढला आहे असं दिसत असताना, जर असा हल्ला झाला तर भविष्यात काश्मीरमध्ये जमीन विकत घेऊन, उद्योगधंदे कोण सुरु करेल ? त्यामुळे केंद्र सरकारने याचा विचार करून ठोस कृती आखावी....

## पहलगाम हल्ल्यात पुण्यातील दोन जिगरी मित्रांचा मृत्यू

**पुणे, दि. २३** वृत्तसंस्था

जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या दहशदवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देशामध्ये एकच खळबळ उडाली आहे. पहलगामच्या बैसरन खोऱ्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये पर्यटकांवर निशाणा साधण्यात आला आहे. या हल्ल्यामध्ये २६ जणांनी आपला जीव गमवावा लागला आहे. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाच्या टीआरएफ म्हणजेच 'द रेझिस्टंट्स फ्रंट' ने घेतली आहे.

दहशदवादी हल्ल्यामध्ये एकूण २६ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये मुंबई, पुणे आणि नागपूरमधील लोकांचा देखील समावेश आहे. महाराष्ट्रातील एकूण सहा जणांचा यामध्ये मृत्यू झाला आहे. पुण्यातील दोन जिगरी मित्रांचा या दहशदवादी हल्ल्यामध्ये दुर्दैवी मृत्यू झाला आहे. कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे असे या दोघांचे नाव आहे. गणबोटे आणि जगदाळे कुटुंबावर यामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या नातेवाईकांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले होते.




कौस्तुभ गणबोटे यांच्या काकूंशी माध्यम प्रतिनिधींनी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या की, आमचा त्यांच्यासोबत काहीही संपर्क झालेला नव्हता. मला तो फिरायला गेला आणि त्याच्यावर हल्ला झाला, असं मला माझ्या मोठ्या सूनेने सांगितलं. घरातील कोणाचाही त्यांच्याशी संपर्क झाला नाही. कौस्तुभच्या बायकोचा फोन आला होता. तो घरी आला होता, तेव्हा मी जाणार आहे फिरायला तिकडे असं तेव्हा त्यांनी मला सांगितलं होतं, मी आता नाहीये इकडं तेवढंच बोलला. कौस्तुभ गणबोटे यांची पत्नी सुरक्षित आहे, आम्हाला कोणीच काही सांगत नव्हतं नेमकं काय झालंय. आम्ही नवरा बायको असतो, त्यामुळे घरातील कोणीच आम्हाला सांगत नव्हते, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. कौस्तुभ गणबोटेच्या काकू पुढे म्हणाल्या की, कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे हे दोघे खूप जवळचे मित्र होते. त्या दोघांचा त्या ठिकाणी मृत्यू झाला आहे.

## बुलडाण्यातील पाच पर्यटक दहशतवादी हल्ल्यातून थोडक्यात वाचले

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

दहशवादी हल्ल्याने काश्मीर हादरलं आहे. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येते आहे. जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन पर्वतावर फिरायला गेलेल्या पर्यटकांच्या गटावर दहशतवाद्यांकडून बेछूट गोळीबार करण्यात आला. या घटनेत २६ पर्यटकांचा मृत्यू झाला

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, यात हॉटेल मालकाच्या सावधगिरीमुळे महाराष्ट्रातील बुलढाण्यातील पाच पर्यटकांचा जीव वाचला आहे. मंगळवारी काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. हॉटेल मालकाच्या प्रसंगावधनामुळे महाराष्ट्रातील पाच लोकांचा जीव वाचला आहे. यात सध्या बुलढाणा जिल्ह्यातील पाच जण पहलगाम



मध्ये अडकले आहेत. मंगळवारी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. तेव्हा पाच जण तेथील हॉटेल मधेच होते. बुलढाण्यातले हे पाचजण हॉटेलबाहेर पडणार होते तेव्हाच हॉटेल मालकाने त्यांना थांबवले.त्यांना सांगितले की, गोळीबार सुरु झाला आहे.बाहेर फिरायला पडू नका. बुलढाण्यातील पाच जण १८ तारखेला फिरायला जम्मू काश्मीर मध्ये गेले होते.यामध्ये तीन पुरुष व दोन महिला आहेत. अरुण जैन यांचे भाऊ व त्यांची पत्नी व तीन मुले असा समावेश आहेत. जेव्हा गोळीबार

### हॉटेल मालकाच्या प्रसंगावधानामुळे वाचला जीव

सुरु झाला तेव्हा बुलढाण्यातील कुटुंब तिथेच हॉटेलमध्ये होते. गोळीबाराच्या आवाजाने हे कुटुंब खूप घाबरलं होतं. सध्या हे जैन कुटुंब हॉटेलमध्येच आश्रयला आहे. एकूण पाच लोक आहेत. यामध्ये २ महिला , ३ पुरुषांचा समावेश आहे.काश्मीरमध्ये अडकलेल्या या पाच जणांची नावे निलेश जैन, पारस अरुण जैन, ऋषभ अरुण जैन, श्वेता निलेश जैन, अनुष्का निलेश जैन अशी आहेत. हे सगळेजण १८ एप्रिलला मुंबईहून काश्मीरला निघाले होते. जम्मू काश्मीर मधील सर्व ठिकाणी फिरुन झाल्यानंतर २१ तारखेला रात्री पहलगामच्या हॉटेलमध्ये आले. २२ तारखेला सकाळी पहलगामध्ये फिरायला निघणार तेवढ्यात हॉटेलच्या लोकांनी गोळीबार झाल्याचे व बाहेर न पडण्यास सांगितले. आता हे कुटुंब सुखरूप असल्याची माहिती मिळाली आहे.

## राज-उद्धव एकत्र येवू द्या, मग मविआचे पुढे ठरवू- विजय वडेट्टीवार

**नागपूर, दि.२३** वृत्तसंस्था

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सध्या सुरू झाल्या आहेत. दोन्ही ठाकरे बंधुंकडून यावर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर यावर अनेक राजकीय प्रतिक्रिया समोर आल्या. ज्यावरून काहींनी टीका केली तर काही दोघांच्याही एकत्र येण्याच्या चर्चांचे स्वागत केले.दरम्यान, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्यावरून काँग्रेसकडून पहिल्यांदाच प्रतिक्रिया देण्यात आली आहे. राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र येण्याबाबत काँग्रेसची भूमिका स्वागताची आहे. राज-उद्धव एकत्र आले तर मविआचं काय करायचं ते ठरवू. आधी त्या दोघांचं काय ते ठरवू द्या, असं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत. विजय वडेट्टीवार म्हणाले, महाविकास आघाडी ही काही २०-२५ वर्षांची नाही. दोन पक्षांच्या विचारधारा वेगळ्या आहेत. त्या वेळची राजकीय गरज म्हणून मवीआ तयार झाली.

## कोयनातील गाळ काढण्याचे एकनाथ शिंदे यांचे आदेश

**सातारा, दि. २३** वृत्तसंस्था

कोयना कांदाटी खोऱ्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचे बंधारे या ठिकाणी बांधण्याचे व कोयना धरणातील गाळ काढण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. श्री उत्तरेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त दरेगावी (ता. महाबळेश्वर) आले होते. पाच दिवसांचा दौरा आटोपून मुंबईच्या दिशेने रवाना होण्यापूर्वी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील कोयना जलाशयातील बुडीत बंधाऱ्यांच्या योजनांची पाहणी केली. विविध विकासकामांचा आढावा यावेळी त्यांनी घेतला. ज्या गावांमधून नव्या बंधाऱ्यांची मागणी होती, त्या ठिकाणांचीही श्री. शिंदे यांनी पाहणी करून तेथील शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधला.या वेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक समीर शेख, सातारा जिल्हा



परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन उपस्थित होते. कोयना कांदाटी परिसरात शेती व पिण्यासाठी वर्षभर पाणी पुरेल, असे नियोजन आहे. सिमेंट व कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधले जाणार आहेत.कोयनेच्या पाणलोट क्षेत्रात ज्या ठिकाणी पाणी कमी झाले आहे आणि भूभाग उथळ झालेला आहे, अशा ठिकाणी दोन वर्षांमध्ये गाळ काढण्याचे काम झाले होते. यावर्षीही त्याठिकाणी पुन्हा गाळ काढण्यात यावा, असे निर्देश या वेळी दिले, तसेच महाबळेश्वर येथे २ ते ४ मे दरम्यान होत असलेल्या 'महापर्यटन महोत्सवा' संदर्भात या वेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

## ज्यांना युतीत रहायचे आहे त्यांनी रहावे: मंत्री अतुल सावे

**नांदेड, दि.२३** वृत्तसंस्था

तांडा वस्ती सुधार निधीवरून शिंदेसेनेच्या आमदाराने नाराजी व्यक्त करत थेट नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांना खरमरीत पत्र पाठवून इशारा दिला होता. त्यावर मंत्री अतुल सावे यांनी प्रत्युत्तर देत शिंदेसेनेच्या आमदाराला थेट इशारा दिला आहे. पाच वर्ष आमच्याकडे २३७ आमदार आहेत, आम्ही युतीत काम करतो, ज्यांना युतीत राहायचे त्यांनी राहावे ज्यांना नसेल राहायचे ते बाहेर पडतील, अशी प्रतिक्रिया अतुल सावे यांनी नांदेडमध्ये दिली. महायुतीच्या आमदारांनी तांडा वस्ती निधी वरून नाराजी व्यक्त केल्यानंतर मंत्री अतुल सावे मंगळवारी नांदेडला आले होते.

नांदेड जिल्ह्यातील हदगावचे शिंदेसेनेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी उघड नाराजी व्यक्त करत मंत्री अतुल सावे यांना खरमरीत पत्र लिहिले होते. तांडा वस्ती सुधार योजनेच्या निधीबाबत अनेक पत्रव्यवहार करूनही मंजुरी न देता पक्ष विरोधी लोकांना मंजुरी दिली. ही गंभीर बाब




असून नांदेड दौऱ्यावर आल्यावर याबाबत असंख्य कार्यकर्ते घेऊन जाब विचारणार असा इशारा कोहळीकर यांनी पत्रात दिला होता. त्यावर मंत्री अतुल सावे यांनी देखील शिवसेना आमदाराला प्रत्युत्तर दिले आहे.

विशेष म्हणजे नांदेड जिल्ह्यातील तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या निधीवरून महायुतीचे काही आमदार नाराज असल्याचे चित्र आहे.

भाजपचे आमदार तुषार राठोड आणि आमदार भीमराव केराम यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पालकमंत्री अतुल सावे यांची तक्रार केली होती, त्यांनतर मुख्यमंत्री फडवणीस यांनी मुखेड कंधार या दोन तालुक्यातील ७ कोटी २५ लाख रुपयाच्या कामांना स्थगिती दिली. शिवाय आमदार बाबुराव कोहळीकर यांनी देखील आक्षेप व्यक्त करत महायुतीला घरचा आहेर दिला आहे. दरम्यान पालकमंत्री अतुल सावे यांनी शिवसेना आमदाराला थेट इशारा दिल्याने राजकीय वर्तुळात हा विषय चर्चेचा बनला आहे.

## सोलापुरात १०२५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित

**सोलापूर, दि.२३** वृत्तसंस्था

गाववाड्यातील मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणाच्या सोडती मंगळवारी काढण्यात आल्या. यातून 'कहीं खुशी, कहीं गम' असे संमिश्र चित्र पाहायला मिळाले. सोलापूर जिल्ह्यातील १०२५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात आले. ज्या त्या तालुक्यातील तहसीलदारांच्या उपस्थितीत पुढील २०२५ ते २०३० या पाच वर्षांसाठी ग्रामपंचायत सरपंच आरक्षण ठरले. आरक्षण सोडत काढताना गावागावांतील अनेक इच्छुक मंडळी उपस्थित होती. यात आरक्षणाचा फटका बसल्यामुळे काही जणांच्या पदरी निराशा आली, तर पूरक आरक्षणामुळे सरपंचपदाची संधी मिळण्याच्या आशेमुळे बरेच इच्छुक कामाला लागले. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या आणि तालुक्यातील बड्या राजकीय नेत्यांशी संबंधित असलेल्या गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच



आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. यात काहीजणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. तर काहीजणांच्या आशेवर पाणी फेरले गेल्याचे दिसून आले.

अक्कलकोट तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीतून ठरले. यात हन्नूर जेऊर, नागणसूर, कुरनूर, शिरवळ, चुंगी, पितापूर, वागदरी, कर्जाळ, हैद्रा आदी नेहमीच राजकीयदृष्ट्या चर्चेत राहणाऱ्या गावांमध्ये सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटाला लाभले. यातील काही ठिकाणी महिलांना संधी मिळणार आहे. भाजपाचे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या गावाच्या सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटातील महिलेला मिळाले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील ८६ ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षणाद्वारे निश्चित झाले. यात टाकळी, कुडल हत्तरसंग (अनुसूचित जाती), बोरामणी, होटगी, नांदणी, गुंजेगाव (ओबीसी), नुसती, कासेगाव, कुंभारी, भंडारकवठे, आहेरवाडी आदी गावांचे सरपंचपद खुल्या गटाला मिळाले आहे.

मंगळवेढा तालुक्यातील ७९ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण ठरविण्यात आले. यापैकी ४६ गावांना खुल्या गटातील आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यात २३ महिलांचा समावेश आहे. माढा तालुक्यात अनुसूचित जाती ढवळस, आकुंबे, वडाची वाडी येथे आरक्षण निश्चित झाले. तर टेंभुर्णी, अंजनगाव खेलोबा, बारलोणी, पिंपळखुंटे, जामगाव, सापडणे, मोडनिंब आदी ठिकाणी खुल्या प्रवर्गासाठी सरपंचपद आरक्षित झाले आहे. माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या निमगावसह पिंपळनेर, सुलतानपूर, उजनी, वाकाव, लऊळ आदी ठिकाणी खुल्या गटात महिला सरपंच होणार आहेत.

## राज्यात ८० अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**मुंबई, दि.२३** प्रतिनिधी

राज्यातील ८० उपजिल्हाधिकाऱ्यांना अप्पर जिल्हाधिकारी या पदावर बढती देऊन त्यांच्या नियुक्तींचे शासन आदेश आज काढण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, तहसीलदारपदाचीही निवड देखील लवकरच होणार आहे.

दीड महिन्याआधी महाराष्ट्रात साठ अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवडश्रेणीत देऊन त्यातील ३४ अधिकाऱ्यांना जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष करण्यात आले होते. त्या निर्णयामुळं विद्यार्थ्यांना तातडीने जात प्रमाणपत्रे मिळण्यास गती मिळाली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शंभर दिवसांच्या धडक कृती कार्यक्रमातील हा एक महत्त्वाचा निर्णय आहे. आजच्या पदोन्नती निर्णयामुळे विदर्भ व मराठवाड्यातील अधिकाऱ्यांची अनेक रिक्त पदे भरण्यात आली आहेत.



महसूल विभागातील एकाच ठिकाणी अनेक वर्ष राहण्याचा पायंडा या बदली व पदोन्नतीमुळे बदल्यात आला. दुर्गम भागात अनेक वर्ष राहिलेल्या अधिकाऱ्यांना मुंबई, पुणे या शहरातही बढती व बदली देण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी पदांवरील नेमणुकीमुळे आता महसूल विभागातील जिल्हास्तरीय सुनावण्या मोठ्या प्रमाणात होऊन त्यांचा निपटाराही होईल.

चंद्रशेखर बावनकुळे हे महसूल मंत्री झाल्यापासून महसूल विभागातील आस्थापनाविषयक अनेक प्रलंबित कामे झपाट्याने मार्गी लागले आहेत. या संपूर्ण बढत्यांमध्ये पारदर्शकता आहे. वर्षानुवर्षे बढत्या होत नसल्यामुळे उपजिल्हाधिकारी वर्गात शिथिलता आली होती आजच्या या आदेशाने अधिकारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

यापूर्वी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचे निवड श्रेणी पदी नियुक्तीचे आदेश देण्यात आले. जात पडताळणी समितीवर महाराष्ट्रभर अध्यक्ष नेमण्यात आले. उपजिल्हाधिकाऱ्यांनाही निवड श्रेणीचा दर्जा देण्यात आला तसेच आज उपजिल्हाधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर बढती देऊन त्यांची पदस्थापना ही करण्यात आली.महसूल विभागात गेल्या १५ ते १९ वर्षापासून उपजिल्हाधिकारी पदांवरील अधिकाऱ्यांना बढती देण्यात आली नव्हती. एकाच पदावर अनेक वर्षे काम केल्याने येणारा तोच तोपणा या निर्णयाने निघून, महसूल विभागात नवचैतन्य निर्माण व्हावे, अशी अपेक्षा आहे. दरम्यान, विदर्भ आणि मराठवाड्यात अनेक पदे रिक्त होती.या निर्णयामुळं आता विदर्भ व मराठवाड्यातील अधिकाऱ्यांची अनेक रिक्त पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा हा मोठा निर्णय मानला जात आहे. त्याचबरोबर दुर्गम भागात अनेक वर्ष राहिलेल्या अधिकाऱ्यांना मुंबई, पुणे या शहरातही बढती व बदली देण्यात आल्याची माहिती देखील देण्यात आली आहे.

## आयपीएल गुणतालिका

| Teams | M | W | L | T | NR | PTS | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुजरात | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +1.104 |
| दिल्ली | 8 | 6 | 2 | 0 | 0 | 12 | +0.657 |
| बेंगलुरु | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.472 |
| पंजाब | 8 | 5 | 3 | 0 | 0 | 10 | +0.177 |
| लखनौ | 9 | 5 | 4 | 0 | 0 | 10 | -0.054 |
| मुंबई | 8 | 4 | 4 | 0 | 0 | 8 | +0.483 |
| कोलकाता | 8 | 3 | 5 | 0 | 0 | 6 | +0.212 |
| राजस्थान | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -0.633 |
| हैदराबाद | 7 | 2 | 5 | 0 | 0 | 4 | -1.217 |
| चेन्नई | 8 | 2 | 6 | 0 | 0 | 4 | -1.392 |

# 'म्हणून पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळू नये म्हणत असतो'

## पहलगाम हल्ल्यानंतर सनरायझर्सचा माजी खेळाडू संतापला

नवी दिल्ली : दि. २३ प्रतिनिधी

**जम्मू आणि काश्मीरच्या पलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पश्चिम बंगालचा माजी क्रिकेटपटू श्रीवत्स गोस्वामी याने पाकिस्तानशी सर्व प्रकारचे क्रिकेट संबंध तोडण्याची मागणी केली आहे. आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे प्रतिनिधित्व केलेल्या गोस्वामीने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ पाकिस्तानात न पाठवण्याच्या बीसीसीआयच्या निर्णयाचेही समर्थन केले आहे.**





श्रीवत्स गोस्वामी याने नुकतेच एक्सवर एक नोट शेअर केली आहे. ज्याचे कॅप्शन ' आता पुरे झाले', असे आहे. या नोटमध्ये श्रीवत्स गोस्वामीने लिहिले की, ''म्हणूनच मी म्हणतो की पाकिस्तानबरोबर कधीही क्रिकेट खेळू नये. जेव्हा बीसीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ पाकिस्तानला पाठवण्यास नकार दिला तेव्हा काही लोक त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते. खेळाळा राजकारणापासून वेगळे ठेवले पाहिजे.''श्रीवत्स गोस्वामीने पुढे लिहिले की, ''मला वाटते की निष्पाप भारतीयांना मारणे हा त्यांचा राष्ट्रीय खेळ बनला आहे. आणि जर ते (पाकिस्तान) असे खेळत असतील तर त्यांना समजणाऱ्या भाषेत उत्तर देण्याची वेळ आली आहे.''श्रीवत्स गोस्वामी काही महिन्यांपूर्वी काश्मीरला गेला होता. त्याचा संदर्भ देत त्याने लिहिले, ''मला खूप अस्वस्थता आणि वेदना होत आहेत. काही महिन्यांपूर्वी मी काश्मीरमध्ये खेळल्या गेलेल्या लेजेंड्स लीगचा भाग होतो. या काळात मी पहलगामला गेलो. स्थानिक लोकांना भेटलो. त्याच्या डोळ्यात मला आशा दिसली. असे वाटत होते की काश्मीर अखेर शांतता आणि स्थैर्याच्या मार्गावर आहे आणि आता पुन्हा रक्तपात. यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, आपण किती काळ गप्प राहणार? आणि आपले लोक मरत असताना आपण किती काळ हे खेळत राहणार? आता नाही. यावेळी अजिबात नाही.''श्रीवत्स गोस्वामी हा डावखुरा यष्टीरक्षक फलंदाज आहे. त्याने बहुतेक प्रथम श्रेणी क्रिकेट पश्चिम बंगाल संघाकडून खेळले आहे.

# बुमराह बनणार मुंबई इंडियन्सचा नंबर १ गोलंदाज

## मलिंगाचा विक्रम निघणार मोडीत

नवी दिल्ली : दि. २३ प्रतिनिधी

इंडियन प्रीमियर लीग २०२५ च्या ४१ व्या सामन्यात २३ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबादचा सामना मुंबई इंडियन्सशी होईल. हा सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाईल. या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या वेगवान गोलंदाजाला इतिहास रचण्याची संधी असेल. जर बुमराहने या सामन्यात दोन विकेट घेतल्या तर तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बनेल.
आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम लसिथ मलिंगाच्या नावावर आहे. या श्रीलंकन वेगवान गोलंदाजाने मुंबई इंडियन्सकडून आयपीएलमध्ये १२२ सामन्यात १७० विकेट्स घेतल्या. बुमराहने आतापर्यंत १३७ सामन्यांमध्ये १६९ विकेट्स घेतल्या आहेत आणि मलिंगाला मागे टाकण्यासाठी त्याला आणखी २ विकेट्सची आवश्यकता आहे.
या यादीत तिसऱ्या क्रमांकावर हरभजन सिंगचे नाव आहे. त्याने आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्ससाठी १३६ सामन्यांमध्ये १२७ विकेट्स घेतल्या. मिचेल मॅकक्लेनाघन चौथ्या क्रमांकावर आहे, त्याने ५६ सामन्यांमध्ये ७१ विकेट्स घेतल्या. पाचव्या क्रमांकावर किरॉन पोलार्ड आहे, ज्याने एमआयसाठी १७९ सामन्यांमध्ये ६९ विकेट्स घेतल्या.
बुमराह दुखापतीमुळे या हंगामातील पहिले ४ सामने खेळला नाही. आरसीबी विरुद्धच्या सामन्यातून त्याने पुनरागमन केले. आतापर्यंत तो ४ सामने खेळला आहे. यादरम्यान त्याने ४ विकेट घेतल्या आहेत. सीएसके विरुद्ध खेळलेल्या शेवटच्या सामन्यात तो चांगल्या लयीत दिसत होता. त्या सामन्यात त्याने ४ षटकांत २५ धावा देऊन एमएस धोनी आणि शिवम दुबे यांचे बळी घेतले. विरुद्धच्या सामन्यातही चांगली कामगिरी करून बुमराह चा नंबर १ गोलंदाज बनू शकतो. मुंबई इंडियन्सने हंगामाच्या सुरुवातीचे सामने गमावले, पण त्यानंतर हा संघ पुन्हा विजयी मार्गावर आला. त्यांनी शेवटच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा पराभव करून विजयाची हॅटट्रिक नोंदवली. मुंबई इंडियन्सने या हंगामात आतापर्यंत ८ सामने खेळले आहेत, त्यापैकी ४ सामने जिंकले असून ४ सामने गमावले आहेत. एमआय सध्या ८ गुणांसह पॉइंट्स टेबलमध्ये सहाव्या स्थानावर आहे.



# सरकार जे सांगेल ते करु, भारत- पाकिस्तान क्रिकेटबद्दल बीसीसीआयची भूमिका

## पहलगाम घटनेनंतर आक्रमक पवित्रा

नवी दिल्ली : दि. २३ प्रतिनिधी

जम्मू काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे काल (२२ एप्रिल ) दुपारच्या वेळी पर्यटकांवर भ्याड हल्ला करण्यात आला होता. या घटनेत २६ जणांनी जीव गमावला. यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश आहे.तर, २ विदेशी पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. जम्मू कास्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशभर संतापाचं वातावरण आहे. या हल्ल्याची जबाबदारी लष्कर-ए-तोयबाची या दहशतवादी संघटनेशी संबंधित द रेजिस्टंस फ्रंटनं घेतली आहे. भारतीय क्रिकेटपटूंनी दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. या दरम्यान बीसीसीआयनं देखील पाकिस्तान संदर्भात आक्रमक भूमिका घेतली आहे.
बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी या घटनेसंदर्भात संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही पीडितांसोबत असून या घटनेचा निषेध करतो, असं ते म्हणाले. बीसीसीआयनं पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणं बंद करावं का असा प्रश्न राजीव शुक्ला यांना विचारण्यात आला. यावर शुक्ला यांनी आमचं सरकार जे सांगेल ते आम्ही करु, अशी भूमिका घेतली. सरकारच्या भूमिकेमुळं पाकिस्तान विरुद्द द्वीपक्षीय मालिका खेळत नाही. यापुढं देखील द्वीपक्षीय मालिका पाकिस्तान विरुद्ध खेळणार नाही, असं राजीव शुक्ला यांनी म्हटलं. आयसीसी स्पर्धासंदर्भात विचार केल्यास आयसीसीच्या नियमांमुळं खेळतो, असं शुक्ला म्हणाले.
भारत आणि पाकिस्तान यांच्यात यापूर्वी द्वीपक्षीय मालिका २०१२-१३ मध्ये झाली होती. ही मालिका एकदिवसीय क्रिकेट सामन्यांची होती.

# केएल राहुलचा खणखणीत षटकार अन् दिल्लीचा लखनऊवर दणदणीत विजय

नवी दिल्ली : दि. २३ प्रतिनिधी

सलामी जोडीने संघाला चांगली सुरूवात करुन दिली. पण त्यानंतर आलेल्या फलंदाजांना या चांगल्या सुरूवातीचा फायदा करून घेता आला नाही. फॉर्मात असलेला निकोलस पूरने अवघ्या ९ धावांवर तंबूत परतला. तर अब्दुल समद २ धावांवर माघारी परतला. या डावात रिषभ पंतने चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला यायला हवं होतं. मात्र तो शेवटचे २ चेंडू शिल्लक असताना सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि शून्यावर बाद होऊन माघारी परतला. शेवटी आयुष बदोनीने २१ चेंडूंचा सामना करत ३६ धावांची खेळी केली. तर डेव्हिड मिलर १४ धावांवर नाबाद माघारी परतला. लखनऊला २० षटकअखेर ६ गडी बाद १५९ धावा करता आल्या.

केएल राहुल पुन्हा एकदा दिल्ली कॅपिटल्सच्या विजयाचा हिरो ठरला आहे. आपल्या जुन्या संघाविरूद्ध खेळताना केएल राहुलची बॅट चांगलीच तळपली. दिल्लीचा संघ या सामन्यात १६० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता.
या धावांचा पाठलाग करताना अभिषेक पॉवेलचं दमदार अर्धशतक, केएल राहुल आणि अक्षर पटेलच्या शानदार फलंदाजीच्या बळावर दिल्लीने ८ गडी राखून विजय मिळवला. यासह गुणतालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे. दिल्ली कॅपिटल्सला हा सामना जिंकण्यासाठी १६० धावा करायच्या होत्या. खेळपट्टी फलंदाजीसाठी चांगली होती. चेंडू बॅटवर चांगल्याप्रकारे येत होता. हे पाहता १६० धावा करणं फार कठीण काम नव्हतं. या धावांचा पाठलाग करण्यासाठी अभिषेक पॉरेल आणि करूण नायरची जोडी मैदानावर आली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ३६ धावा जोडल्या. करुण नायरने काही आकर्षक फटके मारले, पण तो १६ धावा करत माघारी परतला. अभिषेकने आपली फटकेबाजी सुरूच ठेवली. त्याने ३६ चेंडूंचा सामना करत ५१ धावांची खेळी केली. शेवटी केएल राहुल शो पाहायला मिळाला. त्याने अक्षर पटेलसोबत मिळून दिल्लीचा विजय निश्चित केलं.या सामन्यात दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून लखनऊ सुपर जायंट्सला प्रथम फलंदाजीचं आमंत्रण दिलं. लखनऊकडून डावाची सुरूवात करण्यासाठी मिचेल मार्श आणि एडन मार्करमची जोडी मैदानावर आली. या दोघांनी संघाला वादळी सुरूवात करून दिली. ज्याप्रकारे हे दोन्ही फलंदाज फलंदाजी करत होते, ते पाहता असं वाटलं होतं की लखनऊचा संघ मोठी धावसंख्या उभारणार. सलामीला फलंदाजी करताना एडन मार्करमने ३३ चेंडूंचा सामना करत ५२ धावांची खेळी केली.



# अनाया बांगरची सरफराजच्या कुटुंबाला भेट

नवी दिल्ली : दि. २३ प्रतिनिधी

आर्यन बांगरने गेल्या वर्षी हार्मोनल रिप्लेसमेंट थेरपी केली आणि आर्यन बांगरची अनाया बांगर झाली. या थेरपीनंतर तिने अनाया बांगर, अशी आपली नवी ओळख निर्माण केली आहे. काही महिने ती परदेशात होती; मात्र आता ती मायदेशात परतली आहे. भारतात आल्यानंतर तिने आपला सहखेळाडू आणि बालपणीचा मित्र सरफराज खानची भेट घेतली आहे. दोघांच्याही इन्स्टाग्राम अकाउंटवर या भेटीचे फोटो शेअर करण्यात आले आहेत.




अनाया बांगरची सरफराजच्या कुटुंबाला भेट
भारताचा विस्फोटक फलंदाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरफराज खानने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोमध्ये तुम्ही पाहू शकता की, अनाया बांगर आणि सरफराज खान त्याच्या गाडीच्या छतावर बसले आहेत. तसेच त्याचे वडील ड्रायव्हिंग सीटवर आहेत.
या खास भेटीचे फोटो शेअर करण्यासह त्याने एक जुना फोटोदेखील शेअर केला आहे. या जुन्या फोटोमध्ये आर्यन बांगरसह सरफराज खानचा भाऊ असल्याचे दिसत आहे. त्यासह त्याने आणखी एक व्हिडीओदेखील शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, अनाया बांगर सरफराज खानच्या मुलाला खेळवताना दिसून येत आहे. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. तसेच क्रिकेट चाहते या व्हिडीओवर प्रतिक्रियांचा पाऊस पाडत आहेत.सरफराज खान, मुशीर खान व अनाया बांगर तिघेही खूप चांगले मित्र आहेत. तिघांनीही एकत्र क्रिकेटचा सराव केला आहे. तिघेही एकत्र क्रिकेट खेळायचे. तिने हा व्हिडीओ शेअर करीत मुशीर खानलादेखील टॅग केले आहे. या व्हिडीओला कॅप्शन देत तिने 'मिस यू मुशीर खान', असं लिहिलं आहे. मुशीर खान सध्या आयपीएल २०२५ स्पर्धा खेळण्यात व्यग्र आहे. या हंगामासाठी झालेल्या मेगा लिलावात पंजाब किंग्जने बोली लावत त्याला आपल्या संघात स्थान दिले आहे. त्यामुळे त्याची भेट होऊ शकली नाही. तर दुसरीकडे सरफराज खान या मेगा ऑक्शनमध्ये अनसोल्ड राहिला.

# सलग सातव्या सत्रांत तेजी कायम! सेन्सेक्सची पुन्हा ८० हजाराला गवसणी



**मुंबई:** जागतिक स्तरावरील व्यापार युद्धाची तीव्रता कमी होण्याचे संकेत, परदेशी गुंतवणूकदारांचा कायम राहिलेला खरेदीवर जोर आणि जागतिक व्यापारात भारताचे अनुकूल स्थान आदी घटक भारतीय शेअर बाजारासाठी फायदेशीर ठरले आहे. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी बुधवारी (दि.२३) सलग सातव्या सत्रात वाढून बंद झाले. सेन्सेक्स ५२० अंकांनी वाढून ८०,११६ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १६१ अंकांच्या वाढीसह २४,३२८ वर स्थिरावला. आजच्या सत्रात आयटी, फार्मा आणि रियल्टी सेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात खरेदीचा जोर दिसून आला. दरम्यान, गेल्या काही दिवसांत विक्रमी उच्चांकावर गेलेला निफ्टी बँक निर्देशांकाला प्रॉफिट बुकिंगला सामोरे जावे लागले. यामुळे यात किरकोळ घसरण दिसून आली.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी करारानंतर चीनच्या आयातीवरील शुल्क (टॅरिफ) लक्षणीयरीत्या कमी होईल, असे संकेत दिल्यानंतर व्यापार तणाव निवळण्याच्या आशावादामुळे बुधवारी भारतीय शेअर बाजारात तेजी राहिली.निफ्टी आयटी आज ४.४ टक्के वाढला. निफ्टी आयटीवर एचसीएल टेक ७.६ टक्के, कोफोर्ज ६ टक्के, ओएफसीसी ५.३ टक्के, ५ टक्के आणि टेक महिंद्राचा शेअर्स ४.४ टक्के वाढला. फार्मा आणि रियल्टी निर्देशांकही प्रत्येकी सुमारे १ टक्के वाढले.सेन्सेक्सवर एचसीएल टेक, टाटा मोटर्स, टेक महिंद्रा, एम अँड एम, इन्फोसिस, टीसीएस, सन फार्मा, टाटा स्टील, भारती एअरटेल, एलटी, मारुती, बजाज फिनसर्व्ह हे शेअर्स सर्वाधिक वाढले. तर दुसरीकडे एचडीएफसी बँक, कोटक बँक, एसबीआय, ॲक्सिस बँक हे शेअर्स घसरले.गेल्या काही दिवसांपासून भारतीय शेअर बाजारात परदेशी गुंतवणुकीचा ओघ कायम आहे.

# एलॉन मस्क यांनी ट्रम्प सरकार सोडून टेस्लाकडे लक्ष द्यावे

## वॉल स्ट्रीटवरच्या प्रसिद्ध तज्ज्ञाचा सल्ला

नवी दिल्ली : दि. २३ प्रतिनिधी

एलॉन मस्क हे 'डिपार्टमेंट ऑफ गव्हर्न्मेंट इफिशियन्सी'चे (डॉज) एफिशियन्सीचं नेतृत्व करत आहेत. त्यामुळे त्यांचा ट्रम्प यांच्या प्रशासनात सहभाग वाढत असल्याने टेस्लाकडे दुर्लक्ष होत असल्याचं बोललं जातंय. यामुळे टेस्लातील गुंतवणूकदार निराश असल्याचंही म्हटलं जातं. त्यामुळे एलॉन मस्क यांनी टेस्ला किंवा ट्रम्प यांच्यापैकी एकाची निवड केली पाहिजे, असा सल्ला आता वॉल स्ट्रीटवरच्या प्रसिद्ध तज्ज्ञांनी दिला आहे.टेस्लाचे गुंतवणूकदार रॉस गर्बर यांनी टेस्लाच्या सीईओ पदावरून एलॉन मस्क यांना हटवण्याची मागणी काही दिवसांपूर्वी केली होती. त्यांनी म्हटलं होतं की, टेस्लाच्या वाढत्या हितसंबंधांकडे एलॉन मस्क यांचं लक्ष कमी झालं आहे. त्यामुळे रॉस गर्बर यांनी टेस्लाला नवीन सीईओची आवश्यकता असल्याचं नमूद केलं होतं.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेची सूत्र हाती घेतल्यापासून जगभरात ट्रम्प यांच्या प्रशासनाची चर्चा सुरु आहे. कारण टॅरिफ संदर्भात घेत असलेले निर्णय आणि त्या निर्णयाचा अनेक देशांवर होणारा परिणाम यावरून ट्रम्प यांच्या प्रशासनावर टीका होत आहे. यातच सर्वात महत्वाचं म्हणजे ट्रम्प सरकारमध्ये जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेले आणि टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क हे देखील सहभागी आहेत. ट्रम्प यांच्या प्रशासनात एलॉन मस्क 'डिपार्टमेंट ऑफ गव्हर्न्मेंट इफिशियन्सी'चे (डॉज) एफिशियन्सीचं नेतृत्व करत आहेत.
काही दिवसांपूर्वी अमेरिकेत नागरिकांनी डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्या विरोधात मोठं आंदोलन केलं होतं. ट्रम्प प्रशासनाने सरकारी नोकऱ्यांमध्ये केलेल्या कपातीचा निर्णय, देशाची अर्थव्यवस्था, मानवाधिकार आणि टॅरिफ धोरण अशा मुद्द्यांवरून अमेरिकन नागरिक आक्रमक झाले होते. सरकारी खर्च कमी करण्यासाठी मस्क यांच्या विभागाने घेतलेल्या निर्णयामुळे जवळपास २० हजार लोकांना नोकऱ्यांमधून काढून टाकलं होतं, तर शेकडो जणांनी स्वेच्छेने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला होता.या सर्व घडामोडीनंतर नागरिकांमध्ये संताप पाहायला मिळाला होता. तसेच काही नागरिकांनी उद्योगपती एलॉन मस्क यांच्या टेस्ला कंपनीच्या काही इलेक्ट्रिक कार जाळत निषेध केल्याचं पाहायला मिळालं होतं.
दरम्यान, यानंतर आता एलॉन मस्क यांनी ट्रम्प यांचं सरकार सोडून टेस्लाकडे लक्ष देण्याचा सल्ला वॉल स्ट्रीटवरच्या प्रसिद्ध तज्ज्ञांनी दिला आहे.वेडबशचे एमडी डॅन इव्हस यांनी एक्सवर (ट्विटर) म्हटलं आहे की, टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांना ट्रम्प प्रशासनातून बाहेर पडण्याची आवश्यकता आहे. तसेच इव्हस म्हणाले की वॉल स्ट्रीटचे विश्लेषक वेडबश मानतात की टेस्ला आणि एनव्हीडिया या दोन जगातील सर्वात विघटनकारी तंत्रज्ञान कंपन्यांपैकी एक आहेत. आमच्या मते एलॉन मस्क यांनी सरकार सोडावं, 'डिपार्टमेंट ऑफ गव्हर्न्मेंट इफिशियन्सी'(डॉज) मधून एक पाऊल मागे घ्यावं आणि टेस्लाचं पूर्णवेळ सीईओ म्हणून काम पाहावं'', असं म्हटलं आहे.



# दरवाढीनंतर सोन्याचे भाव किंचित कोसळले

**मुंबई:** सराफा बाजारात सोन्याचे भाव गेल्या काही दिवसांपासून गगनाला भिडले होते. सोन्यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने ऐन लग्नसराईत ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ लागत होती. अशातच आज बुधवारी सोन्याच्या दरात किंचित घसरण झाल्याचे पाहायला मिळाले आहे. तर चांदीच्या दरातही बदल झाला आहे. चला तर मग जाणून घेऊया काय आहे आजचा भावआजचे लेटेस्ट दर खाली दिले आहेत. बुलियन मार्केट या वेबसाइटनुसार, आज २३ एप्रिल २०२५ रोजी देशात १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर ९६,१६० रुपये आहे. तर २२ कॅरेटसाठी १० ग्रॅम सोन्याचा दर ८८,१४७ रुपये आहे. तर १ किलो चांदीचा दर ९६,०५० रुपये आहे. याशिवाय १० ग्रॅम चांदीचा दर ९६१ रुपये आहे. उत्पादन शुल्क, राज्य कर आणि मेकिंग शुल्कामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या किमती भारतभर बदलतात.



सोने खरेदी करताना सराफाकडून असे विचारले जाते की तुम्हाला २२ कॅरेटचे सोने खरेदी करायचे आहे की, २४ कॅरेटचे? त्यामुळे तुम्ही देखील हे जाणून घेणे आवश्यक आहे की तुम्ही खरेदी करताय ते सोनं काय शुद्धतेचं आहे. जर तुम्हाला कॅरेटबाबत माहित असेल तर ही बाब चांगली आहे आणि जर तुम्हाला माहित नसेल तर आम्ही तुम्हाला याबाबत माहिती देत आहोत.
२४ कॅरेट सोने ९९.९% शुद्ध आहे आणि २२ कॅरेट अंदाजे ९१% शुद्ध असतं. २२ कॅरेट सोन्यात तांबे, चांदी, जस्त यांसारख्या ९% इतर धातूंचे मिश्रण करून दागिने तयार केले जातात. २४ कॅरेट सोने शुद्ध असले तरी त्याचे दागिने बनवता येत नाहीत.

# विमान कंपन्यांनी तिकीटदर वाढविले; श्रीनगरहून येण्यासाठी तिप्पट भाडेवाढ

**मुंबई** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यातून आपल्या मायभूमीत परतण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत असून विमान तिकीट आणि रेल्वेचं तिकीट काढण्यासाठी एकच झुंबड उडाल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र, देशावरील दहशवादी हल्ल्याच्या संकटात काही विमान कंपन्यांनी स्वतःची संधी शोधत विमान तिकीटाचे दर तीन पटीने वाढवले आहेत. सोशल मीडियावर काही युजर्संकडून सध्याच्या विमान तिकीटाचे दर शेअर करण्यात आले आहेत. श्रीनगरहून मुंबई आणि दुसरीकडे प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांसाठी तिकीटदर वाढविण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे.
त्यानंतर, नागरी उड्डाण विभागाने देशभरातील एअरलाईन्सला निर्देश दिले आहेत. विमानकंपन्यांनी तिकीट रद्दचे चार्ज आणि चार्ज न लावण्याचे आदेश ने दिले आहेत. तसेच, विमान कंपन्यांनी तिकीट दर न वाढविण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.
डीजीसीएने २३ एप्रिल रोजी महत्वाचे आदेश जारी केले आहेत. पहलगाम येथील दुर्घटनेनंतर जम्मू काश्मीरमधील पर्यटकांकडून आपल्या मायभूमीत परतण्यासाठी मोठी झुंबड उडाली आहे. त्यामुळे, श्रीनगरहून देशभरात विमानांचे उड्डाण वाढविण्या यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, हजारो पर्यटक आणि भाविक अमरनाथ यात्रेसाठी काश्मिरला आले आहेत. मात्र, दहशतवादी हल्ल्यानंतर ते आपल्या घरी परतत आहेत. त्यामुळे, स्वस्त तिकीट दर आणि विमानांची संख्या वाढविण्याचे आदेश डीजीसीएने विमान कंपन्यांना दिले आहेत.






अजिंक्य भारत

# आपला विदर्भ

अकोला, गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५









## थोडक्यात

### गोरक्षण रोडवरील अपघातस्थळी ब्रेकर बसवा



**अकोला :** शहरातील नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर अखेर प्रशासनाने एका धोकादायक ठिकाणी असलेला गतिरोधक (स्पीड ब्रेकर) हटवला. मात्र दुसरीकडे गौरक्षण रोडवरील अपघातग्रस्त ठिकाणी अद्यापही स्पीड ब्रेकर बसवण्यात आलेला नाही. त्यामुळे या ठिकाणी पुन्हा अपघातांची शक्यता वाढली असून, या ठिकाणी त्वरित स्पीड ब्रेकर बसवावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसे जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक पंकज साबळे यांनी दिला आहे. गौरक्षण रोडवरील एका विशिष्ट वळणावर मागील काही महिन्यांत अनेक अपघात झाले असून, काही नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. तरीही प्रशासन या ठिकाणी ब्रेकर बसवण्याबाबत दुर्लक्ष करत असल्याचे आरोप नागरिकांनी केले. या पार्श्वभूमीवर पंकज साबळे यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी पंकज साबळे म्हणाले, ''ज्या ठिकाणी ब्रेकर गरज नसताना लावले जातात, तेथे हटवले गेले याचे समाधान आहे. पण जिथे खरोखर गरज आहे, जिथे अपघात घडत आहेत, तिथे दुर्लक्ष करणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे. प्रशासनाने जर दोन दिवसांत या ठिकाणी ब्रेकर बसवले नाही, तर मनसेच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात येईल.शहरातील वाहतूक सुरक्षेबाबत नागरिकांत असंतोष वाढत असून, अनेकांनी यासाठी सोशल मीडियावरही आवाज उठवला आहे. मनसेच्या या इशाऱ्यामुळे प्रशासनाला आता तातडीने कारवाई करावी लागणार आहे का, हे पाहावे लागेल.

### एल. आर. यादव यांनी अकोला आरपीएफ स्टेशन प्रभारी म्हणून घेतला पदभार

**अकोला:** अकोला रेल्वे पोलीस दलात नवीन नियुक्ती झालेल्या एल. आर. यादव यांनी अकोला आरपीएफ स्टेशन प्रभारी (स्टेशन ऑफिसर) म्हणून नुकताच पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच त्यांनी रेल्वे स्टेशनवरील सुरक्षा व्यवस्थेबाबत महत्त्वाचे संकेत दिले असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, असे स्पष्ट केले.

ठाणेदार यादव यांनी सांगितले की, ''रेल्वे परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम आणि कार्यक्षम करण्यावर आमचे प्राधान्य असेल. प्रवाशांचे हित जपणे, त्यांना सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरण उपलब्ध करून देणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.'' तसेच रेल्वे परिसरात होणाऱ्या चोऱ्या, फेरीवाल्यांचा त्रास, अनधिकृत प्रवेश यावर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.यादव यांना यापूर्वी विविध ठिकाणी कार्यानुभव असून, त्यांनी त्यांच्या सेवा काळात शिस्तप्रिय आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी अशी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या पदभार स्वीकारल्यानंतर अनेक सामाजिक संस्था, सहकारी अधिकारी व प्रवासी वर्गाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.रेल्वे सुरक्षा दलाच्या नवीन नेतृत्वाकडून अकोलावासीयांना मोठ्या अपेक्षा असून, आरपीएफच्या कार्यक्षमतेत लवकरच सकारात्मक बदल पाहायला मिळतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

### डोक्यात लोखंडी पाइपने मारहाण: भावाविरुद्ध गुन्हा दाखल

**अकोला:** लहान उमरी येथे आपल्या आजीला भेटायला गेलेल्या तरुणावर त्याच्या सख्ख्या भावानेच लोखंडी पाइपाने डोक्यात मारहाण केल्याची खळबळजनक घटना घडली असून, या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी सागर अरविंद गीते (३३), रा. गजानन महाराज मंदिर मागे, कौलखेड, यांनी फिर्याद दिली असून, त्यांच्या सख्ख्या भावावर म्हणजेच राहुल अरविंद गीते (३१) रा. लहान उमरी, याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेतील कलम ११८(१), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल अधिकारी म्हणून अजय राऊत सिव्हिल लाईन यांनी ही नोंद घेतली.फिर्यादी सागर गीते हे दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता लहान उमरी येथील आपल्या आजीकडे गेले असता, तेथे त्यांचा भाऊ राहुल हा आजीला लोटलाट करत त्रास देत होता. त्यामुळे फिर्यादी यांनी त्याला समजावले, मात्र त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्याने फिर्यादी घराबाहेर निघून गेले आणि सुजल अनासने यांच्या घराच्या मागे उभे असताना आरोपी राहुलने त्यांच्या मागून येत लोखंडी पाइपाने त्यांच्या डोक्यात जबर मारहाण केली.

या प्रकरणात फिर्यादी यांच्या जबानी रिपोर्टसह डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेत कोणतीही मालमत्ता हरवलेली अथवा मिळालेली नाही. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# दिवसाही जळतात मनपाचे स्ट्रीट लाईट्स

## खर्चाची वसुली थेट नागरिकांच्या करातून!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला: दि. २३ :** गेल्या तीन-चार वर्षांपासून शहरातील विविध भागांमध्ये महापालिकेचे स्ट्रीट लाईट्स दिवसाही चालू राहत असल्याचा प्रकार सातत्याने दिसून येतो आहे. परिणामी, लाखो रुपयांचे वीज बिल व देखभाल खर्च नागरिकांच्या खिशातून जात असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे जनतेत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शहरातील बहुतेक गल्ल्यांमध्ये दिवसा सूर्यप्रकाश असतानाही स्ट्रीट लाईट्स चालू दिसतात. यामागे विद्युत विभागाची अक्षम्य निष्काळजीपणा आणि कंत्राटदारांची उदासीनता असल्याचे स्पष्ट होत आहे. स्ट्रीट लाईट्सचे देखभाल व व्यवस्थापन कंत्राट पद्धतीने खासगी ठेकेदारांना दिलेले असतानाही, त्यांच्या कामावर कुठलाही देखरेख नाही. महापालिकेचा वीजबिलाचा खर्च दिवसेंदिवस वाढतो आहे आणि हा भार प्रत्यक्षात सामान्य नागरिकांवरच पडत आहे.



**विशेष मुद्दे :**

- ३-४ वर्षांपासून स्ट्रीट लाईट्स दिवसाही सतत सुरू वीजेचा प्रचंड अपव्यय
- महापालिकेचे लाखो रुपयांचे वीजबिल दर
- महिन्याला नागरिकांच्या करातून फेडले जाते
- ठेकेदारांकडून दुर्लक्ष, विद्युत विभागाकडून कोणतीही कारवाई नाही
- प्रत्येक लाईट पोलवर ऑन-ऑफ स्विच बसवण्याची मागणी तीव्र

अकोला शहरात हजारोंच्या संख्येने स्ट्रीट लाईट्स असून, प्रत्येक दिवशी काही तास तरी उगाचच चालू राहिल्यास लाखो युनिट वीज वाया जात आहे. महावितरणकडून नियमित वीजबिल मागणी केली जाते आणि महापालिकेला भरावा लागतो. या खर्चाचा अप्रत्यक्ष भार कररुपाने जनतेवर टाकण्यात येतो. त्यातच या लाईट्सच्या देखभाल व दुरुस्तीसाठीही भरमसाट खर्च होतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी महापालिकेकडे तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली असून, विद्युत विभागाने तातडीने ठेकेदारांना नियम पाळण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच प्रत्येक लाईट पोलवर 'ऑन-ऑफ' स्विच बसवण्याची मागणीही पुढे येत आहे, जेणेकरून वेळेनुसार लाईट बंद करता येतील.शहरातील विकासकामांवर भर देताना मूलभूत सुविधांची देखरेखदेखील तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन, दोषी ठेकेदारांवर कारवाई करणे आणि स्मार्ट व्यवस्थापनासाठी तांत्रिक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

> शहरातील प्रत्येक स्ट्रीट लाईटसाठी टायमर यंत्रणा बसवण्यात आली आहे. मात्र काही ठिकाणी यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे लाईट्स दिवसा चालू राहतात. अशा तक्रारी मिळाल्यावर आम्ही तात्काळ दुरुस्ती करतो. ठेकेदारांनाही वेळोवेळी सूचना देण्यात येतात,
>
> **- अमोल डोईफोडे**
> विद्युत विभाग प्रमुख मनपा

## अकोला जिल्हा क्रीडा रायफल व पिस्टल प्रशिक्षण केंद्राचे चार शूटर्स प्री-नॅशनलकरिता पात्र

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला: दि. २३ :**महाराष्ट्र रायफल असोसिएशन (एमआरए) यांच्या वतीने नागपूर येथे आयोजित राज्यस्तरीय रायफल आणि पिस्टल शूटिंग स्पर्धेत अकोला जिल्ह्याच्या क्रीडा रायफल व पिस्टल प्रशिक्षण केंद्राने भक्कम कामगिरी करत चार शूटर्सना प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्र ठरविले आहे. १८ ते २० एप्रिल २०२५ या कालावधीत पार पडलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये एकूण २९ गट प्रकारांमध्ये सामने खेळविण्यात आले. अकोला जिल्ह्याच्या सात शूटर्सनी प्रशिक्षक श्री. विन्सेंट अमेर यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत भाग घेतला.या स्पर्धेत सान्वी ठाकरे हिने पीप साईट एअर रायफल प्रकारात सुवर्ण पदक पटकावले.

तर स्वरित निंबाळकर याने एअर पिस्टल युथ मेन प्रकारात सुवर्ण पदक मिळवले. जयाक्षी हिरे हिने एअर पिस्टल युथ वूमेन () प्रकारात रौप्य पदक जिंकले. तसेच सोपिनाथ सदर याने एअर पिस्टल मेन प्रकारात कांस्य पदकाची कमाई केली.

## नाना गाडबैले यांचा अजित पवार गटात प्रवेश

### नागपुरात पक्षप्रवेश सोहळा, जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची राष्ट्रवादीत 'घरवापसी'

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते नाना गाडबैले, प्रा. शिवाजी राठोड यांच्यासह अनेकांनी नागपुरात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार, खा. प्रफुल्ल पटेल, खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

या प्रमुख नेत्यांसोबत सामाजिक कार्यकर्ते मिलिंद रामटेके, सुरेश मेश्राम आणि बाळू काळे यांनीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचे आणि पक्षीय फ ेरबदलांचे परिणाम जिल्ह्यातही दिसत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश महत्वाचा मानला जातो. या कार्यक्रमाला राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आमदार शिवाजीराव गरजे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विराज घुईखेडकर आणि यवतमाळ जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष सुनयना यवतकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित सर्व नेत्यांनी नव्याने प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत केले आणि त्यांना भावी राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रवेशामुळे जिल्ह्यात अजित पवार गटाला निश्चित बळ मिळेल, असे मानले जाते.

## शक्तिपीठ महामार्ग भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध तीव्र

### आधी भाव निश्चित करण्याची मागणी, महागावात एसडीओंच्या बैठकीत शेतकरी आक्रमक

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**महागाव, दि. २३ :** शक्तिपीठ महामार्गासाठी भूसंपादनास महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. जमिनीचा भाव आधी निश्चित करा, मगच मोजणी करा, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयात घेतलेल्या बैठकीत, मोबदला देण्याचे आश्वासन देऊनही शेतकऱ्यांनी मोजणीला विरोध कायम ठेवला आहे.

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला महागाव तालुक्यातील अनेक गावांमधून विरोध होत आहे. मंगळवारी (दि. २२) अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी महामार्ग सर्वेक्षणासाठी आलेल्या मोजणी पथकांना विरोध दर्शवून काम थांबवले होते. या पार्श्वभूमीवर, बुधवारी (दि. २३) उमरखेडचे उपविभागीय अधिकारी आणि नायब तहसीलदार गोदाजी राठोड यांनी महागाव तहसील कार्यालयात शेतकरी संघर्ष समिती आणि मोठ्या संख्येने उपस्थित शेतकऱ्यांसोबत एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत उपविभागीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी मोजणीला विरोध करू नये किंवा शासकीय कामात अडथळा आणू नये. शासनाच्या नियमांनुसार रेडीरेकनर दराप्रमाणे जमिनीचा योग्य मोबदला दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. मात्र, उपस्थित शेतकरी आणि शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाचा हा प्रस्ताव फेटाळून लावला. शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत सांगितले की, आधी आमच्या संपादित होणाऱ्या शेतजमिनीचा भाव निश्चित करावा, तो आम्हाला मान्य झाल्यानंतरच मोजणी करावी. तसेच, महामार्गामुळे शेतीचे तुकडे पडणार असल्याने रस्त्याच्या मधून जाण्यासाठी बोगदा मिळणार की सर्व्हिस रस्ता मिळणार, याबाबत प्रशासनाने विस्तृत माहिती द्यावी. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत आणि भाव निश्चित होत नाही, तोपर्यंत आम्हाला ही मोजणी प्रक्रिया मान्य नाही. तालुक्यात कोणत्याही परिस्थितीत भूसंपादनासाठी मोजणी किंवा सर्वेक्षण होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी यावेळी घेतली.



## म्हणे ! जानवे, सोवळे घातले तरच दर्शन !

### माजी खासदार तडस यांना मंदिर प्रवेश नाकारला : तेली समाज संतप्त

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा लाड: दि. २३ :** वर्धा मतदार संघाचे माजी खासदार रामदास तडस हे तेली समाज बांधवांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी विदर्भ दौरा करत आहेत. दरम्यान वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथील राम मंदिर मध्ये ते २२ एप्रिल रोजी दर्शन घेण्यासाठी गेले. परंतु तेथे उपस्थित असलेले मुकुंद चौरीकर (विश्वस्त) यांनी तुम्ही जानवे व सोवळे घातले नाही. त्यामुळे तुम्ही मंदिराच्या गाभाऱ्यात येऊन दर्शन घेऊ शकत नाही.असे बोलून त्यांना मनाई करून त्यांचा अपमान केला. या घटनेमुळे संपूर्ण राज्यभरातील तेली समाजात तीव्र पडसाद उमटले आहेत.

राम मंदिरात प्रवेश नाकारून असंविधानिक भाषेचा वापर केल्याबद्दल मंदिराचे विश्वस्त चौरीकर याच्यावर कारवाई करण्याचे निवेदन २२ एप्रिल मंगळवार रोजी कारंजा येथील समस्त तेली समाज बांधवांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार कुणाल झाल्टे यांना दिले.



मिळालेल्या माहितीनुसार देवळी,जिल्हा वर्धा येथील माजी खासदार रामदासजी तडस हे सकाळी १०:३० वाजता कारंजा येथील राम मंदिरात पूजा करण्यासाठी गेले. त्यावेळी मंदिराचे ट्रस्टी मुकुंद चौरीकर यांनी तुम्ही जानवे व सोवळे घातले नाही. त्यामुळे तुम्ही मंदिराच्या गाभाऱ्यात येऊन दर्शन घेऊ शकत नाही.असे बोलून त्यांना मनाई करून त्यांना अपमानास्पद वागणूक दिली.

या कृतीच्या निषेधार्थ व संबंधित मंदिराच्या विश्वस्तावर कारवाई करण्यासाठी कारंजा तहसीलदार मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवदास सुर्वे, समस्त तेली समाज बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष किरण क्षार, सचिव सुनील दहापुते, उपाध्यक्ष अतुल गुल्हाने,अतुल ढोरे, सुनील गुल्हाने,गजानन जाधव, प्रशांत बिजवे, बाबुराव सरोदे, विनय गुल्हाने, संदीप गुल्हाने, गजानन झंझाट, सुधीर आमले, गजानन गुल्हाने, नितीन गढवाले, किशोर पाठे, लक्ष्मण सिंहे, मेहसरे भाऊ, गजानन वाघ,सुधीर आमले,वैभव जीरापुरे, कृष्णा तुपाडे,संदीप ढोरे, दीपक गोदे, प्रवीण ढोरे, अनिल सुडके, गणेश गुल्हाने, बाळू मेहसरे यांच्यासह बहुसंख्य तेली समाज बांधव उपस्थित होते.

# दुष्काळाविरुद्ध लढा जिंकणारे मॉडेल व्हिलेज चेलका

## शेतकऱ्यांच्या बांधावर जात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांचे मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला: दि. २३ :**आधुनिक शेतीचा मंत्र अंगीकारून दुष्काळाच्या गळद छायेतून बाहेर निघत चेलका या छोट्याशा गावातील शेतीचा पर्यायाने शेतकऱ्यांचा समृद्ध विकास करण्यासाठी पाणी फाऊंडेशनच्या सत्यमेव जयते फॉर्मर कप स्पर्धेत सहभागी होऊन उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी गटांनी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. गावाच्या या कामगिरीची दखल घेत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी चेलका येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जात पाहणी करून शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण बनण्यासाठी मार्गदर्शन करीत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.



निसर्गाच्या अवकृपेमुळे कधी ओल्या तर कधी कोरड्या दुष्काळाच्या झळा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहन कराव्या लागल्या आहेत. मात्र, जिल्ह्यातील चेलका या छोट्याशा गावाने अशा संकटांना न घाबरता शेतीतून समृद्धीची वाट धरत आपली आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकसहभागातून दुष्काळाविरुद्ध लढाई जिंकली. आता शेती समृद्ध करण्यासाठी पाणी फाउंडेशनच्या सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत सहभागी होऊन उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी गटांनी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. सामूहिक शेती करीत आहेत. गावाच्या कामगिरीची दखल घेत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी भेट देऊन आढावा घेतला. यावेळी श्री. किरवे थेट शेतकयांच्या बांधावर जात त्यांनी तीळ, भुईमूग, मका, मूग, कांदा या पिकांची पाहणी केली. गोकृपा अमृत, अमृत जल, गांडूळ खत, मधुमक्षिका पालनाबाबतही त्यांनी माहिती घेतली. या वेळी गटातील शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांसाठी एसओपीची अंमलबजावणी केल्यामुळे पिके हिरवेगार व रोगमुक्त असून सुदृढ आहेत. तसेच यावर्षी पिकाची उत्पादकता वाढण्याची शक्यता आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

> **गट शेतीसाठी पुढाकार**
>
> गावातील शेतकरी रामेश्वर उंडाळ, विजय उंडाळ, चंद्रशेखर ठंडाळ, अरुण उंडाळ, नितीन परांडे, निखिल उडाळ, जय ठंडाळ, हर्षद उंडाळ आदी शेतकरी गट शेती साठी पुढाकार घेत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने चेलका गाव दत्तक घेतले आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, शिक्षण विस्तार संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांच्या मार्गदर्शनात शिक्षण विस्तार विद्यावेत्ता डॉ. प्रकाश घाटोळ तसेच विद्यापीठाचे अधिकारी या गावात विविध उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेतला.


हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271




अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५




# भ्याड हल्ल्याचा सर्व स्तरातून निषेध

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ : जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा विविध राजकीय पक्ष, सामजिक संघटना व सर्वसामान्य अकोलेकरांनी रस्त्यावर उतरून तीव्र शब्दात निषेध केला.**

## हल्ल्याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही: खा. अनुप धोत्रे यांचा इशारा



जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानप्रेरित दहशतवाद्यांनी धर्म विचारून हिंदू धर्मीय २८ पर्यटकांची निर्घृण हत्या केल्याने देशभरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर अकोला शहरातील महाराणा प्रताप चौक येथे भारतीय जनता पक्षाच्यावतीने श्रद्धांजली व निदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी खासदार अनुप धोत्रे यांनी भावूक भाषणात या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतल्याशिवाय मोदी सरकार स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा दिला. कार्यक्रमात २८ शहिदांना १०१ दिवे लावून सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थित जनसमुदायाच्या नजरा पाणावल्या होत्या. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील सुमारे ४५० पर्यटक, त्यात अकोला जिल्ह्यातील ५३ पर्यटक हे पूर्णपणे सुखरूप असून, ते लवकरच अकोल्यात परतवले जाणार असल्याची माहिती

### १०१ दिव्यांच्या माध्यमातून भावपूर्ण श्रद्धांजली

धोत्रे यांनी दिली. खासदार धोत्रे म्हणाले, ''काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित होत असतानाही पाकिस्तान अशा कृत्यांनी देशात दहशत निर्माण करत आहे. मात्र भारत सरकार हे सहन करणार नाही. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केले आहे की, याचा बदला घेतला जाईल.'' तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ याची दखल घेत केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री गिरीश महाजन, माधुरीताई मिसाळ यांना घटनास्थळी पाठवले व शहिदांचे मृतदेह सन्मानाने आणण्याची व्यवस्था केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर पाटील होते, तर प्रमुख उपस्थितांमध्ये जयंत मसने, डॉ. अभय जैन, डॉ. किशोर मालोकार, समीक्षा ताई धोत्रे, माधव मानकर, अ‍ॅड. देवाशिष काकड, सजय गोटफोडे, गिरीश जोशी, चंदाताई शर्मा, कृष्णा शर्मा, तुषार भिरड, सुमन ताई गावंडे, सारिका जयस्वाल, वैशाली शेळके, सतीश ढगे, नितीन राऊत, रमेश अल्करी, सिद्धार्थ शर्मा, रमेश करिअर, अर्चना चौधरी, दीप मनमानी, विनोद मनवानी, अजय शर्मा, रंजीत खेडकर, नाना कुलकर्णी, किशोर कुचके, शीतल जैन, अभिजीत बांगर, विपुल घोगरे, चंदा ठाकूर, निलेश काकड, जानवी डोंगरे देशमुख, जितेंद्र देशमुख, राजेंद्र गिरी, प्रकाश धोगलिया, अमोल गीते, पप्पू वानखडे, दिलीप नायसे, संतोष डोंगरे, संतोष पांडे, विकी ठाकूर, उमेश श्रीवास्तव, संदीप गावंडे, शोभराज राजपाल, हिरालाल कुपलानी, मनीष बाचुका, कन्हैया आहुजा, उकडराव सोनवणे आदी भाजप पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून अकोला शहरात देशप्रेमाचे, एकतेचे आणि दहशतवादाविरोधातील निर्धाराचे स्पष्ट संदेश दिले गेले.

## त्यांच्यासाठी सोनमर्ग ठरले जीवनदायी; दहशतवादाच्या छायेतून थोडक्यात बचावले अकोल्याचे ३० पर्यटक



। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. २३ :** देशाच्या गेल्या २५ वर्षांतील सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात असतानाच, अकोला शहरातील सुमारे ३० पर्यटक आणि त्यांच्या कुटुंबीयांचा या हल्ल्यातून थोडक्यात जीव बचावला आहे. हे सर्वजण जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेले होते आणि हल्ला घडण्यापूर्वीच ते सोनमर्ग येथे मुक्कामी होते. त्यामुळे ते हल्ल्याच्या ठिकाणापासून दूर असल्याने मोठा अनर्थ टळला. गुरूमाऊली टुर्स आणि ट्रॅव्हल्स यांच्या माध्यमातून अकोल्यातून गेलेल्या या पर्यटकांच्या यादीत अशोक आमले, गुम्फा आमले, मुग्धा देशमुख, मंगल वैद्य, शुभम डोमकुलवार, वर्षा मराठे, माधुरी दामले, रवींद्र रोही, रजनी रोही, मंगेश अंबरखाने, सुनीता अंबरखाने, अभिषेक शिंगरुप, मंजुश्री शिंगरुप, इंद्राणी शिंगरुप, आरोही शिंगरुप, संदीप सकडकळे, प्रेरणा सकडकळे, गंगा बोरडकर, शुभा कुलकर्णी, शिला भोपले, अशोक बडगुजर, अर्चना बडगुजर, अभिषेक बडगुजर, माया बडगुजर, राजेश्री शर्मा, सुनंदा नवले, प्रदीप देव, संगिता देव, पंकज साहू आणि अंबादास सप्रे यांचा समावेश आहे. हे सर्व पर्यटक जम्मू येथील विविध पर्यटन स्थळांची सफर करून पहलगामकडे रवाना होणार होते. मात्र त्या आधी सोनमर्ग येथे पर्यटन करीत असताना हा भीषण हल्ला घडला. यानंतर तातडीने सर्वांना श्रीनगर येथे हलवण्यात आले असून, ते सर्वजण सध्या घाट क्रमांक ६ समोरील हाऊसबोटमध्ये सुरक्षित आहेत.या घटनेनंतर काही पर्यटकांनी अकोल्यातील डॉ. माधव देशमुख यांच्याशी संपर्क साधला. डॉ. देशमुख यांचे श्रीनगरमध्येही कार्यालय असून, त्यांचे सहकारी फारूक यांनी तातडीने हस्तक्षेप करत योग्य समन्वय साधून या ३० पर्यटकांना श्रीनगरमध्ये सुखरूप पोहोचवले. या घटनाक्रमामुळे त्यांच्या सूज्ञपणाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.घटनेने अकोला शहरात एकच खळबळ उडाली होती. मात्र आपल्या नातेवाईकांचे हालचाल सुरक्षित असल्याचे समजताच नातेवाईक व मित्रपरिवारांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

## पहलगाम दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करा- आ. साजिद खान



**अकोला :** पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांवर आणि त्यांच्या मदतीला असणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी कॉंग्रेसचे आ. साजित खान पठान यांनी केली आहे. या भ्याड हल्ल्यात ४ ते ५ दहशतवाद्यांनी निःशस्त्र आणि निरपराध पर्यटकांवर अचानक गोळीबार करत २७ जणांचे बळी घेतले, तर अनेकजण गंभीर जखमी झाले. या घटनेने देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. आ. साजिद खान पठाण म्हणाले, ''हा हल्ला केवळ काही व्यक्तींवर नव्हे, तर आपल्या देशाच्या एकतेवर, अखंडतेवर आणि शांततेवर थेट आघात आहे. अशा अमानुष कृत्यांचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. ते पुढे म्हणाले की, या हल्ल्यात काही परदेशी पर्यटकांचाही समावेश असल्याचे समजते, त्यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा सुद्धा डागाळली गेली आहे. ''या दुःखद घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. तसेच जखमी पर्यटकांनी लवकरात लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना करतो.

## जागरूक अकोला कृती समितीचा धिंग्रा चौकात तीव्र निषेध

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ दिनांक २३ एप्रिल रोजी सायंकाळी ८ वाजता जागरूक अकोला कृती समितीने धिंग्रा चौकात तीव्र निषेध नोंदवला. या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करत निष्पाप नागरिकांच्या हत्येचा समितीने संताप व्यक्त केला. मेणबत्त्या पेटवून शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थित कार्यकर्त्यांनी ''दहशतवाद मुर्दाबाद'', ''भारत माता की जय'' अशा घोषणा देत परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण केले. समितीच्या प्रमुखांनी केंद्र सरकारने कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली.

## दहशतवाद्यांच्या हल्ल्याचा निषेध; शिवसेनेचे आक्रमक आंदोलन




**अकोला :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करत आज अकोल्यात शिवसेना (शिंदे ) पक्षाच्या वतीने आक्रमक आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनात हल्ल्यात बळी गेलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार हे आंदोलन छेडण्यात आले. जिल्हाभरातून आलेल्या शेकडो शिवसैनिकांनी ''भारत माता की जय'', ''दहशतवाद मुर्दाबाद'', ''काश्मीर आमचा आहे'' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. या वेळी माजी आमदार व शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख गोपीकिशन बाजोरिया, जिल्हाप्रमुख श्रीरंग पिंजरकर, अश्विन नवले शिवसेना जिल्हाप्रमुख,महानगरप्रमुख योगेश अग्रवाल, महिला जिल्हाप्रमुख उषाताई विरक, युवा सेना शहरप्रमुख विक्कीसिंग बावरी, विधानसभा प्रमुख राजेश दांडेकर, अश्विन नवले, रमेश गायकवाड, वसुंधराताई नंदागवळी, विजयाताई राजपूत, दीपक दांदळे, मंगेश म्हैसणे यांच्यासह विविध तालुका व शहरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनाला चालना मिळाल्याने देशभरातून पर्यटक मोठ्या प्रमाणात तेथे जात आहेत. स्थानिक तरुणांना रोजगार मिळत असून काश्मीरचा विकास वेग घेत आहे. मात्र हा बदल पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांना न पचल्याने त्यांनी पुन्हा अशांततेचा मार्ग स्वीकारत, पर्यटकांचे धर्म विचारून त्यांच्यावर गोळीबार केला. या अमानुष घटनेच्या विरोधात अकोल्यात शिवसेनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन तीव्र संताप व्यक्त केला. ''काश्मीरच्या विकासाला विरोध करणाऱ्या देशविघातक प्रवृत्तींना मुळासकट नष्ट केले पाहिजे,'' अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. प्रशासनाने आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता पोलीस बंदोबस्त कडेकोटपणे तैनात केला होता. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षाव्यवस्था चोख ठेवण्यात आली होती.

## आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय मानवतेचे प्रतीक – जावेद जकरिया

**अकोला :** काश्मीरमध्ये नुकत्याच झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करत, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (AIMPLB) यांनी घेतलेल्या आंदोलन स्थगितीच्या निर्णयाचं समाजात सर्वत्र स्वागत होत आहे. अकोल्यातील कच्छी मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी या निर्णयाचं मनःपूर्वक स्वागत करत, व विशेषतः डॉ. एस.क्यू. आर. इलियास यांचे आभार मानले आहेत. जावेद जकरिया यांनी प्रसृत केलेल्या प्रेस नोटमध्ये म्हटले आहे की, ''हा निर्णय त्या दुःखद कुटुंबांप्रती ऐक्य, सहवेदना आणि मानवतेचे प्रतीक आहे, ज्यांनी या हल्ल्यात आपल्या प्रियजनांना गमावले आहे.'' ते पुढे म्हणाले की, ने वेळेचं भान ठेवत दिलेला हा संदेश केवळ मुस्लिम समाजासाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी एक आदर्श आहे.''समाजहित आणि मानवी मूल्ये ही सर्वांच्या पलीकडची असतात, ती जपणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,'' असंही जकरिया यांनी नमूद केलं. या निर्णयामुळे देशभरात एकात्मतेचं व शांततेचं वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या भावनिक आणि अत्यंत संवेदनशील काळात आंदोलन स्थगित करून ने एक महत्त्वपूर्ण सामाजिक बांधिलकी जपली असून, जावेद जकरिया यांनी अन्य सामाजिक संघटनांनाही अशा प्रसंगी एकात्मता दर्शवण्याचं आवाहन केलं. ''दहशतवाद्यांचा धर्म, जात, पंथ नसतो ते मानवतेचे शत्रू आहेत. अशा वेळी देश एकदिलाने उभा राहणं हीच खरी श्रद्धांजली आहे,'' असे त्यांनी आपल्या वक्तव्यात सांगितले.

# घरकुल योजना: अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरु

## शासन स्तरावरून होणार योजनेची अंमलबजावणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ : पंतप्रधान शहरी घरकुल योजने अंतर्गत महापालिका क्षेत्रातील ७६०० लाभार्थ्यांपैकी ३०७८ लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण झाले आहे. आता पंतप्रधान घरकुल योजना २.० अंतर्गत अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पहिल्या योजनेत कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या निम्म्या लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित राहावे लागले. पहिली योजना आता केंद्रस्तरावरून बंद करण्यात आली असून दुसऱ्या योजनेत अनेक बदल करून ही योजना महापालिका स्तरावर राबविण्यात येणार आहे.**



पंतप्रधान शहरी घरकुल योजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रात सात हजार सहाशे लाभार्थी पात्र ठरले होते. या योजनेअंतर्गत १७ डीपीआर तयार करण्यात आले होते. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महापालिकेने शून्य कन्सल्टन्सी नामक एजन्सीची नियुक्ती केली होती. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३०७८ लाभार्थ्यांची घरकुले पूर्णत्वास आली आहेत. तीनशे घरकुले अजूनही सुरू आहेत. मात्र, कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या निम्म्या लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित रहावे लागले.

आता पंतप्रधान शहरी घरकुल योजना महापालिका क्षेत्रात राबविण्यात येणार असून शासनाच्या आदेशानुसार अर्ज स्वीकारणे सुरू करण्यात आले आहे. या योजनेत मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. या योजनेसाठी एजन्सीची नियुक्ती शासनाच्या वतीने करण्यात येणार आहे. महापालिका स्तरावर अर्ज दाखल करणे आणि शासनाकडे पाठविणे तसेच पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांच्या घरकुलाचे प्रस्ताव निकाली काढणे ही कामे आहेत. या योजनेचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार असून योजनेचा निधी महापालिकेला प्राप्त होणार नाही.

### शासन राबविणार प्रक्रिया

घरकुल योजनेचे डीपीआर तसेच या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आता शासन स्तरावरून त्रयस्थ एजन्सीची नियुक्ती केली जाणार आहे. ही प्रक्रिया पूर्वी महापालिका पार पडत होती. आता ही प्रकिया शासन करणार असून थेट लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा होणार आहे.

### ७५० चौरस मीटर जागा आवश्यक

७५० चौरस मीटर जागा असलेल्या लाभार्थ्यांना पात्र ठरवून त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. यामध्ये त्रुटी आढळल्यास असे लाभार्थी अपात्र ठरतील. पात्र व अपात्र ठरवण्याची प्रक्रिया शासन स्तरावर होणार आहे. पात्र लाभार्थ्यांना अडीच लाख रुपये अनुदान मिळणार आहे. घरकुलाची स्थिती पाहून थेट अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होईल.

# मिनी बायपासवरील रेल्वे पुलाचे भिजत घोंगडे

## लोकप्रतिनिधीची चुप्पी; प्रश्न धसास नेण्यासही उदासीनता

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

> दक्षिण मध्ये रेल्वेच्या अटींमुळे पुलाचे काम प्रोजेक्टमधून कमी करण्यात आले होते. आता हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला असून केवळ या मार्गाची देखभाल व दुरुस्ती आमच्याकडे आहे.
> **- भाऊसाहेब साळुंखे,** प्रकल्प संचालक, एनएचआय अमरावती

**अकोला, दि. २३ :** शहरातून जाणाऱ्या मिनी बायपासचे काम होऊन दोन ते अडीच वर्ष झाली आहेत. तरी पिडीकेव्ही मार्गावरील दक्षिण-मध्य रेल्वे लाईनवरील आरओबी (रेल्वे ओव्हर ब्रीज) अद्यापही जुनाच आहे. या मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात या पूलाच्या रुंदीकरणाचा समावेश होता मात्र, रेल्वेच्या अटींमुळे सदर काम या प्रोजेक्टमधुन कमी करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधीच्या उदासीनतेमुळे हा रेल्वे ओव्हर ब्रीज अद्यापही अरुंदच राहला आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या मिनी बायपासचे चौपदरीकरण करण्यात आले. या प्रोजेक्टमध्ये दक्षिण-मध्य रेल्वे लाईनवरील पूलाच्या रुंदीकरणाच्या कामाचा समावेश करण्यात आला होता. मात्र दक्षिण-मध्य रेल्वेच्या अटींमुळे पुलाच्या रुंदीकरणाचे काम या प्रोजेक्ट मधून वगळण्यात आले. तेव्हापासून स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाचा रेल्वेकडे रेटा न लावल्याने सदर पूल बॉटल नेक झाला आहे.

शिवणी ते रिधोरा या जुन्या मिनी बायपास मार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण होऊन दोन ते अडीच वर्ष झाली आहेत तरी पिडीकेव्ही मार्गावरील आरओबीचा विषय अद्यापही सुटलेला दिसत नाही. त्यामुळे दक्षिण-मध्य रेल्वे लाईनवर हा मार्ग बॉटल नेक झाला आहे. या मार्गाचे चौपदरीकरण झाल्यानंतर एनएचआयने हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला आहे.

**लोकप्रतिनिधी उदासिन :** रिधोरा ते शिवनी या १२ ते १३ किलोमीटर लांबीच्या मिनी बायपासवरील आरओबीचे रुंदीकरण थंडबस्त्यात पडले असून लोकप्रतिनिधींच्या स्मरणातून हा विषय बाजूला गेला की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. दोन ते अडीच वर्षांपासून या प्रश्नाचा साधा उल्लेखही केला गेला नाही असे बोलले जात आहे.

**पुल होणार होता ३० मीटर रुंद :** ९ मीटरचा हा आरओबी ३० मिटर होणे अपेक्षित होते. मात्र, दक्षिण-मध्य रेल्वेने आरओबीच्या विस्तारासाठी ६० मीटरचा स्पॅन सोडून पिल्लर उभारणीची अट घातली होती. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सदर प्रोजेक्ट मधून पुलाचे काम कमी करून टाकले.

**६३ वर्षे जुना पूल :** हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कॉन्फिडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स असोसिएशनने रेल्वे प्रशासनासोबत पत्रव्यवहार केला होता. अकोला-पूर्णा रेल्वे मार्गावर हा आरओबी ६३ वर्षांपूर्वी बांधलेला आहे. ९ मीटर रुंदीच्या आरओबीचा विस्तार चौपदरीकरणात अपेक्षित होता मात्र, रेल्वे प्रशासनाच्या अटीमुळे १३६ कोटींच्या खर्चात त्याचा समावेश करण्यात आला नव्हता.

# दारू बंदीसाठी महिलांचे शोले स्टाइल आंदोलन

## टनका, सोनगव्हाण, पांगरखेडा गावात अवैध दारू विक्रेत्यांचा धुमाकूळ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीचा धंदा वाढत चालला आहे. यामुळे गावात तंटे वाढले असून, दारूबंदी करण्याच्या मागणीसाठी महिला आक्रमक झाल्याचे पाहण्यास मिळाले. अनेकदा मागणी केल्यानंतर देखील दारूबंदी होत नसल्याने अखेर आज महिलांनी गावातील टाकीवर चढून शोले स्टाइल आंदोलन केले. या आंदोलनामुळे आता प्रशासन काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.




वाशिमच्या वारला, टनका, सोनगव्हाण, पांगरखेडा याठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैधपणे दारू विक्री करण्यात येत असते. टनका, सोनगव्हाण, पांगरखेडा गावात अवैध दारू विक्रेत्यांनी नुसता धुमाकूळ घातला असून, अवैध दारू विक्रीमुळे कित्येक महिलांचे घर उद्ध्वस्त झाले आहेत. त्यांच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे. गावातदेखील वाद वाढलेले पाहण्यास मिळत आहेत. यामुळे अनेक दिवसांपासून दारू बंदी करण्याची मागणी करण्यात येत होती. दरम्यान, गावात सहजपणे पहाटेपासूनच तळीरामांना दारू मिळत असल्यामुळे गावाचे वातावरण दूषित झाले आहे. गावांची शांतता व सुव्यवस्था भंग पावली आहे. अनेक महिला तसेच शाळकरी मुली या अवैध दारू विक्रीमुळे त्रस्त झाल्या आहेत. त्यामुळे गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी; अशी मागणी गावातील महिलांकडून करण्यात येत होती; मात्र पोलीस प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत होते.

गावागावात सर्रास दारूविक्री सुरू आहे. दारू विक्रीमुळे गावातील ज्येष्ठ, तरूण दिवसेंदिवस दारूच्या आहारी जात आहेत. याचा परिणाम भावी पिढीवरही होत आहे. पोलिसांना न जुमानता विक्रेते दारूविक्री करीत आहेत. गावात मुबलक प्रमाणात व सहज दारू उपलब्ध होत असल्यामुळे अल्पवयीन मुले दारूच्या आहारी जाताना दिसत आहेत. त्यामुळे गावात भांडण, तंट्याचे प्रमाण वाढत चालले आहे. निर्माण होणाऱ्या तंट्यांनी गावातील कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण होत चालला आहे.

गावात सुरू असलेली अवैद्य दारू विक्री बंद करण्याच्या मागणीसाठी वज्रदेही महिला विकास संघाच्या महिला थेट वारला गावातील पाण्याच्या टाकीवर चढून पोलीस प्रशासनाच्या विरोधात शोले स्टाइल आंदोलन केले. महिलांनी पोलीस प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत दारूबंदी करण्याची मागणी केली आहे.

# मंगरूळपीर बाजार समिती जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मधील कामगिरीच्या आधारे क्रमवारी जाहीर झाली आहे. त्यानुसार ३०५ बाजार समित्यांपैकी मंगरूळपीर येथील बाजार समिती राज्यात आठव्या, विदर्भात सहाव्या व जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यभरातील ३०५ बाजार समित्यांची क्रमवारी मागील दोन वर्षांपासून जाहीर करण्यात येत आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने स्मार्ट प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी राज्यातील बाजार समित्यांची त्यांच्या कामगिरीच्या आधारावर वार्षिक क्रमवारी प्रसिद्ध करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. जागतिक बँकेच्या सुचनेनुसार शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना-उपक्रम राबविण्यातील सहभाग यानुसार वार्षिक क्रमवारीसाठी ३५ निकष आणि २०० निश्चित केले आहेत. या निकषांशी संबंधित माहिती तालुका व जिल्हास्तरीय करून गुण दिले आहेत. या गुणांच्या आधारावर राज्यातील बाजार समित्यांची सन २०२३-२०२४ या वर्षाची क्रमवारी निश्चित केली आहे. बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर झाल्यामुळे आपण शेतमाल विक्रीसाठी नेत असलेल्या बाजार समित्यांचे किंवा खासगी बाजारांचे स्थान हे इतर बाजार समित्यांच्या किंवा खासगी बाजारांच्या तुलनेत कोठे आहे, हे शेतकऱ्यांना समजणार आहे.

## थोडक्यात

### ‘आयपीएल’च्या माध्यमातून अवैध सावकारी फोफावली

**मंगरुळपीर :** मंगरूळपीर तालुक्यात अवैध सावकारीचे छुपे आणि धोकादायक जाळे दिवसेंदिवस वाढत असून, गरीब, शेतकरी, कामगार, छोटे दुकानदार यांना वेठीस धरणारे खासगी सावकार निर्धोकपणे व्यवहार करीत आहेत. २०१४ मध्ये राज्य शासनाने नवीन सावकारी कायदा मंजूर करूनसुद्धा हे सावकार अजूनही पुन्हा दादागिरीच्या जोरावर आपला धंदा फोफावत आहेत. काही ठराविक रक्कम देऊन हे सावकार जास्तीत जास्त १० ते २० टक्के व्याजाने पैसे देतात; मात्र हे पैसे फेडताना गहाण ठेवलेली जमीन, घरे, वाहने गमवावी लागत असल्याचे चित्र आहे. अवैध सावकारांकडून कर्ज घेताना अनेकांना कोऱ्या चेकवर सह्या करायला लावल्या जातात, तर काही जणांचे घर, जमीन आधीच कागदोपत्री बळकावली जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. व्याजाची रक्कम थकल्यास शिवीगाळ, धमकी, वसुलीसाठी घरांवर हल्ले, असे प्रकार सामान्य झाले आहेत. आयपीएल क्रिकेट सामन्यांवर सुरू असलेल्या सट्ट्यांमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. मंगरूळपीर तालुक्यात अनेक युवक खासगी सावकारांकडून पैसे उधार घेऊन सट्ट्यांमध्ये गुंतवत आहेत. सट्ट्यात पैसे बुडाल्यास सावकारांशी वाद, मारामाऱ्या, धमक्यांचे प्रकार वाढले आहेत. काही संशयित सावकारांचे मोबाइल तपासल्यास मोठे आर्थिक गुन्हे उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### मंगरूळपीरच्या अश्विनीची यूपीएससीत उंच भरारी

**वाशिम :** छोट्याशा गावात शिक्षण घेत, प्रचंड मेहनतीने



अभ्यास करत, अश्विनी संजय धामणकर हिने देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक असलेल्या युपीएससीत देशभरातून ५८२ वा क्रमांक पटकावून आपले नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या अद्वितीय यशाने केवळ तिचं कुटुंबच नाही तर मंगरूळपीरसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही प्रेरणादायी धडा दिला आहे. अश्विनीचे वडील संजय धामणकर हे कोठारी येथील महात्मा जोतिबा फुले विद्यालयात शिक्षक आहेत. तिची आई गृहिणी असून, घरच्या साध्या परिस्थितीतही अश्विनीने शिक्षणावर लक्ष केंद्रित ठेवले. तिचे प्राथमिक शिक्षण नाथ विद्यालय, मंगरूळपीर, तर अकरावी-बारावीचे शिक्षण अहमदपूर येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयात झाले. त्यानंतर तिने गव्हर्नमेंट डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, नागपूर येथून बी.डी.एस. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. युपीएससीचा अभ्यास तिने कोणत्याही मोठ्या क्लासशिवाय ऑनलाइन क्लासेसच्या मदतीने घरबसल्या केला. दररोज सहा ते आठ तासांचा अभ्यास, सातत्य, आत्मविश्वास आणि तत्त्वज्ञान विषयाची निवड यांमुळे ती यशाच्या शिखरावर पोहोचली.

### वाशिम जिल्ह्यात १२ भाजप मंडळ अध्यक्षांची निवड

**वाशिम :** भारतीय जनता पार्टी वाशिम जिल्हा अंतर्गत एकूण १६ मंडळांपैकी १२ मंडळांच्या अध्यक्षांची निवड नुकतीच करण्यात आली. ही निवड पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि आगामी जिल्हा परिषद, नगरपंचायत, ग्रामपंचायत निवडणुकांच्या तयारीसाठी एक महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिली जात आहे. निवड झालेल्या मंडळ अध्यक्षांमध्ये वाशिम ग्रामीण तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, अनसिंग तालुका अध्यक्ष (नवीन मंडळ) संतोष उगले, मंगरूळपीर शहराध्यक्ष अभिषेक दंडे, मंगरूळपीर ग्रामीण तालुकाध्यक्ष रवींद्र ठाकरे, शेलूबाजार तालुकाध्यक्ष (नवीन) सुदर्शन धोटे, मानोरा ग्रामीण तालुकाध्यक्ष अरविंद इंगोले, कारंजा शहराध्यक्ष प्राजक्ता माहीतकर, कारंजा ग्रामीण तालुकाध्यक्ष अमोल ठाकरे, कामरगाव तालुकाध्यक्ष (नवीन) संजय लाहे, मालेगाव तालुकाध्यक्ष सुरेश मुंडे, गोवर्धन तालुका अध्यक्ष (नवीन) प्रशांत वाघ व शिरपूर तालुकाध्यक्ष (नवीन) गणेश कुटे यांचा समावेश आहे. या निवडीच्या प्रक्रियेसाठी प्रत्येक मंडळावर एक निवडणूक अधिकारी व सहअधिकारी नेमण्यात आले होते, असे वाशिम जिल्हा कार्यकारी अध्यक्ष राजू पाटील राजे यांनी कळिवले आहे.

### पहलगाम (काश्मीर) येथे जिल्ह्यातील पर्यटक अडकल्याची शक्यता

**वाशिम :** काश्मीरमधील पहलगाम येथे आज दहशतवादी हल्ला झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर ठिकाणी वाशिम जिल्ह्यातील काही पर्यटक अडकले असल्याची शक्यता वर्तवली जात असून, जिल्हा प्रशासनाने मदतीसाठी संपर्क क्रमांक जाहीर केले आहेत. श्रीनगर येथील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत : दूरध्वनी क्रमांक : ०१९४-२४८३६५१ / ०१९४-२४५७५४३ व्हॉट्सअॅप क्रमांक : ९०४९५८९६९३ (श्री. शाहू भगत - जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम) तसेच, वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्ष या क्रमांकावरही संपर्क साधावा - ०७२५२-२३४२३८. वाशिम जिल्ह्यातील कोणी नागरिक, पर्यटक किंवा त्यांचे नातेवाईक जर पहलगाम परिसरात अडकल्याची माहिती असेल, तर त्यांनी तात्काळ वरील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# चौदा वर्षीय मुलाला फूस लावून पळविले

**रिसोड :** रिसोड तालुक्यातील वनोजा येथे एका १४ वर्षीय शाळकरी मुलाला फूस लावून पळवून नेल्याची ही घटना २१ एप्रिल रोजी संध्याकाळी पाच वाजताच्या दरम्यान उघडकीस आली. ज्ञानेश्वर राजू कांबळे वय वर्षे १४ असे पळवून नेलेल्या शाळकरी मुलाचे नाव आहे. याबाबत रिसोड पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मी राजू कांबळे रा. वनोजा, ता. रिसोड यांनी रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर हा २१ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता मित्रांसोबत पोहायला जातो, असे म्हटला; मात्र यावर त्याच्या आईने त्यास नकार दिला. लक्ष्मी कांबळे यांनी सांगितले की, त्या शेतात शेळ्या घेऊन जात असताना ज्ञानेश्वर त्यांना पाई रिसोडच्या दिशेने जाताना दिसला. त्यास त्याच्या आईने सोबत शेतात चल, असे म्हटले असता; मात्र तो त्याच्यासोबत आला नाही. लक्ष्मी कांबळे संध्याकाळी पाच वाजता घरी आले असता, त्यांना ज्ञानेश्वर दिसला नाही.ही बाब लक्ष्मी यांनी आपले पती राजू कांबळे यांना संध्याकाळी सांगितली असता, त्याचा मित्र,नातेवाईक व इतरत्र शोध घेतला; मात्र तो कुठेही दिसून आला नाही. २२ एप्रिल रोजी दिलेल्या या फिर्यादीनुसार लक्ष्मी कांबळे यांनी त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले, असा त्यांचा संशय आहे. यानुसार रिसोड पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात कलम- १३७(२) इछड जुने कलम ३६३ भादंवि गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नागरे करीत आहेत.

# इंदिरा नगर ले-आऊटमधील अतिक्रमण हटविण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. २३ :** शहरातील इंदिरानगर भागातील नागरिकांनी विकत घेतलेल्या एन.ए. लेआऊटमधील दोन ठिकाणच्या नकाश्यानुसार अधिकृत असलेल्या रस्त्यावर अतिक्रमण झाल्यामुळे नागरिक तेथे आपल्या प्लॉटचे बांधकाम करू शकत नाहीत. त्यामुळे या भागातील रस्त्यावर झालेले अतिक्रमण काढण्यासंबंधी प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करावी, अशी मागणी गजानन बानोरे यांनी १५ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्याधिकारी न.प. रिसोड, जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम, तहसीलदार रिसोड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, रिसोड येथील श्रीमती इंदिराबाई पांडे यांच्या मालकीचे इंदिरानगर ले-आऊटचे एन.ए. १९६१ ला झाले आहे. सदर ले-आऊट मध्ये जाण्यासाठी नकाशामध्ये पूर्वेस सहायक निबंधक कार्यालयाच्या जवळून ३०फुटाचा रस्ता दर्शविलेला आहे, तसेच जिरवणकर यांच्या किराणा दुकानाच्या मागुन १५ फुटाचा रस्ता दर्शविलेला आहे; परंतु या दोन्ही रस्त्यावर अतिक्रमण झाल्यामुळे या ले-आऊटमधील प्लॉटधारकांना रस्ता उपलब्द नसल्यामुळे ते आपल्या प्लॉटचे बांधकाम करू शकत नाहीत, तरी याबाबत जिल्हाधिकारी व संबंधीत अधिकाऱ्यांनी दखल घेऊन सदर ले-आऊटमधील रस्त्यावर झालेले अतिक्रमण काढण्यासंबंधी कार्यवाही करावी तसेच या आगोदरसुद्धा ११ मार्च २०२२ व १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सुद्धा या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. रिसोड शहरात शासकीय जागेवर व खासगी जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असून प्लॉटधारक आपल्या प्लॉटवरील झालेले अतिक्रमण काढण्यासाठी गेले असता अनेक ठिकाणी वाद झाले व अतिक्रमिकांनी संबंधित प्लॉट मालकाकडून खंडणी वसुली केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे अतिक्रमिरकांचे मनोबल वाढत असून, अतिक्रमणावरुन शहरात नेहमीच वाद होतात. या वादाचे रूपांतर एखाद्या मोठ्या घटनेत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील अतिक्रमणाबाबत मागील काही महिन्यांपूर्वी रिसोड व्यापारी महासंघानेसुद्धा जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन शहरातील अवैध झालेल्या अतिक्रमणाबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध व मृतांना श्रद्धांजली

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शेलुबाजार, दि. २३ :** काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध शेलुबाजार चौकात अमरनाथ भक्त मंडळाच्यावतीने करण्यात आला. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांप्रती श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करण्यात आली.



यावेळी अमरनाथ भक्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करत भारत सरकारने कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. पाकिस्तान मुर्दाबाद ‘भारत माता की जय‘ आणि ‘आतंकवाद्यांचा धिक्कार असो‘ अशा घोषणा दिल्या. या आंदोलनात विलास लांभाडे, शक्ति शेळके, खंडू अंभोरे, ऋषिकेश पवार, जलील खान, रोशन गावंडे, अशोक चव्हाण, बंटी नाकाडे, ज्ञानेश्वर क्षीरसागर, भारत भगत, समाधान राऊत, मयूर चव्हाण, योगेश पाटे, रवींद्र अवगण, शंकर शिंदे आणि अमरनाथ भक्त मंडळाचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्जमाफीसाठी शेतकरी नेते पोहरेंनी फुंकला शंखनाद

## सध्या फक्त दोन धर्मात भांडण लावण्याचे काम सुरु

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा लाड, दि. २३ :** शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, हे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता कर्जमाफीसाठी कायदेशीर लढाई लढली जाणार आहे, अशी घोषणा शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी केली. तसेच कर्जमाफीसाठी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी अर्ज भरून द्यावेत. त्याची एक प्रत प्रशासन, एक स्वतः कडे तर तिसरी प्रत माझ्याकडे पाठवावी. अशा शेतकऱ्यांची एक संगणकीय यादी करू आणि या यादीच्या आधारे कर्जमाफीसाठी न्यायालयात जनहित याचिका दाखल करू. जो हा अर्ज भरणार नाही, त्याला कर्जमाफी मिळणार नाही, असेदेखील त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांना ३ लाख रुपये कर्जमाफी द्यावी, प्रति एकरी १० हजार रुपये प्रमाणे भावांतर अनुदान मिळावे, या मागण्यांसाठी २२ एप्रिल रोजी कारंजा येथील झाशी राणी चौक ते तहसील कार्यालयापर्यंत आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर आक्रोश मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. या सभेला तथा मोर्चेकरी शेतकऱ्यांना संबोधित करताना प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी आंदोलनाची रूपरेषा समजावून सांगितली. येत्या १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त शेतकऱ्यांनी कर्जमाफीच्या मागणीसाठी भरलेले अर्ज तहसील कार्यालय येथे जमा करायचे आहे. हे अर्ज जमा करताना शेतकऱ्यांनी त्या प्रतीवर न चुकता प्रशासनाकडून सही-शिक्का घ्यावा. सरकारमुळे शेतकऱ्यांवर कर्ज झाले असून, हे कर्ज शेतकऱ्यांना माफ करावेच लागेल. त्यासाठी गावागावातून मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी हे अर्ज भरावे आणि ते १४ मे रोजी तहसील कार्यालय येथे जमा करावे, असे आवाहन करताना त्यांनी हा केवळ कागद नसून कायदेशीर लढाई आहे, असा पुनरुच्चार केला. हे अर्ज गावागावात उपलब्ध करून दिले जातील, असे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, त्यांनी आपल्या भाषणात भाजपचा जाहीरनामा वाचून दाखवत त्यावर कडाडून टीका केली. वर्ष २०१७ मध्ये केंद्र शासनाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपटीने करण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात मात्र शेतातील पीक वगळता सर्व वस्तूंचे भाव दुप्पट, चौपट वाढले आहे. खर्च दुप्पट केला ;पण भाव कमी केले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याऐवजी शासन केवळ हिंदू-मुस्लिम भांडण लावण्याचे काम करीत आहे. येणारे




दिवस वाईट आहेत. आज रोजी विदर्भात दररोज १५ शेतकरी आत्महत्या करीत आहेत, असे सांगताना त्यांनी शासनाकडे शक्तिपीठ रस्ता यासाठी कोट्यवधी पैसा आहे; पण शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नाही. आपण सहन करतो म्हणून ते आपल्यावर अन्याय करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी लढले पाहिजे. आपल्या भाषणातून मिश्किल टिप्पणी करताना शेतकरी नेते पोहरे यांनी इतरांप्रमाणे मी पण गधा आहे. कारण मीदेखील भाजपला मत दिले. माझ्यासारख्या सुशिक्षिताने असे केले तर तुम्हाला काय म्हणावे? असे त्यांनी शेतकऱ्यांना म्हणताच सभास्थळी हास्याचा कल्लोळ उडाला.

दरम्यान, सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष श्रीधर कानकिरड तर व्यासपीठावर अॅड. ज्ञायक पाटणी, डॉ.पंकज काटोले, भूमिपुत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूपंत भुतेकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दामूअण्णा इंगोले माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अरविंद इंगोले, ज्योती गणेशपुरे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज कानकिरड , शिवसेनेचे तालुकाध्यक्ष विलास सुरळकर, अॅड. नीलेश कानकिरड , माजी नगराध्यक्ष अरविंद लाठीया, प्रा.राजपूत, विदर्भ आंदोलन समितीच्या रंजना मामर्दे, माया लाहे उपस्थित होत्या. यावेळी दामूअण्णा इंगोले यांनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांना सोयाबीनचा पीक विमा कंपनीच्या छाताडावर बसून देऊ, असा निर्धार बोलून दाखवला. भुतेकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरुमंदिर असलेल्या ठिकाणाहून कर्जमाफीचा शब्द दिला होता, त्याचे काय झाले? असा सवाल करताना जोपर्यंत कर्जमाफी मिळणार नाही तोपर्यंत शेतकरी एल्गार समिती स्वस्थ बसणार नाही, असा शासनाला इशारा दिला. तसेच रिसोड येथे असेच आंदोलन करू, अशी घोषणा केली. अॅड.पाटणी यांनी शासनाला कर्जमाफीच्या आश्वासनाचा विसर पडला आहे. सोयाबीनला भाव मिळाले असते तर आपल्याला कर्जमाफी, महागाईची वेळ आली नसती. कर्जमाफी नाही आणि भाव द्यायचा नाही, अशाप्रकारे शासनाने शेतकऱ्यांची कोंडी केली आहे. हा प्रश्न आता शेतकऱ्यांना एकजुटीने मार्गी लागावा लागेलच. लोकप्रतिनिधी आश्वासन पूर्ण करत नसेल तर त्याला गावबंदी घाला, असे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. डॉ.पंकज काटोले यांनी आपल्याला आक्रोश मोर्चा काढावा लागतो, ही शोकांतिका आहे. आर्थिक विषमता वाढली आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले; मात्र शासन पूर्तता करीत नाही, असा आरोप करताना त्यांनी स्वामिनाथन आयोग लागू करावा, अशी मागणी केली. ज्योती गणेशपुरे यांनी कोणतेही सरकार आले की शेतकऱ्याची फसगत होते. शेतकऱ्याला फसवून त्याची मते घेतली. पोहरे हे शेतकऱ्यासाठी शासनाशी भांडले. त्यामुळे कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांची साथ आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या. अरविंद इंगोले यांनी संघटित झाल्याशिवाय न्याय मिळणार नाही. शासनाकडे खासदार, आमदार यांचे मानधन वाढविण्यासाठी पैसा आहे; पण शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नाही, याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात श्रीधर कानकिरड हे शासन म्हणजे भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे. त्याचा दोष म्हणजे इथे गरीब गरीब व श्रीमंत श्रीमंत राहतो, असे मत मांडले. यावेळी विदर्भ आंदोलन समितीच्या रंजना मामर्दे, प्रा. राजपूत व इतरांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक शेतकरी एल्गार समितीचे जिल्हाध्यक्ष राजू अवताडे, सूत्रसंचालन डॉ.रमेश चंदनशिव, तर आभार दिलीप रोकडे यांनी मानले.

विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी भारत भगत , भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष देवेंद्र लांडकर, ओमप्रकाश तापडिया यांच्यासह बहुसंख्येने शेतकरी उपस्थित होते.

## थोडक्यात

### विद्युत तारा चोरीच्या घटना वाढल्या

**अकोला :** अकोला शहरात आणि आसपासच्या परिसरात विद्युत तारा चोरीच्या घटना वाढत आहेत. गेल्या काही दिवसांत विविध ठिकाणी विद्युत तारा चोरी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. अकोल्यात सिटी कोतवाली पोलिसांनी विविध कंपन्यांचे लाखो रुपयाच्या केबल चोरी करणाऱ्या चोराला अटक केलीय. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहेय. फिर्यादीच्या स्टोअर रूममधून विविध कंपन्यांच्या केबलचे ४७ बंडल चोरी झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर अकोल्यातील सिटी कोतवाली पोलिसांनी सापळा रचून याप्रकरणी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून चोरी गेलेला मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

### कुरुम परिसरात चोरांचा धुडगूस; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**मूर्तिजापूर :** कुरुम परिसरात सोमवारी रात्री ८.३० वाजता चोरांनी धाडसीपणे घरात घुसण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. महिलांनी चोराला पाहून त्वरित ओरळ केली; मात्र तोपर्यंत चोराने घराच्या मागील बाजूकडे धूम ठोकली. यावर नाझिम शाहने घटनास्थळी धाव घेतली; पण चोराने त्याच्यावर दगडफेक केली, ज्यामुळे त्याला गंभीर जखमा झाल्या.
यापूर्वीही कुरुम परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत, ज्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मोठा धोका ठरत आहेत. तालिब बेगच्या घरातून ८५,००० रुपये आणि शेख जावेदच्या घरातून २ लाख रुपये व ज्वेलरी चोरीला गेली होती. तापलेल्या परिस्थितीत पोलिसांनी तपास सुरू केला असला तरी, त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. चोरांच्या धाडसी कृत्यांमुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची आवशकता वाढली आहे. चोरांचा वाढता धुमाकूळ आणि पोलिसांच्या कारवाईतील निष्क्रियता यामुळे परिसरातील नागरिक चिंताग्रस्त आहेत. पोलिसांनी ही आपत्कालीन परिस्थिती गांभीर्याने घेत आणि अधिक सक्रियता दर्शवली पाहिजे. अन्यथा, सुरक्षेच्या गोंधळामुळे संपूर्ण परिसरातील नागरिकांच्या मनात भीतीचे साम्राज्य कायम राहील.

### सावरा येथे जागतिक पुस्तक दिन साजरा



**अकोट :** तालुक्यातील ग्राम सावरा येथे श्री संत गाडगे बाबा सार्वजनिक वाचनालयात, जागतिक ब्रिटिश लेखक विल्यम शेक्सपियर यांच्या स्मृती दिनानिमित्त जागतिक पुस्तक दिन २३ एप्रिल रोजी साजरा करण्यात आला. त्यावेळेस संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालयामध्ये शेक्सपियर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक ग्रंथ दिन म्हणून साजरा करण्यात येतो. प्रत्येक मनुष्याला सुसंस्कृत करण्यात पुस्तकाची भूमिका फार मोठी आहे. पुस्तक वाचल्याने माणसांची दृष्टी उंचावते. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याकरिता जागतिक पुस्तक दिनाचे महत्त्व आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणातून लोकांना वाचाल तर वाचाल, असा महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय ग्रंथशास्त्राचे जनक एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे हार अर्पण व पूजन परमानंद सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल रामकृष्ण मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला नीलेश वानखडे, मनोहर सपकाळ, बाबूराव धांडे, प्रतीक अघडते, वासुदेव गिरी, राजरत्न धांडे, मधुकर बेदरकर, गजानन भराटे, पांडुरंग दातकर, इस्लाम अली, गजानन दातकर यांच्यासह विद्यार्थीची बहुसंख्येने उपस्थित होते.

### श्री. शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे जागतिक पुस्तक दिन साजरा



**तेल्हारा :** श्री. शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे सुरू असलेल्या उन्हाळी संस्कार शिबिरामध्ये आज जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. आर. एस. राठोड मुख्याध्यापक हे होते तर अतिथी म्हणून श्री. साहेबराव सोनमाळे आजिव सदस्य यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकेश भांबुरकर यांनी केले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील पुस्तके घेऊन त्यांचे वाचन केले.
उन्हाळी संस्कार शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. कार्यक्रमाचे आभार बी. जी. पवार यांनी मानले. सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे - शंकर किरवे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**विवरा, दि. २३ :** रासायनिक शेतीमुळे जमिनीचा पोत आणि मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे. म्हणूनच आजच्या घडीला सेंद्रिय शेती ही काळाची गरज असून, शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले.
२२ एप्रिल २०२५ रोजी त्यांनी पातूर तालुक्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी कृषिभूषण सेंद्रिय शेती पुरस्कार प्राप्त शेतकरी देविदास धोत्रे यांच्या शेताला भेट देऊन सेंद्रिय शेती कशी केली जाते, याची सविस्तर माहिती घेतली. त्यांच्या प्रयोगशीलतेचे कौतुक करून इतर शेतकऱ्यांसाठी ते प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. धोत्रे यांच्या शेतातील सेंद्रिय तणनाशक, कंपोस्ट खत निर्मिती, आंतरपीक पद्धती यांसारख्या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेत त्यांनी या पद्धतीचा ग्रामीण भागात प्रचार होणे गरजेचे असल्याचे सांगितले. त्यांनी सेंद्रिय उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न सुरू असल्याची माहितीही दिली.
यानंतर किरवे यांनी विनोद क्षीरसागर यांच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत केळी लागवड प्रकल्पाची पाहणी केली. त्यांनी केळी पिकाच्या व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समाधान व्यक्त केले.
या दौऱ्यात कृषी उपसंचालक तथा उपविभागीय कृषी अधिकारी अकोला हरीश देशमुख, तालुका कृषी अधिकारी पातूर संजय अटक यांच्यासह कृषी विभागाचे इतर अधिकारीही उपस्थित होते. दौऱ्यानंतर शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी शाश्वत शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान, जलसंधारण आणि शेतीमाल प्रक्रिया यावर भर देण्याचे आवाहन केले.

## अवैध गौण खनिज वाहतूकप्रकरणी दोन ट्रॅक्टर पकडले

### ट्रॉलीसह पातूर पोलीस स्टेशनमध्ये केले जमा



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातूर, दि. २३ :** पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अंबासी गावामध्ये पातूर तहसीलचे नायब तहसीलदार बळीराम चव्हाण हे दौऱ्यावरून परत येत असताना ७ एप्रिल रोजी १२ वाजताच्या दरम्यान त्यांना गौण खनिजाचे मुरूम भरलेले वाहतूक करणारे ट्रॅक्टर ट्रॉलीसह निदर्शनास आल्यानंतर त्यांनी कारवाई करीत ट्रॅक्टर ट्रॉलीसह पकडले.
मॅप तहसीलदार बळीराम चव्हाण यांना पाहताच ट्रॅक्टरचालकांनी ट्रॅक्टर ट्रॉली सोडून पोबारा केला. सदर ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३० ए बी ५७ ८७ तथा दुसरे लाल रंगाचे ट्रॅक्टर ट्रॉली ज्यांना क्रमांक नाही असे मुद्देमालासह चालक मुजाहिद खान युसूफ खान आसिफ खान मुजाहिद खान शेख फैजान शेख जब्बार आदींच्या मदतीने पातूर पोलीस स्टेशनला आणून लेखी पत्र देऊन पातूर तहसीलदार डॉक्टर राहुल वानखडे यांच्या आदेशा पर्यंत जमा करण्याचे सांगितले.

## अवैध धंदे बंद करण्यासाठी ग्रामपंचायतने घेतला ठराव

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. २३ :** तालुक्यातील रौंदळा या गावातील ग्रामपंचायतीने अवैद्य दारू विक्रीकरणांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासंदर्भात सर्वानुमते ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला.
२२ एप्रिल रोजी गावातील ग्रामपंचायत व नागरिकांच्यावतीने, माननीय तहसीलदार यांना निवेदन सादर करण्यात आले. गावातील वरली मटका तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. कारण महिलेच्या सुरक्षिततेसाठी गावातील मद्यविक्री घातक ठरत आहेत. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संबंधित सर्व अवैध धंद्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामपंचायतच्यावतीने तहसीलदार अकोट, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट यांना निवेदनातून करण्यात आली आहे, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना तक्रारीच्या प्रतिलिपी पाठविण्यात आल्या आहेत. संबंधितांनी कायदेशीर कारवाई न केल्यास ठिय्या आंदोलनाचा इशारासुद्धा ग्रामपंचायत व गावातील नागरिकांच्यावतीने निवेदनातून देण्यात आला आहे.

> मोजे रौंदळा गावामध्ये अवैधपणे दारू विक्री जोरात सुरू आहे. तरुण पिढी दारूच्या नशेत व्यसनाधीन होत आहे. लहान मुलांचा व महिलांचा मनस्ताप वाढला आहे. पोलिसांना अनेक तक्रारी केल्या; मात्र काही कारवाई झाली नाही. आम्ही ग्रामसभेत दारूबंदी संदर्भात सर्वांनुमते ठराव मंजूर केला आहे.
> **गणेश मोकळकर,** सरपंच,रौंदळा.

## जबरी चोरीतील आरोपीला केवळ दोन तासात केली अटक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट, दि. २३ :** २२ एप्रिल रोजी फिर्यादी गं.भा.चंद्रकलाबाई किसन डाखोरे वय ५५ वर्ष रा.धारूळ ही खासबाग शिवारातील संत्र्याच्या शेतात काम करीत असताना यातील आरोपी याने म्हटले की, या शेताचा मालक आबा कोठे गेला आहे. फिर्यादीने म्हटले की, दुसऱ्या शेतात गेला आहे, असे म्हणताच आरोपीने फिर्यादीच्या पाठीमागून येवुन तोंडावर ठोसे मारून जखमी करून कानातील सोन्याचे टाप्स १ ग्रॅम किं. ६००० रु.हातातील २ चांदीचे कडे व २ पाटल्या ३५ तोळे किंमत १५०००, गळ्यातील सोन्याची पोत २.५ ग्रॅम किंमत १२००० असा एकूण ३३०००रु. चा माल जबरीने इच्छापूर्वक जखमी करून चोरून नेला, अशा रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.
सदर गुन्ह्यातील घटनास्थळावरून फरार झालेला आरोपी याचा शोध घेणेकामी तपासपथक रवाना करून तपासाचे चक्रे फिरवून गुन्ह्यातील फरार आरोपी सुमित सुनील डवंगे वय १८ वर्ष यास अवघ्या दोन तासाचे आत छडा लावुन घटनेसंबंधी उकल करून आरोपीस गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली. आरोपीस विश्वासात घेऊन सदर गुन्ह्यातील मालापैकी कानातील सोन्याचे टाप्स १ ग्रॅम किं.६००० रु., हातातील २ चांदीचे कडे व ३५ तोळ्याचे दागिने किंमत १५००० रु. असा एकूण २१०००रु. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंग, मा.अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, मा.सहायक पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे,पोउपनि.शिवानंद वीर,पोहेकाँ, उमेशचंद्र सोळंके, पोहेकाँ. हरिष सोनवणे, पोकाँ. वामन मिसाळ, पोकाँ.पंकज पांडव, पोकाँ, गोपाल जाधव, पोकाँ शुभम लुंगे यांनी केली.

## श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे संस्कार शिबिराचे उद्घाटन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**तेल्हारा, दि. २३ :** श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन आभासी पद्धतीने सुरेशदादा खोटरे, कार्यकारिणी सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आर. एस. राठोड मुख्याध्यापक हे होते तर अतिथी म्हणून बाळासाहेब पाटील आजिव सदस्य, रमेश पाटील कोकाटे आजिव सदस्य, प्रेरणा कराळे, शिक्षक प्रतिनिधी शांतीकुमार सावरकर, गजानन गावंडे, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बळीराम कुवारे यांनी केले आहे. हरित क्रांती सेना प्रभारी शिक्षक अंकेश भांबुरकर यांनी वसुंधरा दिनाच्या निमित्ताने विचार व्यक्त केले आहे. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी वसुंधरा दिनानिमित्त नैसर्गिक चित्र रेखाटले. या स्पर्धेत सर्व विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले होते. संस्कार शिबिरामध्ये दररोज विहित प्रकारची खेळ, योगासने, संगीत विषयाचे शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास मार्गदर्शन, पुस्तक वाचन प्रकल्प, कराटे, लाठीकाठी या प्रात्यक्षिकांचे सराव घेण्यात येतात .विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, तसेच त्यांच्यात असलेला कलाकार जागरुक होतो. मोठ्या उत्साहात संस्कार शिबिर संपन्न होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील वंजारी यांनी केले.
आभार बी.जी. पवार यांनी मानले. शिबिर यशस्वी होण्यासाठी आर. एस. राठोड मुख्याध्यापक, प्रेरणा कराळे, शिक्षक प्रतिनिधी शांतीकुमार सावरकर, सुनील वंजारी, बी जी पवार, बळीराम कुवारे, तूषार जाधव ,भारत भोयर, अंकेश भांबुरकर, धनंजय भंगाळे, तेजराव कडू, विजय दहे, गजानन गावंडे, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, प्रतिनिधी, विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

## गावातील रस्त्याचे सहा महिन्यातच वाजले तीन तेरा




**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जानोरी मेळ, दि. २३ :** निंबा अंदुरा सर्कलमधील मोखा जानोरीमेळ गट ग्रामपंचायतमध्ये मंजूर झालेल्या कामांपैकी २०२३ ला झालेल्या रोडच्या बांधकामात प्रचंड गैरप्रकार झालेला आहे; कारण गौतम दिगंबर परघरमोर यांच्या घरापासून ते शिवहरी मस्के यांच्या घरापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाचे रोडचे काम करण्यात आलेले आहे; मात्र अवघ्या एक ते दीड वर्षातच लोखंडी सळ्या सर्व बाहेर पडलेल्या आहेत व पहिल्या पावसातच त्या रोडचे तीन तेरा वाजलेले आहेत. हा रस्ता झालेला आहे; मात्र या रस्त्याच्या संदर्भात तसेच विनायक किसन परघरमोर ते तुळशीराम यादव परघरमोर यांच्या घरापर्यंत अवघ्या सहा महिन्यांपूर्वी झालेल्या रोडच्या बांधकामाच्यावर लोखंडी सळ्या अगदी स्पष्ट डोळ्याने दिसत आहेत, तसेच त्या रोडवर झाडू फिरवल्यास सर्व सिमेंट गिट्टी हे बाहेर फेकल्या जात आहे. अशा प्रकारचे निकृष्ट दर्जाचे काम या जानोरी मेळ गावात मुद्दामून केल्या जात आहे. किशोर महेंद्र परघरमोर यांच्या घरासमोर लोखंडी सळ्या व लोखंडी सळ्यांना बांधलेला पिंजऱ्याचा तार अगदी साध्या डोळ्यांनी दिसत आहे. त्या दरम्यानच मोखा गावातील वार्ड क्रमांक दोनमध्ये जगन्नाथ गावंडे यांच्या घरापासून ते महादेव तायडे यांच्या घरापर्यंत अगदी उत्कृष्ट रोडचे काम झालेले आहे तसेच या प्रकारचे उत्कृष्ट काम जानोरीमेड या गावांमध्ये का होत नाही, हा प्रश्न जानोरीमेळ येथील नागरिकांना पडलेला आहे तसेच देविदास काळे ते अजबराव काळे यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉगचे काम जानेवारी महिन्यात झालेले आहे; पण त्या कामावरसुद्धा अतिशय निकृष्ट दर्जाचे काम तिथे संबंधित ठेकेदाराने केलेले आहे. तिथे ग्रामपंचायत प्रशासनाने साधे फिरकून पाहिलेसुद्धा नाही आणि या रस्त्यावर जे बांधकाम झालेले आहे तिथे पाणीसुद्धा व्यवस्थितरीत्या मारल्या गेलेले नाही. मागील वर्षी सहा लाख रुपयांचे काम, यावर्षी १७ लाख रुपयांचे काम, परत दोन महिन्याच्या आधी सहा लाख रुपयांचे काम एकूण २९ लाख रुपयांचे काम या जानोरी मेळ गावात केलेले आहे. गट ग्रामपंचायत असल्यामुळे परत परत या गावात निधी येणार नाही तरी जानोरी मेळ गावातील मंजूर झालेले जे काम आहे ते योग्य रीतीने केले तर तक्रार करायची काहीच आवश्यकता राहणार नाही, अशी नागरिकांमध्ये दबक्या आवाजात चर्चा आहे.

# ३० वर्षानंतर रंगला मैत्रीचा मेळा..!

## पातूरच्या शिवारात सजली गप्पांची मैफल

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**पातूर, दि. २३ :** तब्बल तीस वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्रांचा मेळा पातूरच्या शिवारात रंगला. एकमेकांची सुख-दुःख वाटत जुन्या जाग्या झालेल्या आठवणींनी सर्वांना सुखद आनंदाचा अनुभव दिला.
पातूर येथिल वसंतराव नाईक विद्यालयात शिक्षण घेतलेल्या १९९७ च्या सत्रातील विद्यार्थी स्कूल कट्टा ग्रुपच्या माध्यमातून एकत्र आले. त्यानंतर प्रत्येकाने एकमेकांशी संपर्क साधत आपल्या वर्ग मित्रांना ग्रुपमध्ये जोडण्याचा प्रयत्न केला. ग्रुपच्या माध्यमातून एकत्र आलेल्या मित्रांनी प्रत्यक्ष भेटण्यासाठी एका स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन केले. पातूर येथिल उमेश फुलारी या वर्गमित्राच्या शेतात हा सोहळा पार पडला. तब्बल तीस वर्षांतर अनेक जण पहिल्यांदाच भेटत होते. त्यावेळी तो भेटीचा विलक्षण आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. अशातच जुन्या आठवणीने मित्रांची मैफल अधिकच रंगली. प्रत्येकानी आपला परिचय दिला. आपले सुख दुःख वाटून घेतले. शाळेतील एकेरी नावाचा उल्लेख करायला एकही मित्र विसरला नाही. हसत खेळत, गंमती जमती करीत जेवणाच्या मेजवानीवर ताव मारला. चाळीशी पार झालेल्या अशा रंगतदार मित्रांच्या या मैफिलीत अनेकांनी आपले आरोग्य सांभाळण्याचा सल्लासुद्धा दिला. हा स्नेहमिलन सोहळा अधिक ऊर्जा देणारा असल्याचे मत प्रत्येकानी नोंदविले.
या स्नेहमिलन सोहळ्यामध्ये अमर वानखडे, संजय काकडे, निशांत गवई, जगदीश चव्हाण, प्रमोद जाधव, गोपाल गाडगे, उमेश फुलारी, अशोक इंगळे, आतिष पवार, सुमेध चक्रनारायण, अभिजित थोरवे, गोपाल खोकले, निलेश गाडगे, हेमंत परमाळे, विजय गाडगे, संदीप धानोकार, गणेश गाडगे, अनिल चव्हाण, संदीप शेवलकार, बाळूभाऊ बगाडे, गोपाल गोतरकार, दत्ता गाडगे, जगदीश निंबोकार आदी मित्रानी आनंद लुटला.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा



बुलडाणा,गुरूवार २४ एप्रिल २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### ग्राम दत्तक गाव योजने अंतर्गत तहसीलदार यांची भानखेड येथे भेट



**मंगळूर नवघरे :** जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे आदेशानुसार ग्राम दत्तक योजने अंतर्गत मा तहसीलदार संतोष काकडे यांनी भानखेड ग्रामपंचायत ला भेट दिली.सर्व विभागांची सभा घेऊन ८ दिवसांमध्ये आपापल्या विभागाचा तयार करणेचे निर्देश दिले. दत्तक गाव हे आदर्श ग्राम करणेसाठी सर्व विभागांना आढावा घेऊन सुचना दिल्या.गावातील शाळेला भेट दिली, अंगणवाडी ला सुध्दा भेट दिली सदर सभेला संजय चौधरी मंडळ अधिकारी,कु शारदा पवार ग्राम महसूल अधिकारी,वायाळ ग्रामसेवक, सरपंच, ग्रा पंचायत सदस्य,पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, लाईनमन, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक,मुख्याध्यापक,शिक्षक, व इतरही सर्व विभागांचे प्रतिनिधी हजर होते.

### काश्मीरमध्ये अडकलेल्यांना हेल्पलाइनवर संपर्क करण्याचे आवाहन

**बुलडाणा :** पहेलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यामुळे काश्मिरच्या विविध भागात अडकलेले महाराष्ट्रातील पर्यटक आणि त्यांचे नातेवाईक यांच्या मदतीसाठी मंत्रालयातील महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या ०२२-२२०२७९९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष संपूर्ण वेळ (२४७) कार्यरत आहे. या हल्ल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह श्रीनगरवरून मुंबई येथे आज आणण्यात येणार आहेत. आज दुपारी श्रीनगर येथून महाराष्ट्रातील आणि गुजरातमधील मृतदेह विमानाने मुंबई विमानतळावर येणार आहेत. तेथून हे मृतदेह ॲम्बुलन्सद्वारे त्यांच्या गावी पाठविण्यात येणार आहेत. यासाठीची सर्व प्रकारची मदत राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे. काश्मीरमध्ये अडकलेले पर्यटक आणि राज्यातील त्यांचे नातेवाईक यांनी मदतीसाठी ०२२-२२०२७९९० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात आले आहे.

### दहशतवादी हल्ला प्रकरणी जिल्हा नियंत्रण कक्ष कार्यान्वित

**बुलडाणा :** पहलगाम, जम्मू व काश्मीर येथील पर्यटकावर दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन सेवेसाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. पहलगाम, जम्मू व काश्मीर येथील पर्यटकावर दहशतवादी हल्यात महाराष्ट्रातील काही पर्यटक आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील काही व्यक्ती, आपले नातेवाईक किंवा व्यक्ती असल्यास तात्काळ जिल्हा प्रशासनाच्या दुरध्वनी क्रमांकावर किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा.

## बोगस बियाणे, खत विक्रीवर भरारी पथकाचा वॉच

### जिल्ह्यात १४ पथकांची नियुक्ती खरीपासाठी प्रशासन सज्ञ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा, दि.२३

खरीप हंगाम २०२५ साठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे खते व कीटकनाशके मिळावी यासाठी बुलढाणा जिल्हा प्रशासन व कृषी विभागाने व्यापक पावले उचलली आहेत या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात १४ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात प्रत्येक तालुक्यासाठी एक आणि जिल्हास्तरावर एक भरारी पथकाचा समावेश आहे.

दरम्यान सन २०२४ २५ मध्ये बोगस बियाणे खते कीटकनाशकांची विक्री केल्याप्रकरणी ३५० परवाने रद्द करण्यात आले आहे. प्रत्येक तालुका स्तरावर एक व जिल्हाभर तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. दोशी आढळून आलेल्या कृषी केंद्र संचालकांवर कारवाई केली जाणार आहे. फसवणुकीचे प्रकार घडत असल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी अथवा पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांची संपर्क करावा असे आव्हान जिल्हा गुणवता नियंत्रण निरीक्षक यांनी केले आहे. २०२५ च्या खरीप हंगामा करता शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे खते व कीटकनाशके मिळवून देण्याचा प्रयत कृषी विभागाकडून केला जाणार आहे. जिल्ह्यात २०२४ २५ मध्ये गुण नियंत्रण विषयक बियाण्यांचे १३१२ नमुने घेण्यात आले. त्यातील २१ नमुने नापास करण्यात आले ११ नमुन्यांबद्दल ताकीद देण्यात आली. पाच प्रकरणे कोर्टात दाखल करण्यात आली तर सात परवाने निलंबित आणि हे ११६ परवाने रद्द करण्यात आले. रासायनिक खताविषयी ६१९ नमुने घेण्यात आले त्यातील ४४ नो नापास करण्यात आले सहा नमुन्या बद्दल टाकीत देण्यात आली. पाच प्रकरणे कोर्टात सुरू असून सी तीन परवाने निलंबित तर ११८ परवाने रद्द करण्यात आले आहे. कीटकनाशकांमधून २३१ नमुने गोळा करण्यात आले १६ नापास करण्यात आले. एक प्रकरण कोर्टात चालू असून दोन परवाने निलंबित तर ११६ परवाने रद्द करण्यात आले आहे.



**३५० केंद्राचे परवाने रद्द १२ निलंबित**

बियाणे खते आणि कीटकनाशकांचे २१६२ नमुने घेण्यात आले यातील ८१ नमुने बोगस होते १७प्रकरणात ताकीद देण्यात आली तर ११ प्रकरणे कोर्टात न्यायप्रविष्ठ आहेत १२ परवाने निलंबित केले असून ३५० परवाने रद्द करण्यात आले त्याचप्रमाणे १७४ बियाणे २८ खते व कीटकनाशकासंदर्भात स १४ केंद्रांना विक्री बंदचे आदेश देण्यात आले आहे. कृषी विभागामार्फत गुणवत्ता नियंत्रणासाठी भरारीत पथकामार्फत महिन्याला अचानक तपासणी करण्यात येणार आहे बोगस खते बियाणे व कीटकनाशकांची विक्री होत असल्यास निदर्शनास आल्यास कारवाई केली जाईल असे जिल्हा कृषी अधीक्षक बुलढाणा मनोज कुमार ढगे यांनी सांगितले.

## भरधाव कार पुलाला धडकली

### दोघे ठार, तीन जखमी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२२



शिवनी पिसा ते धानोरा या गावाच्या जवळील संभाजी नगरकडून नागपूरच्या दिशेने जाणारी भरधाव कार २३ एप्रिल रोजी सकाळी पुलाला धडकल्याने गाडीमधील पाच जण जखमी झाले. यापैकी दोघे प्रवाशी जागीच ठार झाले तर तिघांना उपचारासाठी नजीकच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

डोणगाव पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अपघातग्रस्त वाहन बाजुला काढून समृध्दी महामार्गावरील वाहतुक सुरळीत केली. जखमींची प्रकृती गंभीर असल्याने केंद्रीय आरोग्य, आयुष परीवार कल्याण मंत्री प्रतापराव जाधव यांनी शवविच्छेदन लवकर करण्याचे निर्देश आरोग्य यंत्रणेला दिले. शिवसेना शिंदे गट मेहकरचे शहर प्रमुख जयंत बाठीया यांनी ही माहिती दिली. अपघातग्रस्तांना सुमारे पाऊण तास कोणत्याही स्वरुपाची मदत मिळाली नसल्याचा आरोप जयंत बाठीया यांनी केला आहे.

दरम्यान समृध्दी महामार्गावर सलग दुसऱ्या दिवशी हा अपघात झाला आहे. २२ एप्रिल रोजी मेहकर तालुक्यातील डोणगाव नजीक पेट्रोलपंपाजवळ कार अपघातात एक इसम ठार झाला होता. मार्गावर लावलेल्या झाडांना पाणी देणाऱ्या कामगाराला भरधाव कारने धडक दिली. यात आशिष रा. कुमरी जि.आमरोह म.प्र. हा ठार झाला होता. तर ज्ञानेश्वर बोरसे नामक कामगार जखमी झाला होता. पुढील तपास सुरू आहे.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सेव्ह वसुंधरा टीमच्यावतीने रॅली




अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२३

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त सेव्ह वसुंधरा टीमच्यावतीने बुलढाणा शहरात रॅली काढण्यात आली.

प्लास्टिकच्या वापरावर निर्बंध घालावा. भाजी व फळ विक्रेते तसेच इतर विक्रेत्याांनी कॅरीबॅगचा वापर बंद करावा . कागदी व कापडी बॅगचा वापर करावा असे आवाहन करीत आठवडी बाजारात भाजी विक्रेत्यांना पेपर पासून बनविलेल्या कागदी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. यात सेव्ह वसुंधरा टिम सोबत ए. एस. पी. एम आयुर्वेद महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयात भव्य खुला प्लेसमेंट ड्राइव्ह

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मलकापूर दि.२३

वायु तंत्रज्ञान क्षेत्रात आपले भवितव्य घडवण्याची अपूर्व संधी साधण्यासाठी पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर (जिल्हा बुलडाणा) येथे एडव्हान्स्ड बोल्टिंग सोल्यूशन्स प्रा. लि. या अग्रगण्य कंपनीच्या वतीने २५ एप्रिल २०२५ रोजी भव्य खुला प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सकाळी ९ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला असून, यात आयटीआय, डिप्लोमा, बी.ई. आणि नॉन-इंजिनिअरिंग पदवीधरांसाठी नोकरीच्या दारं खुली करण्यात आली आहेत. चाकण, पुणे येथील या नोकरीच्या संधींसाठी प्रारंभिक पगाराची रक्कम २.६ लाख ते २.९ लाख रुपये प्रति वर्ष असेल, जी उमेदवाराच्या कामगिरीनुसार वाढू शकते. या आकर्षक संधींसोबत कंपनीकडून प्रॉव्हिडंट फंड, ईएसआयसी वैद्यकीय विमा, वाहतूक आणि कॅन्टीन सुविधा मोफत, तसेच कंपनीच्या धोरणानुसार बोनस, आकर्षक पारितोषिके, बक्षिसे आणि ओळख मिळण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रेझ्युमे, वयाचा पुरावा व आधार कार्ड, पॅन कार्ड आणि सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे बरोबर आणावी लागतील, ज्यामुळे निवड प्रक्रिया सुसूत्रपणे पार पडेल. नोंदणी ही पूर्णपणे मोफत असून, २४ एप्रिल २०२५ ही नोंदणीची शेवटची तारीख आहे. या संधीबाबत अधिक माहिती किंवा मार्गदर्शनासाठी प्रा.आर. एम. चौधरी (९७६६११८९४०) आणि प्रा. पी. व्ही. चोपडे (९०११९७९६१५) यांच्याशी संपर्क साधावा.

या प्लेसमेंट ड्राइव्हचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाचे प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे आणि प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. पी. व्ही. चोपडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे बुलडाणा जिल्ह्यातील तरुणांना वायु तंत्रज्ञान क्षेत्रात आपले करिअर उज्ज्वल करण्याची अनमोल संधी मिळणार आहे. महाविद्यालय प्रशासनाने या संधीचा लाभ घेऊन आपल्या भवितव्याला नवी दिशा द्यावी, असा विश्वास व्यक्त केला आहे.

## बेकायदेशीर बालगृहांची १०९८ वर माहिती द्या

### महिला व बालविकास विभागाचे आवाहन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२३

आपल्या परिसरात कुठेही अनधिकृत, बालगृहे, वसतिगृहे चालवली जात असल्याचे आढळताच टोल फ्री क्रमांक १०९८ वर तत्काळ माहिती द्यावी व बालकांच्या शोषणास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

पुणे जिल्ह्यातील आळंदी आणि ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे विनापरवानगी बालगृहे, वसतिगृहे आणि अनाथाश्रम चालवले जात असल्याचे वृत्त माध्यमांद्वारे प्रसिद्ध झाले. या ठिकाणी बालकांना जबरदस्तीने ठेवून त्यांच्यावर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण होत असल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या. ही बाब अतिशय गंभीर असून बाल न्याय अधिनियम २०१५, सुधारित अधिनियम २०२१ आणि महाराष्ट्र बाल न्याय नियम २०१८ यांचे सरळ उल्लंघन आहे. या अधिनियमाच्या कलम ४२ नुसार, अशा प्रकारच्या संस्थांना आवश्यक ती मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे. प्रमाणपत्राविना संस्था चालवणाऱ्या व्यक्तीस एक वर्षापर्यंत कारावास व किमान १ लाख रुपयांचा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतो. नागरिकांनी आपल्या परिसरात अशा कोणत्याही अनधिकृत संस्थांची माहिती मिळाल्यास तुरित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा अथवा चाईल्ड हेल्पलाइन टोल-फ्री क्रमांक १०९८ वर माहिती द्यावी, जेणेकरून बालकांवरील शोषण रोखता येईल. बालकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व नागरिकांनी सजग राहून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.

## बल्लाळ देवीच्या मंदिराची चोरी करणारा एकाला अटक तर तीन फरार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
चिखली दि.२३

दिनांक २१ एप्रिल वार सोमवार रोजी अकरा वाजेच्या दरम्यान अमडापूर येथील बल्लाळ देवी संस्थान हे मंदिरावर तोंडाला रुमाल बांधून तीक्ष्ण हत्यार जवळ बाळगून धुमाकूळ घातला होता. रात्री दीड वाजेच्या दरम्यान मंदिरामध्ये प्रवेश करून चोरी केली त्यांनी केलेली चोरीचा प्रकार हा मंदिरांमधील परिसरामध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद झालेला होता.



बल्लाळ देवी येथील पुजारी म्हणून नेमणूक केलेले संतोष इंगळे यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या माहितीनुसार त्यांनी दिलेल्या माहितीनुसार ते नेहमीप्रमाणे सकाळी पाच वाजता देवीला आंघोळ घालण्यासाठी व अभिषेक करण्यासाठी मंदिरामध्ये प्रवेश करत असताना मंदिराचे समोरील गेट तुटलेले दिसल्याने व चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने लगेच देवीस्थानाचे अध्यक्ष व सदस्य मंडळांना फोन द्वारे माहिती दिली. मंदिराची विश्वसनीय मंडळ यांनी मंदिरावर जाऊन अमडापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार निखिल निर्मळ यांना माहिती दिली. त्यांनी लगेच फॉरेस्टिक लॅब चे अधिकारी बुलढाणा घटनास्थळावरील चोरांनी केलेल्या चोरीच्या प्रकारांमधील त्यांनी केलेले ज्या ज्या वस्तूला हात लावलेला होता त्याचे नमुने घेण्यात आले. आरोपीने दोन चांदीचे डोरले वजन २०० ग्रॅम अंदाजे १२ हजार रुपये व तसेच नगदी २००० असा एकूण १४ हजार रुपयाचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली होती. मात्र दुसऱ्या दिवशी दि.२२ /४/२०२५ रोजी अमडापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार निखिल निर्मल व पोहे का चंद्रशेखर मुरडकर व तसेच भगवान शेवाळे यांनी मंगरूळ नवघरे येथे सापळा रचून शेख शरीफ शेख रसूल हा आरोपी मंगरूळ नवघरे येथील असून यांना अटक केली आहे व तसेच यातील अजून तीन आरोपी फरार आहेत. संतोष इंगळे यांच्या हयानुसार अमरापूर पोलिसांनी आरोपी विरुद्ध अप नंबर ११९/२०२५ कलम ३०५ ३३१ /४ नुसार गुन्हा दाखल केला आहे राहिलेले तीनही आरोपी यांना लवकरात लवकर अटक करू अशी माहिती अमरापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार निखिल निर्मल साहेब यांनी पत्रकार परिषद मध्ये सांगितले आहे.

## खरेदी केंद्रावर ज्वारी नोंदणीसाठी शेतकऱ्यांना नकार

### ख.वि.सं. विरोधात शेतकऱ्यांची तहसीलदारकडे तक्रार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
संग्रामपूर दि.२३



तालुक्यातील भ्रष्टाचार रुपाने राज्यभर नावाजलेल्या ख.वि.संघाकडुन ज्वारी खरेदी केंद्रावर खऱ्या शेतकऱ्यांना डावलुन मर्जीतील लोकांचे ज्वारी नोंदणीसाठी कागदपत्रे घेत असल्याची तक्रार दि.२२ एप्रिल २०२५ रोजी शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना लेखी निवेदनातुन दिली आहे.

शासनाने शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी करण्यासाठी राज्यात नाफेड मार्फत हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले आहेत. परंतु संग्रामपूर येथील चर्चेत असलेले खरेदी केंद्र हे भ्रष्टाचाराच्या नावाने राज्यभरात गाजलेले आहे. दरवर्षी कोणत्याना कोणत्या माध्यमातून या खरेदी केंद्रावर घोटाळा होत असतो. यापूर्वी तुर घोटाळ्यात ख.वि.सघांचे कर्मचारी व सर्व संचालक मंडळावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले होते. त्याा घोटाळ्याची व्याप्ती खुप मोठी असल्याने तो घोटाळा राज्यभर गाजला होता. असाच नियोजित प्रकार आता ख.वी.सं.संग्रामपुर ज्वारी खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांच्या निदर्शनास आला आहे. तालुक्यात यावर्षी ज्वारीचा पेरा अधिक प्रमाणात आहे.शासन शेतकऱ्यांची ज्वारी हमीभावाने खरेदी करणार असल्याचा विश्वास निच्छितच शेतकऱ्यांना आहे. परंतु संग्रामपुर खरेदी केंद्रावरचे कर्मचारी शेतमाल खरेदीपुर्वी नियमांप्रमाणे नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता मर्जीतील लोकांचे सात बारा व ईतर कागदपत्र घेऊन नेहमीप्रमाणे नोंदणी करत आहेत. त्याामुळे मुळ ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना अंधारात ठेवून कर्मचाऱ्यांचे नातेवाईक, खाजगी व्यापारी, व मागील घोटाळा प्रकरणातील काही माजी संचालक यांचेच कागदपत्रे घेऊन नोंदणी सुरू केली आहे. त्यामुळे मुळ ज्वारी उत्पादक शेतकरी या खरेदी पासुन वंचित राहणार आहेत. संबंधित ख.वि.सं. संग्रामपूर खरेदी केंद्राची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई केली असुन दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलन करणार असल्याचा ईशारा तालुक्यातील शेतकऱ्यांनी निवेदनातुन केली आहे.

या निवेदनावर विशाल चोपडे, भगवान चोपडे,गोकुळ कापसे, भागवत चोपडे,भुषन रावणकार, पवन कोकाटे, रवि चोपडे,शिवाजी सोळंके यांचे सह बहुसंख्य शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

### समृद्धी महामार्गावरील मेहकर इंटरचेंज जवळ कंटेनर हॉस्पिटलची सुविधा

## एसबीआय व क्रिएटिव्ह सेवाभावी संस्थेचा पुढाकार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मेहकर दि.२३




समृद्धी महामार्गावर होणारे अपघात पाहता एसबीआय फाउंडेशनच्या वतीने व टिटवाळा येथील सेवाभावी संस्था क्रिएटिव्ह यांच्या सौजन्याने मेहकर समृद्धी महामार्ग टोल नाक्याजवळ कंटेनर हॉस्पिटलचे २१ एप्रील रोजी केंद्रीय आयुष्य मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर, संजय प्रकाश मॅनेजिंग डायरेक्टर एसबीआय, क्रिएटिव्ह ग्रुप पब्लिक चारिटेबलं ट्रस्ट, विश्वस्त विक्रांत बापट यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कंटेनर हॉस्पिटल अत्याधुनिक सुविधांनी भरलेले आहे.

सोबतच अपघाताची माहिती मिळाल्यास रुग्णांना आणण्यासाठी अत्याधुनिक रुग्ण वाहिकेची सुद्धा व्यवस्था टिटवाळा मुंबई येथील सेवाभावी संस्था संजीवनी निरंकार सेवा क्रिएटिव्ह ग्रुपचे अध्यक्ष विक्रांत बापट यांनी केली आहे. संपूर्ण भारतात एसबीआयच्या माध्यमातून हा पहिला प्रोजेक्ट राबविण्यता येत आहे.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून पहिले कंटेनर हॉस्पिटल समृद्धी महामार्गावर मेहकर समृद्धी इंटरचेंज जवळ उभारण्यात आले आहे. समृद्धी महामार्गावरील अपघाताच्या ठिकाणाहून रुग्णाला कंटेनर रुग्णालयात घेऊन येणे रुग्णाला सेटल करणे, तेथून रुग्णाला पुढील उपचारासाठी योग्य त्या ठिकाणी पाठविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे अनेक रुग्णांना जीवदान मिळणार आहे.

यावेळी आनंद हरकरे, सचिव अभिजीत जोशी, खजिनदार प्रमोद लेले, किशोर गवाणकर, विलास पाटील, प्रमोद दलाल, पद्माकर वाघ,श्रीकांत खिस्मतराव, अरबैदू मुखोपाद्याय, सिएफओ अरविंद देव्हारे, ग्रुप हेड,मयूर ठाकरे, ओएसडी ना जाधव, राजाराम चव्हाण, शुभम कुमार, निलेश देठे आदी मान्यवर उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५

## थोडक्यात

### पत्रकार दिलिपबाप्पू देशमुख यांना राष्ट्रसेवा पुरस्कार जाहीर



**अमरावती :** मुर्तिजापुर येथिल जेष्ठ पत्रकार तसेच अकोला जिल्हा पत्रकार संघाचे कार्यकारिणी सदश्य व मुर्तिजापूर तालुका पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष असलेले व पत्रकारितेत गेल्या ३० वर्षापासून आपल्या लेखनीचा ठसा उमटवणारे सुस्वभावी व्यक्तिमत्वाचे धनी दिलिप बाप्पू देशमुख यांना पुण्याच्या पद्मश्री मनीभाई देसाई प्रतिष्ठान चा राष्ट्रसेवा पुरस्कार नुकताच जाहिर झाला असुन येणाऱ्या २७ एप्रिल २०२५ रविवार रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात प्रमुख अतिथी मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य सोहळ्यात सम्मानपुर्वक प्रदान येणार आहे. येथील जेष्ठ पत्रकार दिलिप बाप्पू देशमुख यांच्या प्रभावी लेखन शैली व शहरातील अनेक सामाजिक संस्था-संघटनांच्या कार्यास प्रशिध्दी देत त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्वपुर्ण काम करुन संस्था, सघ्रटना, मंडळांच्या पदाधिकांऱ्या प्रेरणा दिली आहे. तसेच संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान मॉ शाक्बरी प्रतिष्ठाण संलग्रित विविध संस्थेचे पदाधिकारी अभिरूची नाट्य मंडळ अकोला जिल्हा संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था मुर्तिजापूर तालुका प्रमुख व्यसनमुक्ती तहसील स्तरीय समिती सदश्य यासह विविध पदे भुषवीतांनाच मुर्तिजापूर शहरातील नावाजलेल्या शासनमान्य प्रगती संगणक टंकलेखन संस्थेचे प्राचार्य पद गत ३५ वर्षापासून यशस्वीरित्या सांभाळत हजारो विद्यार्थ्यांना संगणक साक्षर व तज्ञ करीत त्याना रोजगाराचे दृष्टीने सक्षम करीत जिवन घडवले. त्यांच्या कार्याची दखल घेत नेहरू युवा मंडळ प्रतिष्ठान व पद्यश्री मणीभाई देसाई प्रतिष्ठान यांनी घेत हा पुरस्कार घोषित केला.

### पहलगाम येथे गेलेल्या पर्यटकांसोबत राणा दाम्पत्यांनी साधला संवाद




**अमरावती :** पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात थोडक्यात बचावलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांसोबत नवनित राणा व आ.रवि राणा यांनी फोनवरुन संवाद साधुन घेतली परिस्थीतीची माहिती घेवून दिला दिलासा. पहलगाम येथे असलेल्या महाराष्ट्रातील विशेषत: अमरावती येथील पर्यटकांची राहण्याची, जेवण्याची व परत येण्याची केली व्यवस्था पर्यटकांमध्ये युवा स्वाभिमान पार्टी महिला शहराध्यक्ष चंदा लांडे, पुनम लांडे, मंगला बोळके, छाया देशमुख, निता उमेकर, राजेश उमेकर, कृष्णाई उमेकर, परी बोळके, सारिका चौधरी आणि अनय बोळके यांचा समावेश अमरावती मधिल या सर्व पर्यटकांनी आ.रवि राणा व नवनित राणा यांचे आभार मानले. पहलगाम येथे दहशतवाद्यांनी अचानकपणे भ्याड हल्ला केला यामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यु झाला. अमरावती जिल्ह्यातील पर्यटक असल्याने एक नैतीक जबाबदारी म्हणून नवनित राणा व आ.रवि राणा यांनी ताबडतोब त्याठिकाणी असलेल्या युवा स्वाभिमान पार्टीच्या महिला अध्यक्षा चंदा लांडे यांच्या सोबत तसेच इतर पर्यटकांशी फोनवरुन संवाद साधला.

# ४० लाखावर विद्यार्थ्यांची ५ मे रोजी कल चाचणी

## एससीईआरटीचा उपक्रम, विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी संधी

अजिंक्य भारत । सुधीर केने

**अमरावती, दि. २३ :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात दहावी व बारावी परीक्षा दिलेल्या चाळीस लाखावर विद्यार्थ्यांची ५ मे २०२५ रोजी कलचाचणी आयोजित केली आहे. या चाचणीमधून विद्यार्थ्यांचा भविष्यात नेमका कल कोण्या शाखेकडे आहे ते समजणार आहे. कल चाचणी झाल्यानंतर लगेच उत्तर पत्रिका तपासणी करून समुपदेशकांमार्फत विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले जाणार आहे. दरवर्षी विद्यार्थी दहावी व बारावीची परीक्षा देतात परंतु परीक्षेनंतर पुढे काय हा प्रश्न नेहमीच अनुत्तरीत असतो. आपला कल नेमका कोणत्या शाखेकडे आहे हे विद्यार्थ्यालाही कळत नाही त्यामुळे त्याच्या मानसशास्त्रीय चाचण्या घेण्यासाठी राज्य परीक्षा मंडळांनी २०१६ मध्ये कल चाचणी सुरू केली होती, पण दोन-तीन वर्ष कला चाचणी झाल्यानंतर ती बंद पडली . आता महाराष्ट्र राज्य संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या निर्देशानुसार राज्यातील प्रत्येक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला कलचाचणी घेण्याचे कळविण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५ मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजता विद्यार्थ्यांची कलचाचणी घेण्यात येणार आहे. यासाठी शाळांमार्फत विद्यार्थ्यांना लिंक पाठविण्यात आली आहे



.या लिंक वर नोंदणी केल्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या डायटला कळणार आहे. या परीक्षेसाठीचे सर्व साहित्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला पाठविण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे कलचाचणी राज्यातील प्रत्येक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत झाल्यानंतर तेव्हाच प्रश्नपत्रिका तपासून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी नेमका त्याचा कल कोणाकडे आहे यासाठी समुपदेशकांमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी ही कलचाचणी अत्यंत महत्त्वाची आहे.

### विद्यार्थ्यांना समुपदेशनाची गरज



राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेमार्फत ५ मे रोजी सकाळी साडे दहा वाजता अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची कल चाचणी ज्ञानमाता विद्यालय इरविन चौक अमरावती येथे घेतली जाणार आहे.कलचाचणी झाल्यानंतर समुपदेशकांकडून विद्यार्थ्यांना समुपदेशन केले जाईल. त्यासाठी संबंधित शाळांना सूचना दिलेल्या आहेत परंतु पाहिजे तेवढी संख्या विद्यार्थ्यांची झाली नाही ही गंभीर बाब आहे. शाळांनी आपापल्या विद्यार्थ्यांना सदर लिंक भरण्यास सांगावे व जास्तीत जास्त विद्यार्थी या कलचाचणीचा लाभ कसा घेतील याकडे मुख्याध्यापक व शिक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. ही विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी शिक्षकांनी ही बाब गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

**मिलिंद कुबडे**
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) अमरावती

## अंजनगाव बारीत गळा चिरून तरुणाची हत्या

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बडनेरा/ अंजनगावबारी, दि. २३ :** नजीकच्या अंजनगाव बारी गावातील रामगिरी बाबा मंदिरापासून जवळच असलेल्या वनविभागाच्या झुडपामध्ये ३५ वर्षाचा तरुण मृत अवस्थेत दिसून पडला त्याचा गळा चिरल्याने मृत्यू झाल्याची बाब समोर आली सदर प्रकरणी बडनेरा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे ही घटना बुधवारी सकाळी सातच्या सुमारास समोर आली.
रोशन महेंद्रसिंग नाईक वय ३५ राहणार तपोवन अमरावती असे मृत तरुणाचे नाव आहे अंजनगाव बारी गावातील रामगिरी बाबा मंदिरापासून जवळच मृतदेह दिसून पडला सदरची माहिती बडनेरा पोलिसांना कळविण्यात आली त्यानंतर पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले एक चाकू सापडला असून पोलिसांनी जप्त केला आहे मृतकाच्या आईने याप्रकरणी फिर्याद दाखल केली असून बडनेरा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे मृतकाच्या गळा चिरला असून त्याच्या हातावर चाकूचे वार आहे फिंगरप्रिंट वाले घटनास्थळी आले होते आरोपीचा शोध पोलिसांना लागलेला नव्हता अधिक तपास पोलीस करीत आहे.

## सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील लिफ्ट दोन तासातच बंद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** सुपर स्पेशालिटी रुग्णालयात कॅन्सरसह विविध आजारांवर उपचार होतात. शहरक्रिया करण्यासाठी अन्य जिल्ह्यातून रुग्ण शस्त्रक्रिया करण्यासाठी दाखल होतात. मात्र, येथे येणाऱ्या रुग्णांच्या अडचणीत वाढ झाली आहे. रुग्णालयातील लिफ्ट मागील दीड महिन्यांपासून बंद आहे. सोमवार (दि २१) रोजी ती दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र, अवघ्या दोन तासांत ती लिफ्ट पुन्हा बंद पडली आहे. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णांना पायऱ्या, तसेच स्ट्रेचर, व्हील चेअरवर न्यावे लागत आहे. लिफ्ट तत्काळ दुरुस्ती करण्याची ओरड रुग्णांसह नातेवाईकांकडून होत आहे. सुपर स्पेशालिटी रुग्णालय येथे जटिल शस्त्रक्रिया करण्यात येते. त्यामुळे या ठिकाणी दैनंदिन रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. या ठिकाणी कॅन्सर, हार्ट, प्लास्टिक सर्जरी, पेडियाट्रिक, तसेच किडनी च्या विविध आजारांवर उपचार करण्यात येतो. त्यामुळे रुग्णांची संख्या तसेच आपत्कालीन सेवाही या ठिकाणी देण्यात येते. शासनाच्या योजनांचाही रुग्णांना फायदा होतो. मात्र, या रुग्णालयातील लिफ्ट मागील दीड महिन्यांपासून बंद पडली आहे. येथे येणाऱ्या रुग्णांना पहिला आणि दुसरा माळा लिफ्ट बंद असल्याने पायऱ्यांनी जावे लागत आहे. तसेच अती गंभीर रुग्णांना व्हील चेअर वर नेण्यात येत आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना व्हील चेअर ला धक्का द्यावा लागत असल्याने रुग्णाच्या नातेवाईकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सोमवारी २१ एप्रिल रोजी सायंकाळी एका वृद्ध महिलेने आपल्या नातेवाईकांना घेऊन सुपर स्पेशालिटी रुग्णालय गाठले. यावेळी लिफ्ट बंद असल्याने येथीलच कर्मचाऱ्यांनी त्या रुग्णाला स्ट्रेचर वर घेऊन दुसऱ्या माळ्यावर दाखल करण्यासाठी निघाले. मात्र, मध्येच स्ट्रेचर वर असलेल्या रुग्णाला सोडून कर्मचारी तेथून निघून गेले. त्यामुळे सोबत असलेली वयोवृद्ध महिला स्ट्रेचर ओढण्यासाठी कर्मचाऱ्यांना मदतीची हाक देत होती.

# शहराचा वीज पुरवठा वारंवार खंडित ; नागरिक आक्रमक

## दुर्गाबक्षसिंह ठाकूर, मोहन सिंघवी, वसंत देशमुख यांनी दिले निवेदन

अजिंक्य भारत । अरुण डोंगरदिवे

**धामणगाव रेल्वे, दि. २३ :** ऐन उन्हाळ्यात एकीकडे उन्हामुळे तर दुसरीकडे वीज वितरणच्या कारभाराने नागरिक त्रस्त आहेत. दरम्यान तासनतास वीज पुरवठा खंडीत राहत असल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागला लागत आहे.काही भागांत विद्युत वाहिन्यांच्या कमीअधिक दाबामुळे विद्युत उपकरणांचेही नुकसान झाले आहे. मात्र महावितरण कंपनीला या सगळ्याशी आणि नागरिकांच्या त्रासाशी काहीच देणेघेणे नसल्यासारखाच त्यांचा कारभाराला कंटाळून तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व हिंगणगावचे सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकुर,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहन सिंघवी,नगर परिषदेचे माजी सदस्य वसंत देशमुख व आदींनी थेट अमरावती



गाठत नागरिकांच्या वतीने थेट अमरावती गाठत वीज वितरण कंपनीच्या मुख्य अभियंत्याला निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की,धामणगाव रेल्वे येथे वीज वितरण कंपनीत कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता यांच्या निष्काळजी पणामुळे धामणगाव रेल्वे येथे रोज विद्युत पुरवठा खंडित होत आहे.सहाय्यक अभियंता हे मुख्यालय येथे राहत नसल्यामुळे संबंधित वायरमन हे योग्य नव्हे रित्या काम करीत नाही. त्यामुळे विद्युत पुरवठा रोजखंडित होत आहे संबंधित सहाय्यक अभियंता यांना वारंवार फोन केल्यावर सुद्धा फोन उचलत नाही त्यामुळे गावातील नागरिकांना त्रास होत आहे.सहाय्यक अभियंता जेव्हापासून धामणगाव येथे रुजू झाले आहे तेव्हापासून नेहमी विद्युत पुरवठा खंडित होत आहे त्याबाबत त्यांच्याकडे वारंवार तक्रार केल्यावर सुद्धा कोणत्याच प्रकारे विद्युत पुरवठा सुरळीत करत नाही.सहाय्यक अभियंता यांना धामणगाव वरून त्वरित हटवण्यात यावे व धामणगाव रेल्वे येथील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.हिंगणगावचे सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकुर,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहन सिंघवी,नगर परिषदेचे माजी सदस्य वसंत देशमुख व आदींनी थेट अमरावती गाठत नागरिकांच्या वतीने थेट अमरावती गाठत मंगळवारला (ता.२२) वीज वितरण कंपनीच्या मुख्य अभियंत्याला निवेदन दिले.

### सहनशीलतेचा अंत पाहू नये

वीज वितरण कंपनीच्या विद्युत प्रवाहित असंख्य तारा खांबांवरून खाली जास्त प्रमाणात लोमकळत असल्याने वाऱ्याची झुळूक येताच एकमेकांना स्पर्श होऊन विद्युत पुरवठा खंडित होतो. त्यामुळे यांची दुरुस्ति केव्हा होणार हा प्रश्न उपस्थित झाला आहे.तालुक्यात अनेक ठिकाणची रोहित्र उघडे दिसून येतात.काही ठिकाणची विद्युत खांब वाकलेली तर काही फार जुनी झाल्याने भग्नावस्थेत असल्याने जीवित हानी टाळता येणार नाही हे वास्तव आहे.मात्र वीज वितरण कंपनीच्या देखभाल दुरुस्तीवर प्रश्नचिन्ह लागले आहे.त्यामुळे प्रत्यक्षात देखभाल दुरुस्ती करावी.वीज वितरण कंपनीने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये.

### टीव्ही बंद केल्याच्या कारणावरून मारहाण

**अमरावती :** टीव्ही बंद का केला या कारणावरून एकास मारहाण करून जखमी केल्याची घटना वरूड तालुक्यातील करजगाव (गांधीघर) येथे घडली. या प्रकरणी बेनोडा (शहीद) पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना नुकतीच घडली. सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी राहूल याने त्याचे घरातील टीव्ही बंद केला असता आरोपी उमेश याने टीव्ही बंद का केला. या कारणावरून राहुलला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व हातातील लाकडी काठीने मारून जखमी केले. व शिविगाळ करून मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी राहूल मनोहर बहुरुपी, २७, रा. करजगाव गांधीघर यांचे तक्रारीवरून बेनोडा (शहीद) पोलिसांनी उम ेश दौलतराव युवनाते, ३८ रा. करजगाव गांधीघर यांचेविरूध्द कलम ११८(२), ३५१ (२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात-खा. वानखडे

### तिवसा तालुक्याच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना निर्देश



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामीण भागातील भारनियम, पाणी टंचाई तसेच नागरिकांच्या अन्य समस्यांवर बुधवारी (ता.२२) तिवसा तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली. नागरिकांना भेडसाविणाऱ्या विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना करम्याच्या सूचना खासदार बळवंतराव वानखडे तसेच माजी मंत्री आणि तिवसा मतदारसंघाच्या माजी आमदार ॲड.यशोमतीताई ठाकूर यांनी आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्यात. यावेळी तहसीलदार मयूर कळसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी श्री. बोरसे, तिवसाचे गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे यांच्यासह तिवस्याच्या नगराध्यक्षा प्रतिभा गौरखेडे , उपनगराध्यक्षा प्रिया विघ्ने , दिलीपराव काळपांडे , योगेश वानखडे , शिवदास मुसळे, रितेश पांडव, लुकेश केने, मुकुंद पुनसे, संदीप आमले, वैभव वानखडे, राकेश चौधरी, पंकज कळंबे, संदीप ठाकरे, सूरज धुमनखेडे, सतीश पोजगे, शहजाद पटेल, छत्रपती डोंगरे, प्रणव वानखडे, अमर वानखडे, शशांक राउत, रामू तांबे, नितीन अर्डक, खरेदी विक्रीचे सभापती सुरेश मेटकर, बाजार समितीचे सभापती रवी राउत, यांच्यासह खविंसचे संचतालक , सभापती व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला काश्मिरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली देण्यात आली. यावेळी संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले होते.
सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच महिलांच्या अनेक समस्यांना घेवून जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बळवंतराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सर्वप्रशासकीय विभागांना एकाच छताखाली आणण्यासाठी आढावा बैठकांचे धडकसत्र सुरू केले असून तिवसा तालुक्याच्या समस्यांना घेवून बुधवारी (ता.२३) तहसील कार्यालयात तालुका आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याला नागरिकांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला. विविध विभागांशी संबंधित समस्यांना घेवून सर्वसामान्य नागरिक, महिला याठिकाणी आल्या होत्या.

# चंद्रपूरमधील नागरिकांनी मजीप्राच्या कार्यालयाला ठोकले कुलूप

## माजी राष्ट्रपतीच्या गावात पाणी टंचाईमुळे ग्रामस्थ आक्रमक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २३ :** तालुक्यातील माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील चंद्रपूर या गावांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून गावकऱ्यांना पाणी पुरवठा केल्या जातो. मात्र गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे,गावातील संतप्त नागरिक व महिला चंद्रपूर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीवर धडकले. चंद्रपूर येथे असलेल्या पाण्याच्या टाकी मधून तब्बल २५ गावांना पाणीपुरवठा केला जातो. ज्याकरीत येथे तीन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या तीन कर्मचाऱ्यांपैकी एक कर्मचारी कर्तव्यावर




असताना,चंद्रपूर गावातील पाणीपुरवठ्याच्या वेळेमध्ये कपात करून तो पाणीपुरवठा त्याच्या गावाला करतो,तसेच खल्लार स्टॉप वर असलेल्या नळ कनेक्शन धारकांकडे तेथील पाणीपुरवठा करणाऱ्या व्हालचा पाना त्यांच्याकडेच राहत असून, ते कनेक्शन धारक मन मर्जीप्रमाणे केव्हाही पाणीपुरवठा स्वतःकरिता करतात. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा ऱ्हास होत असल्याचा ज्वलंत आरोप गावकऱ्यांनी केला आहे.ज्यामुळे चंद्रपूर येथील पाण्याच्या मेन टाकीमध्ये पाण्याची पातळी खालावते व गावकऱ्यांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.
पाणीपुरवठा करणाऱ्या प्राधिकरणच्या मेन दरवाजाला कुलूप लावतावेळी गावचे सरपंच चंचल गजभिये,पोलीस पाटील महेंद्र मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य विशाल घरडे तसेच नागरिक व महिलांनी चंद्रपूर येथून इतर गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या व्हालचे पाने ग्रामपंचायतला जमा केले आहे. जोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्याची तात्काळ उचल बांगडी करण्यात येत नाही, व गावकऱ्यांना मुबलक पाणीपुरवठा देण्यात येत नाही तोपर्यंत कार्यालयाचा कुलूप तसेच पाने देण्यात येणार नाही अशी ठाम भूमिका ग्रामपंचायत तसेच गावातील नागरिकांनी यावेळी रेटून धरली होती.

“ गेल्या काही दिवसांपासून गावामध्ये पाणीपुरवठा ठरवल्या वेळेप्रमाणे होत नसून ग्रामस्थ त्रस्त झाले आहे. होत असलेल्या कमी पाणीपुरवठ्यामुळे गावातील नागरिक,महिला पाणीपुरवठा होत असलेल्या स्थानी धडकले. चौकशी केली असता, मुख्य टाकीला पाण्याची पातळी कमी असल्यामुळे नागरिकांना पाण्याची गैरसोय होत असल्याचे सांगण्यात आले. मात्र घडा या गावाला त्याच वेळी येथून पाणीपुरवठा चालू असल्याचे निदर्शनास आले, ज्यामुळे गावकर्यांशी दुजाभाव होतं असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी तात्काळ टाकी आवाराच्या मुख्य गेटला माझ्या उपस्थितीत कुलूप ठोकले.

**डॉ.चंचल गजभिये,** सरपंच ग्रा.पं.चंद्रपूर

“ गेल्या तीन दिवसापासून जलसाठा टाकीमध्ये व्यवस्थित जमा होत नसल्यामुळे गावकऱ्यांना व्यवस्थित पाणीपुरवठा मिळू शकला नाही.

**हेमंत काळे,** मजीप्रा चंद्रपूर चौकीदार

अजिंक्य भारत

अमरावती जिल्हा

गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५



## थोडक्यात

### दापोरी शाळेत बक्षीस व निरोप समारंभ



**मोर्शी :** जी.प.शाळा दापोरी येथे बक्षीस वितरण व निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला.वर्ग सातवी मधील विद्यार्थी व शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेले दिनेश श्रीराव यांना शाळेतर्फे भावपूर्ण निरोप देण्यात आला.भविष्याचा पाया मजबूत करणारे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय.आज तुम्ही हे शिक्षण घेऊन भविष्यात उंच भरारी घेणार आहेत अश्या भावना अनेक मान्यवर मंडळींनी व्यक्त केल्या. शाळेचे होतकरू,आदर्श शिक्षक,सकारात्मक विचार असणारे अध्यापक श्रीराव सर यांची चां. रेल्वे येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून बदली झाली.त्याबद्दल त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.आज शाळेत शिक्षण घेणाऱ्या १८० मुलामुलींना फाईल बक्षिस देण्यात आले.भावी आयुष्यात महत्वाचे कागदपत्र ठेवण्यासाठी हे फाईल उपयोगात येणार आहे. आणि आयुष्यभर शाळेची आठवण पण ह्या रूपाने राहील. याकरीता हे मोठे बक्षीस देण्यात आले असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक गजानन चौधरी यांनी सांगितले.ह्याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघण्यासारखा होता. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी मनोगत व्यक्त केले.गावाच्या सरपंच संगीताताई ठाकरे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेशभाऊ अंधारे,उपाध्यक्ष सौ. प्रगती सकर्डे,श्री रूपेश वाळके,सर्व ग्राम पंचायत सदस्य,शाळा समिती सदस्य हजर होते.आभार सौ.माधुरी घोंगडे यांनी माणले. दारोकार, संकेत भोरे यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

### संतोष कावरे विवेकानंद मंडळाचे अध्यक्ष



**अमरावती :** भाजपकडून रविवारी एकाचवेळी शेकडो मंडळ अध्यक्षांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली. याच अनुषंगाने स्वामी विवेकानंद मंडळात संतोष कावरे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. निरीक्षक संध्या टिकले व सदू पुंशी, रमेश टेंभरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही घोषणा करण्यात आली. भाजप नेत्या संध्या टिकले निरीक्षक, सदू पुंशी आणि रमेश टेंभरे मार्गदर्शकपदी नियुक्ती झाली. यावेळी माजी अध्यक्ष श्रीकांत धानोकर, भाग्यश्री देशमुख, राजीव मेटे, सुनील मालोदे, भारती वाघमारे, रूपेश दुबे, पुनसे आणि इतर उपस्थित होते. वरिष्ठ कार्यकर्ते सेलचे पुंशी आणि टेंभरे उपस्थित होते. उद्योजक अभियंता नितेश नरेशराव देशमुख यांनी पुष्पगुच्छ देऊन संतोष कावरे यांचे स्वागत केले.

### सरसकट कर्जमाफीची मागणी



**मोर्शी :** शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करून मुक्तता देण्यात यावी. अन्यथा १ मे महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तसेच मंत्रालयासमोर अन्नत्याग आंदोलन छेडण्याचा इशारा मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला असून अशा आशयाचे एक लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रवाना करण्यात आले. सत्तारूढ भाजप सरकारच्या वतीने सन २०२५ च्या निवडणुकीत शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यात येईल असा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता. निवडणूक होऊन भाजप सरकार सत्तेत आलं परंतु बजेट अधिवेशनात मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची कोणतीच घोषणा करण्यात आली नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात न आल्यामुळे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या हाती लागलेल्या पिकांना मात्र हमीभाव मिळत नाही. त्यामुळे त्यांना आपला माल खुल्या बाजारात विकावा लागून नुकसान सहन करावे लागते.या सर्व गंभीर समस्येची दखल घेऊन राज्य सरकारच्या वतीने निवडणुकीत प्रसिद्ध केलेल्या वचननाम्यानुसार सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी.अन्यथा १ मे महाराष्ट्र दिनी अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा मुरलीधर उर्फ नाना डहाणे, प्रमोद चौधरी, पुरुषोत्तम धोटे, राजेंद्र पाथरे, नंदकिशोर सोमवंशी, विवेक वानखडे, ज्ञानेश्वर गायकवाड, नंदकुमार वानखडे यासह शेकडो शेतकऱ्यांनी दिला आहे.

# चिमुकल्यांना उन्हाचा ‘झपका’ नाही

## अंगणवाडी सकाळी ८ ला भरणार, महिला बालकल्याण विभागाचा निर्णय

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** मार्च महिन्यातच जिल्ह्यात सध्या कडक उन्हाच्या तीव्र झळा जावणू लागल्या आहेत. त्यामुळे ऊन लागण्याची शक्यता लक्षात घेता बालकांना जिल्हाभरातील अंगणवाडी केंद्र मंगळवार सकाळी ७:४५ दुपारी १२:३० वाजेपर्यंत भरवण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाने दिले आहेत. त्यामुळे बालकांना पर्यायाने पालकांचाही त्रास कमी झाला आहे. जिल्ह्यात दोन हजार ५०० पेक्षा अधिक केंद्रे आहेत. या अंगणवाडी केंद्रांमार्फत लाभार्थी, गर्भवती माता, स्तनदा माता, तसेच ३ ते ६ वयोगटातील बालके, किशोरवयीन मुली आदींना शासनाच्या वेगवेगळ्या सुविधांचा लाभ दिला जातो.

अंगणवाडी केंद्राचे कामकाज किमान साडेचार तास चालविण्यात यावे, असे अपेक्षित असून, सध्याच्या स्थितीत उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता अंगणवाडी केंद्र सकाळी ८ ते दुपारी १२:३० वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात यावे, याबाबतचे



आदेश तसेच कामकाजाचे वेळापत्रक ठरवून देण्यात आले आहे. याबाबत जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसाळे यांनी चौदाही तालुक्यांतील संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांना आदेश पाठवले आहेत.

यानुसार ३० जूनपर्यंत या वेळेप्रमाणे अंगणवाडी केंद्रे सुरू राहणार आहेत.

### शासकीय सुटी वगळता भरत होती दुपारी

याआधी सोमवार ते शुक्रवार अंगणवाडी ही शासकीय सुटी वगळता १०:३० ते दुपारी २ या वेळात भरवण्यात येत होती. आता अंगणवाडी सकाळी ८ ते १२:३० या वेळेत भरणार असल्याने अंगणवाडीतील बालकांना उन्हापासून होणाऱ्या त्रासापासून सुटका मिळणार आहे.

### कामकाजाचे दैनंदिन वेळापत्रक

पूर्व शिक्षण सकाळी ८:४५ ते ९ वाजेपर्यंत लाभार्थ्यांना सकाळचा नाश्ता वाटप, सकाळी ९ ते १०:४५ पर्यत पूर्व शालेय शिक्षण, सकाळी १०:४५ ते ११:४५ पूरक पोषण आहार वाटप करणे, ११:४५ ते १२:३० रेकॉर्ड लिहिणे, दुपारी १२:३० ते १ वाजेपर्यंत संदर्भ सेवा आणि गृहभेट दुपारी १ ते २ वाजेपर्यंत अंगणवाडी सेविकांना याप्रमाणे कामकाज करावे लागणार आहे. याबाबतचे वेळापत्रकही महिला व बालकल्याण विभागाने निश्चित करून दिले आहे.

### आ.रवि राणा यांच्या विकास निधीतून झाले बांधकाम

## श्री.कालीमाता मंदिर प्रवेशद्वाराचे शक्ती महाराजांच्या हस्ते लोकार्पण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** कालीमाताच्या आशीर्वादाने मिळालेली शक्तीद्वारे जनतेची विकास कामे करुन सेवा करणार आ.रवि राणा अमरावती बडनेरा विधानसभा क्षेत्रात ज्या ज्या ठिकाणी मंदिर असेल त्या प्रत्येक मंदिराला प्रवेशद्वार बांधण्याचा संकल्प करुन आ.रवि राणा यांच्या विकास निधीमुधन संपुर्ण बडनेरा मतदार संघात असलेल्या मुख्य मंदिरांच्या प्रवेशद्वाराच्या बांधकामांकरिता भरीव निधी देऊन आ.रवि राणा यांनी प्रवेशद्वाराचे बांधकाम करुन दिले. त्या अनुषंगाने संपुर्ण अमरावती जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध असलेल्या अमरावती स्मशानभुमी जवळील




श्री.कालीमाता मंदिर हे सर्व भक्तांचे श्रद्धास्थान असुन नवरात्रामध्ये हजारो भक्त याठिकाणी दर्शन घेण्याकरिता येत असतात. त्या अनुषंगाने या मंदिराला भव्य दिव्य प्रवेशद्वार झाले तर आणखी श्री.कालीमाता मंदिराची शोभा वाढविण्याच्या उद्देशाने आ.रवि राणा यांच्या विकास निधीमधुन श्री. कालीमाता मंदिर प्रवेशद्वाराचे भव्य दिव्य बांधकाम करण्यात आले.

याच प्रवेशद्वाराचे लोकार्पण आ.रवि राणा व कालीमाता मंदिराचे पुजारी श्री.शक्ती महाराज यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले की, श्री.कालीमाताच्या आशीर्वादाने मिळालेल्या शक्तीद्वारे व आशीर्वादाने जनतेची विकास कामे करुन जनतेची सेवा करणार असल्याचे यावेळी सांगितले या लोकार्पण प्रसंगी गणेशदास गायकवाड, अशोक पांडे, राजेश अंबाडकर, नाना सावरकर, चंदु जावरे, भुषण पाटणे, प्रविण मोखडे, पराग चिमोटे, सागर लोखंडे,

भारत चव्हाण, बंडु गवई, राजु चव्हाण, रामभाऊ विजयकर, अरुण चव्हाण, देविदास मेशकर, वासुदेव कोठेकर, जिवन विजयकर, विलास विजयकर, राजु बोरकर, हेमंत विजयकर, गणेश मेशकर, अरविंद सावरकर, पिंटु चव्हाण, शेखर गायकवाड, योगेश पेढेकर आदि उपस्थित होते.

## भिमजयंतीदिनी गुणवंतांचा सत्कार



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. २३ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त टिमटाळा येथील सम्राट नवयुवक विद्यार्थी मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गावातील विविध कलागुणांनी प्रभुत्व मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये विधी शाखेच्या पदव्युत्तर पदवी विशेष प्राविण्य मिळवलेल्या ॲड. सुजाता करवाडे, रेश्मा मेंढे सम्राट संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरज सहारे यांनी महामानवाच्या पुतळ्याचे पूजन केले. स्वागत समारंभानंतर संजयजी कराळे यांच्या तर्फे अल्पोपहार व पंकज गेडाम यांच्या तर्फे आयोजित शरबत वितरणाचा आस्वाद ही घेण्यात आला. या कार्यक्रमाला पॉवर ऑफ मिडीया चे नांदगाव खंडेश्वर तालुका अध्यक्ष श्रीपाल सहारे, प्रभाकर कोटांगळे, गणेश सहारे, आकाश कटकतलवारे, गौतम सहारे, सुरेश मेंढे, सतिश कोटांगळे, यश सहारे, संकेत कोटांगळे, विशाल कटकतलवारे, छाया मेंढे, अमिता तिडके, जया सहारे, रेखा कटकतलवारे, कमल सहारे, माया कोटांगले प्रमाणेच गावातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## शेतातील पीक आणायचेच नाही का?

### रामा येथील शेतकऱ्यांचा आक्रोश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पूर्णानगर, दि. २३ :** येथून जवळच असलेल्या रामा येथील शेतकऱ्यांच्या शेतीचा वाहिवाटीचा रस्ताच केल्याने आता शेतातील पीक घरी कसे न्यावे अशी गंभीर समस्या शेतकऱ्यांपुढे निर्माण झाल्याने महोदय.. आम्ही शेतातील पीक कसे न्यावे? असा प्रश्न राम्यातील काही शेतकरी खास दारासहित संबंधित अधिकाऱ्यांना विचारत आहेत. याबाबत असे समजते की, रामा येथील गट क्र.१००/०१ ते १००/ १३ या सर्वे मधील सर्व खातेदार गेल्या चाळीस वर्षपासून गट क्र. १००/१ या शेतसाऱ्यातून ये-जा करीत होते. परंतु यावर्षी राजेश उमेकर नामक शेतकऱ्यांनी जेसिबी द्वारे खोदकाम करून रस्ता



बंद केल्याने काही शेतकऱ्याचा बंद झाल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्याकडे धाव घेतली परंतु त्यांनी कुठलीच दखल न घेतल्याने शेवटी गावचे माजी सरपंच सुनील खांडेकर यांच्या नेतृत्वात काही शेतकऱ्यांनी २२ रोजी ला अमरावती येथील बचत भवनात खासदार बळवंत वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भातकुली तालुका आढावा बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडली असता ही समस्या लवकर निकाली काढू असे आश्वासन मिळाल्याने यावर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वृत्तपत्र विक्रेते स्व.विश्वासराव शिंगणे व स्व.संतोष चौखंडे यांचा स्मृतिदिन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २२ :** तालुक्यामध्ये एकेकाळी वृत्तपत्र विक्रेत्यांमध्ये कार्यरत असलेले स्वर्गीय विश्वासराव शिंगणे व त्यांचे जावई स्वर्गीय संतोष लोखंडे यांचा स्मृतिदिवस एकच दिवस असल्याने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा त्यांचा स्मृतिदिवस प्रेस क्लब दर्यापूर पावर ऑफ मीडिया, प्रतिभा साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दर्यापूर उपजिल्हा रुग्णालय येथे खासदार बळवंत वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत रुग्णांना दूध व बिस्कीट पुढे वाटप कार्यक्रम करण्यात आला सर्वप्रथम स्वर्गीय विश्वासराव शिंगणे व स्वर्गीय संतोष चौखंडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व त्यानंतर खासदार




बळवंत वानखडे यांच्या हस्ते दूध व बिस्कीट वाटपाचा शुभारंभ करून सर्व रुग्णांना दूध आणि बिस्कीट चे वाटप कार्यकर्त्यांच्या हस्ते करण्यात आले त्याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर गुंजन गुल्हाने दर्यापूर नगरपरिषद माजी उपाध्यक्ष सागर गावंडे, दर्यापूर मनसे प्रमुख मनोज पाटील तायडे, दर्यापूर शहर शिवसेना गट शहराध्यक्ष गोपाल अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील अरबट, किरण भाई शहा, मुकेश पाटील नळकांडे, जिल्हा परिषद शिक्षक बँक संचालक तुळशीदासजी धांडे, आशिष बरगट, संतोष मिसाळ, राजू पाटील ढोले, निलेश पारडे, प्रदीप दानाडे, प्रतिभा साहित्य संघ अध्यक्ष विनोद पाटील शिंगणे, श्री चौखंडे, व इतर कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते पाहता पाहता २३ वा स्मृती दिवस रुग्णालयामध्ये साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चा आभार पावर ऑफ मीडियाची जिल्हा उपाध्यक्ष गजानन देशमुख यांनी केले.

## बांबूच्या गंजीला आग

**अमरावती :** वरूड तालुक्यातील सैदापूर शेतशिवारात मध्यरात्रीच्या सुमारास बांबूच्या गंजीला अचानक आग लागून त्यामध्ये अंदाजे सात लाख रुपयाचे नुकसान झाले. सैदापूर शेतशिवारात शेख मुश्ताक शेख बुरहान यांची शेती असून त्या ठिकाणी असलेल्या कुटुंब सुद्धा राहत होते. घटनेच्या दिवशी रात्रीच्या सुमारास शेतातील कुटुंब गाढ झोपेत अशताना रात्री अचानक फटाके फुटत असल्यासारखा आवाज ऐकू आल्याने काही सदस्य झोपूतून जागे झाले. बघितले असता शेतातील बाशांची गंजी जळत असल्याचे दिसून आले. तेथे असलेल्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. तर काहींनी अग्निशमन दलाला भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. यामध्ये ८ हजार ५०० बांबू, १५ ते २० संत्रा झाडे, ठिंबक सिंचन साहित्य यासह एकूण ६ ते ७ लाखांचे साहित्य जळून खाक झाले.

## यू-डायस क्रमांकित शाळांच्या जीआयएस मॅपिंगला प्रारंभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार राज्यभरातील सर्व यु-डायस क्रमांकित शाळांचे जीआयएस मॅपिंग सुरू करण्यात आले. शिक्षण आयुक्तांच्या गुरुवारी (दि.१७) झालेल्या ऑनलाइन बैठकीत यासंदर्भात सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आणि शाळांना आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिवशी अनेक तांत्रिक अडचणी उभ्या राहिल्यामुळे शाळा प्रशासनाची मोठी तारांबळ उडाली.

राज्य शासनाने जीआयएस मॅपिंगसाठी महा स्कूल जीआयएस १.० हे विशेष ॲप तयार केले असून, ते प्ले स्टोअरवर उपलब्ध नसल्याने त्याची एपीके फाईल शाळांना




स्वतंत्रपणे वितरित करण्यात आली होती. काही शाळांना ही फाईल वेळेवर मिळाली नाही, तर काही ठिकाणी मोबाइलच्या प्ले प्रोटेक्ट सेटींगमुळे ॲप इन्स्टॉल करताना अडथळे आले. काही शाळांमध्ये लॉगिन करताना अडचणी, नेटवर्क समस्या, ओटीपी वेळेवर न येणे, ॲप हँग होणे आणि फोटो अपलोड करताना त्रुटी अशा अनेक समस्या उद्भवल्या. प्रत्येक शाळेने संस्थेचा समोरचा दृश्य, एकंदर परिसर, स्वयंपाकगृह, स्वच्छ पिण्याचे पाणी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र शौचालय यांचे जिओ-टॅग केलेले फोटो अपलोड करणे आवश्यक होते. मात्र, ॲपच्या कार्यक्षमतेत अडचणी आल्यामुळे अनेक शाळांचे जीआयएस मॅपिंग अपूर्ण राहिले. मुख्याध्यापक व शिक्षकांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तांत्रिक अडचणींसोबतच कामाचा ताण वाढला असून नियोजनात सुसूत्रता नसल्यामुळे वेळ वाया गेला, अशी प्रतिक्रिया अनेक शिक्षकांनी दिली. केवळ एका दिवसात सर्व शाळांचे मॅपिंग पूर्ण करण्याच्या आदेशामुळे अनेकांना अडचणीत सापडावे लागले.



सुट्टया असताना शिक्षक कामात जीआयएस मॅपिंग करायला मुख्याध्यापकांचा विरोध नाही परंतु गेल्या तीन दिवसांपासून तासनतास बसून सुट्टया असतांनी सुद्धा मुख्याध्यापक जीआयएस मॅपिंगचं काम करत आहे. परंतु ॲपच्या गोंधळामुळे व जीआयएस मॅपिंग शाळेतच कराव लागत आहे. याशिवाय काही ठिकाणी शाळेत रेंज नसल्यामुळे जीआयएस मॅप होत नाही तेव्हा प्रशासनाने जीआयएस मॅपिंग करण्यासाठी दुसरा एखादा पर्याय सुचवावा, पर्याय आल्यानंतरच राज्यातील १००% शाळांची जीआयएस_ . मॅपिंग होई_ . ल कारण अमरावती जिल्हातील मेळघाट या आदिवासी क्षेत्रात नेटवर्कच नाही तेथे_ . कसे मॅपिंग होणार.

**राजेश सावरकर,**
राज्य प्रसिध्दी प्रमुख,प्राथमिक शिक्षक समिती

## सरपंच संघाची राज्य कार्यकारिणी गठित

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. २३ :** ग्रामपंचायत स्तरावरील नेतृत्वाचे सशक्तीकरण, सरपंचांच्या हक्कांचे संरक्षण आणि ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी कार्यरत असलेल्या राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ,नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. ही घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष ठाकुर चंदन सिंग (बिहार) यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष आदित्य उपाध्याय (छत्तीसगढ), उपाध्यक्ष राहुल उके (महाराष्ट्र), महासचिव मुकेश सकीया (गुजरात), सचिव रवींद्र यादव (उत्तर प्रदेश) व प्रवक्ते गौरव जयराम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या नवगठित महाराष्ट्र कार्यकारिणीत राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून निवडलेले सक्षम व सक्रिय पदाधिकारी सहभागी असून त्यांचा उद्देश एकच ग्रामविकासाच्या दिशेने ठोस पावले उचलणे. ही कार्यकारिणी ग्रामपंचायत व्यवस्थेला मजबुती देण्यासाठी सरकारदरबारी विविध मागण्या मांडण्याचे काम करणार आहे.

महाराष्ट्र कार्यकारिणीतील नवे पदाधिकारी पुढीलप्रमाणे: अध्यक्ष : प्रमोद पांडुरंग सांगोले (अमरावती), प्रभारी : सुनिल युवराज पाटील (जळगाव), सह-प्रभारी : विशाल कांबळे (कोल्हापूर), कार्याध्यक्ष : प्रा. अरुण देवडे (नाशिक), महासचिव : प्रा. नितीन सुभाषराव ताथोड (अकोला), संघटक : रमेश बबनराव गडदे (पुणे), उपाध्यक्ष : श्री. सागर कांतीलाल अभंग (सातारा), श्री. नवनाथ चांगदेव जोंधळे (शिर्डी), श्री. रवी वसंत पाटील (सांगली), संपर्क प्रमुख : श्री. राजकुमार सो. मेश्राम (अमरावती), सचिव : डॉ. शंकरराव राजपाल ठाकरे (अमरावती), कोषाध्यक्ष : श्रीकृष्ण बाळकृष्ण झटाले (अकोला), सोशल मीडिया प्रमुख : जितेंद्र र. गोडांणे (नागपूर) यांचा समावेश आहे.

## घटना-घडामोडी



### ४५ हजार रुपयांची हरविलेली अंगठी केली परत

**महागाव :** सवना येथील संभाजी तंबाखे यांनी श्रीराम मंदिरात सापडलेली सेवानिवृत्त मुख्याध्यापक जगदीशराव सरसमकर यांची ४५ हजार रुपये किंमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी प्रामाणिकपणे परत केली. त्यांच्या या कृतीचे कौतुक होत आहे. संत गिरधारी महाराज पुण्यतिथीनिमित्त मंदिरात झालेल्या भागवत कथेदरम्यान सरसमकर यांची अंगठी हरविली होती. दोन दिवसांनी ती तंबाखे यांना सापडली. त्यांनी धनगर समाज अध्यक्ष सुरेशराव गोरे, पांडुरंग काकडे, कैलास टेकाळे, गजानन टेकाळे यांना माहिती दिली. सरसमकर कुटुंबीय (किसनराव, विनायक, प्रफुल) यांच्या उपस्थितीत तंबाखे यांनी मंदिरात अंगठी परत केली. यावेळी तंबाखे यांचा रोख रक्कम, शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.



### पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या 'माझ्या अंतरंगातून' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**यवतमाळ :** येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील पाचवीच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या 'माझ्या अंतरंगातून' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन सोमवारी (दि. २१) झाले. प्रकाशन पुणे परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी राठोड यांनी निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली व शाब्दिक उदाहरणे तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनी संग्रहातील कविता वाचल्या व प्रस्तावना लिहिणार असल्याचे सांगितले. या उपक्रमाबद्दल विद्यार्थी व वर्गशिक्षिका कीर्ती राठोड यांचे त्यांनी कौतुक केले. नवोदयसाठी निवडलेल्या दोन विद्यार्थ्यांचेही अभिनंदन केले देखील. यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा उपस्थित होते.

### महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन

**यवतमाळ:** येथे २७ व ३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर



जयंतीनिमित्त दोन दिवसीय उत्सव होत आहे. वीरशैव हितसंवर्धक मंडळ व संलग्न संस्थांतर्फे शिल्पकृती अनावरण, भव्य शोभायात्रा, मोटरसायकल रॅली व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात २७ एप्रिलला सकाही ९ वाजता महात्मा बसवेश्वर भवनात चित्रकला व वकृत्व स्पर्धा आयोजित आहेत. ३० एप्रिलला सकाळी ८ वाजता मेनलाईन येथील महात्मा बसवेश्वर चौकात आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्याहस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या देखण्या शिल्पकृतीचे अनावरण होईल. यानंतर भव्य मोटरसायकल रॅली निघेल. सायंकाळी ६ वाजता वाणीपुरा येथील गणपती मंदिरातून भव्य शोभायात्रेला प्रारंभ होईल. गुरुवर्य कैलासलिंग महाराज, तळेगाव आणि ठाणेदार रामकृष्ण जाधव यांच्याहस्ते महात्मा बसवेश्वर प्रतिमेचे पूजन होईल. पालवी नृत्य, फिरते मलखांब, भव्य रथ, संदेशपर झाँकी, लेझीम पथक, वारकरी भजन मंडळ हे शोभायात्रेचे मुख्य आकर्षण असेल. रात्री ८ वाजता महावीर भवन, यवतमाळ येथे महाप्रसादाने उत्सवाची सांगता होईल. यात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. जयेश हातंगावकर यांनी केले असून, सचिव नीलेश शेटे यांनी ही माहिती दिली.

### भाजप दक्षिण शहराध्यक्षपदी सूरज गुप्ता यांची निवड

**यवतमाळ :** भारतीय जनता पक्षाच्या यवतमाळ शहर (दक्षिण)



अध्यक्षपदी सुरज गुप्ता यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. प्रदेश व जिल्हा नेत्यांच्या सूचनेनुसार रविवारी (दि. २०) ही निवड जाहीर झाली. जिल्हा निवडणूक अधिकारी राजू पडगिलवार यांच्या उपस्थितीत शहर निवडणूक अधिकारी प्रफुल्ल चव्हाण यांनी ही घोषणा केली. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण, माजी मंत्री मदन येरावार, जिल्हाध्यक्ष तारचंद बोर्डे यांच्या सूचनेनुसार ही निवड झाली. गुप्ता यांनी युवा मोर्चात जिल्हा व प्रदेश स्तरावर काम केले आहे. त्यांच्या संघटन कौशल्य व निष्ठेची दखल घेत ही जबाबदारी दिल्याचे मानले जात आहे. निवडीमुळे विशेषतः युवा वर्गात आनंद आहे.

### जागेच्या वादातून कुटुंबाला मारहाण

**पुसद:** तुम्ही आमच्या जागेवर बांधकाम करत होता, ते का थांबविले, असे म्हणून सात जणांनी संगनमत करून फिर्यादीच्या आई-वडिलांना शिवीगाळ केली. तसेच, फिर्यादीच्या वडिलांना काठीने डोक्यावर, पाठीवर आणि डाव्या हातावर मारून जखमी केले. फिर्यादी त्याची बहीण आणि भाऊजी यांनीही काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. दिनेश सकाराम मैदान (वय २१, रा. कृष्णनगर) यांच्या फिर्यादीवरून पुसद ग्रामीण पोलिसांनी राजाराम सीताराम मैदान (वय ६०) यांच्यासह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. शरीर दुखापतींच्या घटनांमध्ये वाढ होणे ही गंभीर बाब आहे, पुसद तालुक्यात क्षुल्लक कारणावरून अशा घटनांमध्ये मोठे गंभीर स्वरुपाचे गुन्हे घडत असल्याचे चित्र आहे.

# मुरलीच्या महिला वाटीने भरतात हंडी

## ७५ वर्षांपासून गाव विकासापासून कोसो दूर, पाण्यासाठी वणवण, कधी भागणार तहान?

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २३ :** उमरखेड तालुक्याच्या दुर्गम बंदी भागातील मुरली सहस्त्रकुंड तांडा सध्या भीषण पाणीटंचाईच्या खाईत लोटला गेला आहे. प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत असून, तासनतास विहिरीत बसून वाटीने पाणी उपसून हंडे भरण्याची हृदयद्रावक वेळ त्यांच्यावर आली आहे. तातडीने पाणीपुरवठा न झाल्यास आंदोलनाचा इशारा संतप्त गावकऱ्यांनी दिला आहे.



यवतमाळ जिल्ह्याच्या नकाशावरही सहजासहजी न सापडणारा हा तांडा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही विकासापासून वंचित आहे. शासकीय योजना आणि निधीचा गंधही या गावकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. अत्यंत दुर्गम भागात वसलेल्या या तांड्याची तहान दरवर्षी पैनगंगा नदी भागवते. मात्र, यावर्षी पैनगंगा पूर्णपणे कोरडीठाक पडल्याने गावकऱ्यांवर पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट ओढवले आहे. गावातील विहिरींनी तळ गाठला असून, जे काही पाणी शिल्लक आहे, ते मिळवण्यासाठी गावकऱ्यांना जीवघेणा संघर्ष करावा लागत आहे. एका महिलेला किंवा पुरुषाला विहिरीत उतरून तासनतास वाटीने पाणी उपसून भांडी भरावी लागत आहेत. हे विदारक चित्र प्रशासनाच्या डोळ्यांना दिसत नाही का, असा संतप्त सवाल गावकरी विचारत आहेत. जनावरांचेही पाण्याअभावी प्रचंड हाल होत आहेत. प्रशासकीय अधिकारी या गंभीर समस्येकडे ढुंकूनही पाहायला तयार नाहीत. स्थानिक प्रशासक राजवटीमुळे अधिकाऱ्यांवर कोणाचाही वचक राहिला नसल्याने तक्रारी करूनही काहीच उपयोग होत नसल्याचा अनुभव गावकरी सांगत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ या समस्येत लक्ष घालून मुरली सहस्त्रकुंड तांड्यासाठी पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी आर्त मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे. प्रशासनाने आतातरी जागे होऊन या तांड्याची तहान भागवावी, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असे गावकऱ्यांनी म्हटले आहे.

### तांडा नकाशावरच नाही?

मुरली सहस्रकुंड तांडा हा विकासाच्या नकाशावरून जणू पुसला गेला आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटूनही या तांड्याला शासनाच्या कोणत्याही योजनेचा, निधीचा लाभ मिळालेला नाही. साधे घरकुलही एकाही कुटुंबाला मिळालेले नाही. शासकीय यंत्रणा या गावापर्यंत पोहोचतच नसल्याचे भीषण वास्तव आहे. यामुळे येथील नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असून, उपेक्षित जीवन जगत आहेत. विकासाच्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाला या तांड्याचा विसर पडला आहे.

### 'आमच्या गावात येणार का?

प्रशासकीय अनास्थेने त्रस्त झालेल्या मुरली सहस्रकुंड तांड्यातील गावकरी संतप्त सवाल करत आहेत. गेल्या अडीच वर्षांपासून प्रशासक राज असल्याने अधिकाऱ्यांवर कोणताही अंकुश राहिलेला नाही. कितीही तक्रारी केल्या तरी दखल घेतली जात नाही, अशी त्यांची भावना आहे. 'आमच्या गावात येऊन आमची परिस्थिती पाहणार का?' असा थेट प्रश्न ते प्रशासकीय अधिकाऱ्यांना विचारत आहेत. त्यांच्या या प्रश्नातून त्यांची हतबलता आणि व्यवस्थेवरील अविश्वास स्पष्टपणे दिसून येतो.

## बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर

### दिग्रस १०२ गुणांसह राज्यातून ७६ व्या क्रमांकावर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. २३ :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्याच्या २०२३-२४ वार्षिक क्रमवारीमध्ये ७६ वा क्रमांक मिळविला आहे. पणन संचालनालयाच्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत जाहीर यादीत ३०५ समित्यांपैकी दिग्रसला २०० पैकी १०२ गुण मिळाले. ही प्रगती समाधानकारक मानली जात आहे.

मूल्यांकनानुसार दिग्रस बाजार समितीला पायाभूत सेवा सुविधा व इतर सुविधांमध्ये ४५ गुण, आर्थिक कामकाजात फक्त ०८, वैधानिक कामकाजामध्ये ३७ तर इतर निकषांमध्ये १२ गुण प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यातील शेजारील बाजार समित्यांची कामगिरी पाहता आर्णी (५९), मानोरा (३६), पुसद (५३), यवतमाळ (७१) आणि नेर (५१) या समित्या दिग्रसपेक्षा पुढे राहिल्या आहेत. तथापि, दारव्हा (१५२) व बोरी अरब (१५१) या समित्या दिग्रसच्या तुलनेत पिछाडीवर आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, सुमारे ५० किलोमीटर अंतरावरील मंगरुळपीर बाजार समितीने आठवा क्रमांक मिळविला. तर अवघ्या ५७ किलोमीटरवरील कारंजा (लाड) बाजार समितीने संपूर्ण राज्यात दुसरा क्रमांक पटकावून अतुलनीय यश संपादन केले आहे. दिग्रस समितीला भविष्यात क्रमवारीत सुधारणा करण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागणार आहेत.

> दिग्रस बाजार समिती अंतर्गत रस्ते, नाल्या, झाडे, शेडपर्यंतचा रस्ता यांसह अन्य पायाभूत सेवा सुविधेवर आणखी भर देणार आहोत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. समितीच्या विकासावर आमचा फोकस आहे. बाजार समिती अंतर्गत सुविधेचा अभाव असेल, त्यात लक्ष घालू आणि पुढील काळात राज्यस्तरीय गुणानुक्रमात लक्षणीय प्रगती करणार आहे.
>
> **- सतीश तायडे,**
> **सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, दिग्रस**

CAPTION
### गौरव कर्तृत्वाचा...



**यवतमाळ :** केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत १४२ वी रँक मिळविलेल्या अदिबा अनम हिचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करताना काँग्रेसचे नेते देवानंद पवार, ज्येष्ठ पत्रकार दिनेश गंधे, प्राचार्य साहेबराव पवार व काँग्रेस कार्यकर्ते आसिम अली.

## नेदरलँडच्या टीमकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

### मांगलादेवी येथे कार्यक्रम : आधुनिक तंत्रज्ञानातून खर्च कमी करत उत्पादन वाढीचे ध्येय

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**मंगरुळ, दि. २३ :** नेदरलँड येथील 'डी.एन. वेल्स रिसर्च टीम'ने नुकतीच नेर तालुक्यातील मांगलादेवी गावाला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. सॉलिडरीडंड व बेंबळा डॅम फार्मर प्रोड्युसर कंपनीने आयोजित या कार्यक्रमात, टीम प्रमुख लिनिया यांनी शेतकऱ्यांना 'मकारा' ॲपची माहिती देऊन त्याचे महत्व पटवून दिले. आधुनिक तंत्रज्ञानाचा हा प्रयोग महत्वाचा आहे.



शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांची शेती अधिक सुकर आणि फायदेशीर करण्याच्या उद्देशाने सॉलिडरीडंड आणि बेंबळा डॅम फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मांगलादेवी येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी नेदरलँड येथून 'डी.एन. वेल्स रिसर्च टीम'ला खास निमंत्रित करण्यात आले होते. या टीमच्या प्रमुख लिनिया आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गावातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी टीमने शेतकऱ्यांसाठी विकसित करण्यात आलेल्या 'मकारा' या मोबाईल ॲप्लिकेशनची सविस्तर माहिती दिली. हे ॲप शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी होणारा खर्च व्यवस्थित नोंदवता येतो. पिकांच्या अवस्थेनुसार खते आणि फवारण्या यांचे वेळापत्रक समजते. तसेच, पिकांवरील संभाव्य रोग आणि किडींची माहिती मिळून त्यावर नियंत्रण कसे मिळवावे, याबाबत मार्गदर्शन मिळते. शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक ज्ञानावर अवलंबून न राहता, तंत्रज्ञानाच्या मदतीने योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावेत, उत्पादन वाढवावे आणि अनावश्यक खर्चात बचत करावी, हा 'मकारा' ॲपचा मुख्य उद्देश असल्याचे टीमने स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान टीम सदस्यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या मोबाईलमध्ये 'मकारा' ॲप डाउनलोड करून दिले आणि ते कसे वापरावे याचे प्रात्यक्षिक दाखवले. शेतकऱ्यांनीही मोठ्या उत्साहाने यात सहभाग घेतला आणि ॲपमधील सुविधांबाबत समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाला अनुकूल नागी, मंगेश देवळकर, आनंद तिवारी, नीलिमा पहुरकर, परिमल थोटांगे, डायरेक्टर संजय काळे, भरत कुंभारखाने, विनोद सांडे आदी मान्यवरांसह गावातील शेकडो शेतकरी उपस्थित होते. हा उपक्रम शेती विकासासाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## पंचदिवसीय लघु गुरुकूल शिबिरास प्रारंभ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. २३ :** येथील एल. के. हायर सेकंडरी विद्यामंदिरात पाच दिवसीय लघु गुरुकूल शिबिरास २० एप्रिल रोजी प्रारंभ झाला. कान्हा आर्य गुरुकुल, नागपूरतर्फे आयोजित या शिबिरात सनातन वैदिक संस्कृती, योग, प्राणायाम आदींचे धडे दिले जात आहेत.

शिबिराचा आरंभ भारत माता व महर्षी दयानंद सरस्वती यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आला. नगरसेवक शैलेश कोपरकर व गोविंदराव तास्के यांच्याहस्ते दीपप्रज्वलन झाले. यावेळी व्यासपीठावर सतिष नखाडे, संजय सुरोशे, बेगाजी चिलेकर, प्राचार्य रवी भोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. योगाचार्य वेद प्रकाश ब्राहमी यांनी शिबिराचा उद्देश



स्पष्ट केला. विद्यार्थी जीवनात शिस्त, अनुशासन तसेच योग व प्राणायामाचे महत्व त्यांनी विषद केले. महर्षी दयानंद सरस्वती वैदिक संस्थानद्वारे संचालित कान्हा आर्य गुरुकुल महाविद्यालय, रुईरवार (नागपूर) यांनी या सनातन वैदिक संस्कृती पाठशाळेचे आयोजन केले आहे. दि. २४ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या महत्वपूर्ण शिबिरास पालक वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद देत आहे. शिबिराच्या यशस्वीतेसाठी एल. के. हायर सेकंडरी विद्यामंदिरचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी विशेष परिश्रम घेत आहेत.

# पाणी, वाणीच्या मुक्तीचा विचार समाजात रुजवा!

## डॉ. प्रवीण बनसोड : सावरगाव काळे येथे महामानवांच्या जयंतीनिमित्त प्रबोधन पर्व संपन्न

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नेर (परसोपंत), दि. २३ :** महामानवांनी पाणी आणि वाणीच्या मुक्तीसाठी संघर्ष केला, कारण याच दोन गोष्टींमध्ये बहुजनांच्या गुलामगिरीची मुळे होती, असे परखड मत नेहरू महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण बनसोड यांनी व्यक्त केले. सावरगाव काळे येथे आयोजित प्रबोधन पर्वात त्यांनी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा धांडोळा घेतला.



सार्वजनिक जयंती उत्सव समिती, सावरगाव काळे यांच्या पुढाकाराने आणि गौतम खंडारे यांच्या संकल्पनेतून महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विशेष प्रबोधन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. गावातील तरुण पिढीने महामानवांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रशासकीय सेवेत यावे, हा यामागील उदात्त हेतू होता. या कार्यक्रमात तालुकास्तरीय निबंध स्पर्धा आणि शासकीय सेवेत नव्याने रुजू झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळाही उत्साहात पार पडला. डॉ. बनसोड यांनी आपल्या भाषणात, महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद खुला करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करणे, या घटनांमधून पाण्याच्या मुक्तीसाठीचा लढा अधोरेखित केला. तसेच, महात्मा फुलेंचे 'शेतकऱ्याचा आसूड' सारखे ग्रंथ आणि डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले भारतीय संविधान यामुळे बहुजनांच्या वाणीला, विचारांना मुक्त केल्याचे त्यांनी प्रभावीपणे मांडले. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ. अशोक खोब्रागडे उपस्थित होते. व्यासपीठावर सरपंच दिगंबर काळे, प्रा. महेश देवडे, अविनाश शेंडे, मोहन चौरे, पोलीस पाटील साधना देविचंद जांभळे, सिद्धेश्वर पाटील, नारायण काळे, उपसरपंच राजेंद्र श्रीराम गायकवाड, तंटामुक्ती समिती अध्यक्ष शंकरराव शृंगारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत नाईक यांनी केले, तर स्वानंद खंडारे व रोशन खंडारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य आयोजक गौतम खंडारे यांच्यासह सतीश काळे, गजानन गायकवाड, भोजराज गायकवाड, कमलाकर राऊत, अरविंद चव्हाण, सिद्धार्थ खंडारे, अनंता नाईक, भारत नाईक, उमेश चातुरकर, प्रवीण गेडाम, ज्ञानदेव उघडे, शुभम नेवारे, सुधीर मेश्राम, अच्युत काळे, चंद्रकांत बांबुर्डे, अमित लाड, निरंजन कुराडे, निलेश कुराडे आणि समस्त गावकऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

### निबंध स्पर्धेत विद्यार्थी प्रतिभेचा जागर!

यावेळी आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गट 'अ' मध्ये जीविका दिनेश मुळे (प्रथम), अवनी प्रवीण बनसोड (द्वितीय), श्रवण सुरेश काळे (तृतीय) यांनी बाजी मारली. उत्तेजनार्थ पारितोषिके देवेंद्र ठाकरे, श्रावणी सचिन काळे, शर्वरी सतीश काळे यांना मिळाली. खुल्या गटात अक्षरा सतीश काळे (प्रथम), अहिषा सिद्धार्थ पाढेन (द्वितीय), तर श्रुती गजानन गायकवाड (तृतीय) विजेत्या ठरल्या. सारंग प्रशांत काळे, सिमरन सदानंद कटके, खुशी सेवानंद कांबळे यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

# दोन्ही सेनेतर्फे पहलगाम घटनेचा निषेध

## जिल्ह्यात यवतमाळ, पुसद, मारेगाव व उमरखेड येथे निदर्शने; काँग्रेसतर्फेही निषेध

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ : काश्मीर खोऱ्यातील पहलगाम बैसरन घाटी भागात दहशतवाद्यांनी मंगळवारी केलेल्या बेछूट गोळीबारात २८ जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्ह्यात जोरदार निदर्शने करण्यात आले. यवतमाळ शहरात शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा) व काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र निषेध नोंदविण्यात आला. शिवाय, जिल्ह्यातील पुसद, मारेगाव व उमरखेड येथे शिंदेसेनेच्या वतीने निषेध नोंदवून या घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. हा भ्याड हल्ला हा देशाच्या एकता आणि अखंडेवर असल्याचे मत निषेध नोंदविणाऱ्या आंदोलकांनी व्यक्त केले.**

### यवतमाळात शिवसेना (उबाठा) गटाकडून जाहीर निषेध




जिल्हा शिवसेनेच्या (उबाठा) वतीने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसैनिकांनी एकत्र येत येथील संविधान चौकात निषेध नोंदविला. यावेळी शिवसेने (उबाठा) चे खासदार संजय देशमुख, आमदार संजय देरकर, जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे व संजय निखाडे, जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, अमोल धोपेकर, प्रवीण पांडे, चेतन शिरसाठ, कल्पना दरवई, विशाल पांडे, गजानन पांडे, प्रमोद भरवाडे, गजानन पाटील, सचिन धोटे, आसिफ काजी, शेख सलमान, अंजली गिरी, पुष्पा जयस्वाल, रंगराव काळे, विजय बापट, हेमंत उगले, गुरूदेव राऊत, सुधीर खैरे, उज्ज्वल मोरे, अशोक भुतडा, पंकज शिवरामवार यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. पहलगाम प्रकरणी शिवसैनिक आक्रमक झाल्याचे दिसून आले. घोषणाबाजीमुळे दत्त चौक परिसर दणाणून गेला होता. केंद्र सरकारने फक्त कश्मीर बाबतीत दिखावा निर्माण केला, जर योग्य उपाययोजना केल्या असत्या तर सर्व सामान्य नागरिकांचे नाहक बळी गेले नसते, अशी प्रतिक्रिया खासदार संजय देशमुख यांनी व्यक्त केली. याप्रसंगी प्रवीण पांडे, राजेंद्र धोटे, युवासेना जिल्हा प्रमुख अमोल धोपेकर, विशाल पांडे, गजानन पाटील, पुष्पा जयस्वाल, शहरप्रमुख चेतन शिरसाठ, रवी पांडे, विकास पवार, आसिफ काझी, शेख सलमान, कमल मिश्रा, हेमंत उगले आदींसह बहुसंख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

### शिंदेसेनेकडून माइंदे चौकात पहलगाम हल्ल्याचा निषेध




काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बुधवारी, दि.२३ एप्रिल रोजी शहरातील माइंदे चौकात शिवसेना (शिंदे गटाकडून) निषेध नोंदविण्यात आला. हा देशाच्या एकात्मतेवर हल्ला असून सर्व राजकीय पक्षांनी मतभेदांच्या पलीकडे जात या प्रवृत्तीचा निषेध केला पाहिजे, असे मत शिवसेनेचे हरिहर लिंनगवार यांनी व्यक्त केले. पहलगाम येथीलदहशतवादी हल्लाअत्यंत निषेधार्ह आणि दुःखद आहे. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्व पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. हा हल्ला देशाच्या एकता आणि अखंडतेवर असल्याचे मत लिंगनवार यांनी व्यक्त केले. या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना शिक्षा करण्यासाठी सरकारने लवकरच योग्य ती पावले उचलावीत, असे आवाहन शिंदे गटाकडून करण्यात आले. यावेळी सर्व मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. या आंदोलनात शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिंगणवार, जिल्हा प्रमुख श्रीधर मोहोड, प्रवीण निमोदया, योगेश वर्मा, नीलेश बेलोकार, शोभा फुनसे, गजानन डोमाळे, संजय रंगे, साबळे काका, पवन अराठे, प्रद्युम जावळेकर, पुरुषोत्तम राठोड, पुरुषोत्तम टिचुकले, बाळासाहेब डोळे, संजय उपगनलावार संतोष चव्हाण, आकाश चव्हाण, महेश पवार आदी शिवसैनिक उपस्थित होते.




### जिल्हा काँग्रेस कमिटीकडून जाहीर निषेध

- काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या पर्यटकांवर अतिरेक्यांनी जो भ्याड हल्ला केला, त्यात निष्पाप २८जणांचा मृत्यू झाला; तर अनेक जण गंभीर जखमी झालेत. या घटनेचा काँग्रेस कमिटी कडून मृतकांना श्रद्धांजली वाहून निषेध व्यक्त केला. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर माजी मंत्री वसंतराव पुरके, आमदार बाळासाहेब मांगुळकर, संजय ठाकरे, अनिल उर्फ बबलू देशमुख, प्रकाश मिसाळ, किरण दाभोळकर, मनोज घोटेकर, प्रमोद बघाडे, अथर्व भोयर, कृष्णा पुसनाके, कुणाल ठाकरे, नंदू कुडमेथे यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



### पुसद येथे शिवसेनेचे तहसीलदारांना निवेदन

- पुसद : काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा पुसद शिवसेनेच्या वतीने जाहीर निषेध नोंदविण्यात आला. उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत पंतप्रधानांना निवेदन पाठविण्यात आले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख संजय सिंह बयास, शिवसेना शहर प्रमुख दीपक उखळकर, ओबीसी जिल्हा प्रमुख प्रमुख लक्ष्मणराव आगासे, शहर संघटक अनिल चव्हाण पाटील, तसेच व्यापारी आघाडीचे संदीप लाभसेटवार, उप जिल्हाप्रमुख प्रमुख विशाल पेन्शनवार, अजय संगवई, गजानन मडके, श्याम ठाकूर, बाबूराव पाईकराव, तेजस कानडे, अमर अग्रवाल, अमर सोनटक्के, विशाल क्षीरसागर, प्रतीक वाघमारे, अरुण जाधव, सचिन महामुने, विष्णू मुंडे यांच्यासह महिला तथा हजारो शिवसैनिक उपस्थित होते.



### महात्मा फुले पत्रकार संघातर्फे निषेध

- उमरखेड, दि.२३: काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या पर्यटकांवर अतिरेक्यांनी जो भ्याड हल्ला केला, त्यात निष्पाप २८जणांचा मृत्यू झाला; तर अनेक जण गंभीर जखमी झालेत. या घटनेचा महात्मा ज्योतिबा फुले पत्रकार संघातर्फे तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून जाहीर निषेध करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्तराव काळे, सचिव प्रवीण सूर्यवंशी, प्रा . अनिल काळबांडे, सुनील ठाकरे, स्वप्नील मगरे, संतोष मुडे, संभाजी भोयर, शाहरुख पठाण, श्री. इंगोले, गजानन भारती, सुभाष वाघाडे, अनिल राठोड आदी उपस्थित होते.

CAPTION द बर्निंग कार...




**यवतमाळ : शहरातील तापमान ४४ अंश सेल्सीअसवर पोहोचले असून बुधवारी दुपारच्या सुमारास चालत्या क्रुझर वाहनाने पेट घेतला. घटनास्थळी उपस्थित लोकांनी व वाहतूक पोलिसांनी तातडीने आग विझविली. चालकाने प्रसंगावधान राखून वेळीच प्रवाशांना बाहेर काढले, त्यामुळे मोठा अनर्थ टळला.**

# गावठी कट्ट्यासह तरुण अटकेत

## स्थानिक गुन्हे शाखेची उमरखेडमध्ये कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २३ :** शहरात गावठी बनावटीचा कट्टा बाळगणाऱ्या एका तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. देवाशिष उर्फ देवा कैलास मांदळे (वय २३) असे आरोपीचे नाव आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार अवैध शस्त्रांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३० हजारांचा कट्टा जप्त करण्यात आला.



देवाशिष उर्फ देवा कैलास मांदळे (वय २३, सध्या रा. भगतसिंग वॉर्ड, करोडी रोड, उमरखेड, मूळ रा. मुडाणा, महागाव) असे अटकेतील तरुणाचे नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पुसद कॅम्प येथील पथकाला मंगळवारी (दि. २२) गोपनीय माहिती मिळाली की, उमरखेड येथील भगतसिंग वॉर्ड, करोडी रोड परिसरात एक तरुण गावठी बनावटीचा देशी कट्टा (पिस्तूल) घेऊन फिरत आहे. त्यावरून पथकाने तात्काळ पंचांना सोबत घेऊन उमरखेड गाठले. यावेळी संशयित तरुणाचा कसून शोध घेऊन त्याला उमरखेड शहरातून ताब्यात घेण्यात आले. पंचासमक्ष देवाशिष याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला लावलेला अंदाजित ३० हजार रुपये किंमतीचा एक गावठी बनावटीचा देशी कट्टा (अग्निशस्त्र) आढळून आला. यावेळी पोलिसांनी त्याला अटक करून देशीकट्टा जप्त केला.

# आमडापूर कालवा भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध

## फुलसावंगीत मोजणीवेळी गदारोळ; शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न; प्रकृती गंभीर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ विनोद कोपरकर



**महागाव, दि.२३:** तालुक्यातील आमडापूर लघु पाटबंधारे कालव्यासाठी जमीन मोजणीस विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि प्रशासनाचा फुलसावंगीत बुधवारी संघर्ष झाला. अधिकाऱ्यांनी पोलिस बळ मागविल्याने परिस्थिती चिघळली. जमीन जाण्याच्या भीतीने एका शेतकऱ्याने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले.

महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथे आज, बुधवारी दुपारी आमडापूर लघु पाटबंधारे विभागाचे अधिकारी कालव्यासाठी जमीन अधिग्रहण करण्याकरिता मोजणी करण्यासाठी आले असता, तणावाची परिस्थिती निर्माण झाली. मागील अनेक वर्षांपासून या कालव्याचे काम सुरू असून, ते आता फुलसावंगीपर्यंत पोहोचले आहे. येथून पैनगंगा नदीपर्यंत कालव्याचे शेवटचे टोक आहे. मात्र, या कालव्यासाठी जमीन देण्यास काही शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. बुधवारी दुपारी पाटबंधारे विभागाचे अधिकारी मोजणीसाठी आले असता, काही शेतकऱ्यांनी त्यांना विरोध दर्शविला. अधिकाऱ्यांनी याबाबत उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना माहिती दिली. काही वेळातच उपविभागीय अधिकारी मोठा पोलिस ताफा घेऊन घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांच्या आगमनाने वातावरण अधिकच तापले आणि मोठा गदारोळ झाला. काही शेतकऱ्यांकडे अत्यल्प जमीन असून, कालवा शेतातून गेल्यास मोठे नुकसान होईल, अशी भीती त्यांना वाटत आहे. तसेच, अनेक वर्षांपासून काम सुरू असूनही कालव्याचे पाणी अद्याप इसापूरपर्यंतही पोहोचले नसल्याने या कालव्याच्या उपयुक्ततेवरच शेतकरी प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. त्यामुळे आमच्या बहुमूल्य जमिनी शासनाने जबरदस्तीने अधिग्रहीत करू नयेत, अशी मागणी काही शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान, मोजणीसाठी आलेला प्रशासकीय व पोलिस ताफा पाहून, आपली जमीन आता जाणारच आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, या विवंचनेत असलेल्या एका शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलले. त्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोरच कीटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. या प्रकाराने एकच खळबळ उडाली. तत्काळ त्या शेतकऱ्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. या घटनेनंतर मोजणीचे काम थांबवण्यात आले असून, गावात तणावपूर्ण शांतता आहे.

# अपघातात दोन वर्षीय चिमुकली जागीच ठार

## बोरी इचोडजवळ महामार्गावरील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव दि. २३ :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वर बोरी इचोडजवळ बुधवारी (दि. २३) दुपारी अनोळखी वाहनाने जबर धडक दिल्याने दोन वर्षीय चिमुकली जागीच ठार झाली. तर तिचे आजोबा गंभीर जखमी झाले. वाहनचालक फरार झाला आहे.

नायरा गणेश कुमरे (वय २) असे या अपघातात ठार झालेल्या चिमुकलीचे नाव आहे. तर आजोबा गुणवंत परचाके (५५) असे गंभीर जखमी आजोबाचे नाव आहे. परचाके हे आपली दोन वर्षांची नात नायरा हिला कडेवर घेऊन बोरी इचोड येथून राष्ट्रीय महामार्गाने वडकीकडे पायी जात होते. महामार्ग ओलांडत असताना मागून वेगाने आलेल्या एका अनोळखी चारचाकी वाहनाच्या चालकाने त्यांना जोरदार धडक दिली. यात चिमुकली जागीच ठार झाली. तर आजोबा जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच राष्ट्रीय महामार्गाचे कर्मचारी आणि वडकी पोलिस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमी परचाके यांना पुढील उपचारासाठी वडणेर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. चिमुकल्या नायराच्या मृत्यूने घटनास्थळी उपस्थित नातेवाईकांनी हंबरडा फोडला.

## शॉर्टक्यात

### मोटार सायकल लंपास

**यवतमाळ :** समर्थ लॉन आर्णी बायपास येथुन मोटार सायकल लंपास केली. याप्रकरणी पॅशन प्रो कंपनीची मोटार सायकल क्र. एम.एच. २९ ए.एल. १५११ किंमत ३०००० रूपयाची घटनास्थळी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना २० एप्रिलला घडली. याप्रकरणी सय्यद अफजल सय्यद अकबर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### म्हसोला येथे घरफोडी

**कळंब :** घरी कुणी नसल्याचे पाहुन घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी म्हसोला येथे घरात कोणी नसल्याचे पाहुन घरात प्रवेश करून कपाटात ठेवलेले नगदी २,१०,००० रूपये चोरून नेले. ही घटना २२ एप्रिलला घडली. याप्रकरणी रामेश्वर पांडुरंग भिसे रा. म्हसोला यांच्या तक्रारीवरून हेमंत हनुमान झुगे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### रेतीची अवैध वाहतूक

**नेर :** रेतीची अवैध वाहतुक करतांना आढळुन आल्याने कारवाई करण्यात आली. याप्रकरणी ट्रॅक्टर वाहन क्र. एम.एच. २९ व्ही १३९ मध्ये १ ब्रास रेती किंमत १५,००० रूपयाची अवैधरित्या विनापरवाना वाहतुक करून चोरून घेवुन जात असतांना मिळुन आल्याने १ ब्रास रेती किंमत १५,००० रूपये तसेच ट्रॅक्टर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सरतर्फे पोउपनि बदरके यांच्या तक्रारीवरून आयुब खान हफिज खान, सोहेल अहमद खान शब्बीर खान विरूध्द गुन्हा नोंद केला.

### लोखंडी पाईपने डोक्यावर हल्ला

**नेर :** तुमच्या गाई मोकळ्या का सोडता या कारणावरून वाद करून लोखंडी पाईपने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी तुमझ्या गाई मोकळ्या का सोडता त्याच्यामुे माझे घरासमोर टाकलेल्या पाईपचे नुकसान होते असे म्हणून वाद करून शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली तसेच लोखंडी पाईपने डोक्यावर मारून जखमी केले. याप्रकरणी शेख नवेद शेख मज्जिद यांच्या तक्रारीवरून फारूक शेख, शफिक पठाण, शेख अनिस विरूध्द गुन्हा नोंद केला.

### सुगंधीत तंबाखूचा साठा जप्त

**पुसद :** सुगंधीत तंबाखु जप्त केल्याची घटना घडली. याप्रकरणी प्रतिबंधीत केलेला सुगंधीत तंबाखुजन्य पदार्थ वेगवेगळे पुडे एकुण ३४०८५ रूपयाचे अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना मिळून आले. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन सुंगधीत तंबाखु पुडे व दुचाकी जप्त करण्यात आली. सरतर्फे पोहेकॉ ६९८ मदने पोस्टे पुसद शहर कार्यरत उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या तक्रारीवरून शेख मुक्तार शेख युसुफ विरूध्द गुन्हा नोंद केला.

### मोटारपंप लंपास

**उमरखेड :** उमरखेड शेत शिवारातुन मोटारपंप लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी शेतातील सी.आर. आय कंपनीची ५ एच पी ची सबमर्शिबल मोटारपंप किंमत २०,००० रूपयाचे अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी आनंद दिनकरराव गोविंदराव यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.